आधुनिक केसरी

रविवार, ११ डिसेंबर २०२२
किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -११७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 11 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-117 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# तर लोकशाही संपली असे जाहीर करा

## उद्धव ठाकरे : 42 व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे घनसावंगीत उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी : जालन्यातील घनसावंगी येथील स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळ शहागड संचलित संत रामदास कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित 42 व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे उद्घाटन माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा शिंदे गटावर खोक्यावरून निशाणा साधला. खोके देऊन लोकं आपल्याकडे आणली जात असतील आणि खोक्यांचे राजकरण करायचे असेल तर लोकशाही संपली असे जाहीर करा, असा खोचक टोला त्यांनी शिंदे गटाला लगावला.**


पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, लोकशाही म्हणजे काय तर लोकांनी निवडून दिलेल्या मताची किंमत खोक्यामध्ये होत नाही. आता आपल्याकडे गुप्त मतदान आहे. मात्र नागरिकांनी दिलेले मत त्यांना तरी माहित आहे का? कुणाकडे जाणार आहे आणि कुठून-कुठून जाणार आहे. ट्रॅव्हल एजन्सी सारखे सुरत, गुवाहाटी आणि दिल्ली असे कधी इकडे - कधी तिकडे आमदार मतदारांपासून गुप्त होऊ लागले आहेत. असे कसे चालणार? अशी लोकशाही आपण मानणार नाही. त्यामुळे लोकशाहीचा अर्थ असा लावणार असाल तर देशातील लोकशाही संपली असे एकदा जाहीर करून टाका. तुम्ही कोणालाही मतदान केले तर त्याला आम्ही खोक्यात बसून आमच्याकडे घेऊन टाकू, अशी परिस्थिती असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. फुले-आंबेडकरांबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल चंद्रकांत पाटलांवर देखील उद्धव ठाकरे यांनी निशाणा साधला. उच्च शिक्षण मंत्री शिक्षण देता कशासाठी भीक मागायला. शिक्षण देण्यासाठी जर भीक मागायची असेल तर शिकल्यावर देखील भीक मागायची तुमची इच्छा आहे का? असा टोला ठाकरेंनी लगावला. तर तुम्ही कोण आम्हाला भीक माघ सांगणारे. संत एकनाथ, ज्ञानेश्वर, तुकाराम हे कोणत्या शाळेत शिकले होते, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी पाटलांचा समाचार घेतला. उद्या समृद्धी महामार्गाच्या उद्घाटनासाठी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार आहेत. त्यामुळे उद्या राज्यपालांनी केलेल्या वक्तव्यावर पांघरून घालण्याचे ते प्रयत्न करतील. शिवाजी महाराज की जय म्हणतील. मग आम्हाला टोमणे मारतील की, बाळासाहेब ठाकरे कसे होते. पण माझी त्यांना एक विनंती आहे की, तुम्ही देशाचे पालक असून पालकांसारखे बोलावे. महाराष्ट्र पालकाची भाजी आहे, असे समजून बोलू नका, कोणेही यावे आणि आमची भाजी करावी, एवढे आम्ही मिंदे नाही असेही ठाकरे म्हणाले.



## सुखविंदर सिंग सुखू हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** हिमाचल प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदासाठी काँग्रेसकडून सुखविंदर सिंग सुखू यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. फक्त याबाबत अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. परंतु, काँग्रेस हायकमांडने सखू यांच्या नावाला मान्यता दिली आहे. हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. त्यामुळे येथे सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेसच्या बैठकांच्या फेऱ्या सुरू आहेत. हिमाचल प्रदेशातील विधानसभेच्या 68 जागांपैकी काँग्रेसला 40 जागा मिळाल्या आहेत. तर भाजपला 25 जागा मिळाल्या आहेत. याशिवाय तीन जागा अपक्षांनी जिंकल्या आहेत. काँग्रेसने निवडणुकीपूर्वी कोणत्याही नेत्याला हिमाचलसाठी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा बनवले नव्हते.



परंतु, सुखू यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याने आता मुख्यमंत्र्यांबाबत चित्र जवळपास स्पष्ट झाले आहे. हिमाचल प्रदेशातील नादौन विधानसभा मतदारसंघातून सुखविंदर सिंग सुखू यांनी निवडणूक जिंकली आहे. त्यांनी भाजपच्या विजय कुमार यांचा 3,363 मतांनी पराभव केला. हिमाचल प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत सुखू हे आघाडीवर होते. सुखविंदर सिंग यांना 50.88 टक्क्यांसह 36142 मते मिळवली तर भाजपच्या विजय कुमार यांना 46.14 टक्क्यांसह 32,779 मते मिळाली. तर आम आदमी पक्षाचे उमेदवार शांकी ठुकराल यांना केवळ 1,487 मते मिळाली. सुखविंदरसिंग सुखु हे हिमाचल प्रदेशच्या सध्याच्या राजकारणातील आघाडीचे नाव आहे. त्यांचा जन्म 27 मार्च 1964 रोजी हिमाचल प्रदेशातील नादौन येथे झाला. आता ते काँग्रेसकडून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. सुखविंदर सिंग सुखू यांनी नादौन विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. पुढे हिमाचल प्रदेश विद्यापीठातून एलएलबीची पदवी मिळवली.

**2003 मध्ये पहिल्यांदा आमदार**
सुखविंदर सिंग सुखू हे राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वीरभद्र सिंह यांचे निकटवर्तीय मानले जातात. सखू हे 2022 च्या विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसच्या प्रचार समितीचे प्रमुखही होते. सुखविंदर सखू यांनी आतापर्यंत 5 वेळा विधानसभा निवडणूक लढवली असून त्यापैकी 4 वेळा त्यांनी विजय मिळवला आहे. 2003 मध्ये नौदान विधानसभा मतदारसंघातून ते पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले होते. यानंतर सखू यांनी 2007, 2017 च्या निवडणुकीत विजय मिळवला. 2013 मध्ये ते हिमाचल प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्षही राहिले आहेत.

## फडणवीसांच्या आदेशाने शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडणे थांबवली

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शेतकऱ्यांचे यापूर्वी अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान आणि सध्या चालू असलेला रब्बीचा हंगाम ध्यानात घेता वीजबिल वसुलीसाठी शेतकऱ्यांची वीज कनेक्शन तोडू नयेत, असा स्पष्ट आदेश उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी दिला असून त्यानुसार महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांची वीज कनेक्शन तोडणे थांबवावे, अशी सूचना महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी शनिवारी केली.

विजय सिंघल म्हणाले की, महावितरणकडून थकित वीजबिलांच्या वसुलीसाठी मोहीम चालू आहे. त्यानुसार ज्यांची बिले थकलेली आहेत त्यांचे वीज कनेक्शन तोडले जाते व बिल भरल्यानंतर पुन्हा जोडले जाते. तथापि,



शेतकऱ्यांवर अतिवृष्टी व पूरपरिस्थिती अशी आलेली संकटे आणि सध्या चालू असलेला रब्बी हंगाम ध्यानात घेता त्यांचे वीज कनेक्शन कापू नये, असा आदेश मा. उपमुख्यमंत्र्यांनी दिला. त्यानुसार महावितरणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांची वीज कनेक्शन तोडणे थांबवावे.

# भोकरच्या बोगस डॉक्टरांवर कार्यवाई कधी होणार ?


## डॉक्टर संघटनेच्या तक्रारीची बेदखल

आधुनिक केसरी न्यूज

भोकर : शहर आणि तालुक्यात मागील अनेक वर्षांपासून बोगस डॉक्टरांनी कमी खर्चात उपचार करून भोळ्याभाबड्या जनतेला आपलसे करुन घेतल आहे. अधिकृत परवाना नसताना चूकीचा उपचार केल्याने अनेक रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरातील अधिकृत परवाना धारक असलेल्या डॉक्टर संघटनेनी बोगस डॉक्टरांवर कारवाई करावी अशी मागणी केली होती.संबधीतानी अद्याप कसलीच कार्यवाही केली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शहरात आरोग्य विभागाचे ग्रामीण रूग्णालय, आणि ग्रामीण भागात तालुका आरोग्य विभागाचे भोसी, किनी, मोघाळी येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कार्यान्वित आहेत. याशिवाय शहरात खासगी रुग्णालयाची सूवीधा आहे. खासगीत उपचार करणाऱ्या बहुतांशी डॉक्टराकडे अधिकृत परवाना आहे त्याच पध्दतीने ते उपचार करतात. शहर आणि ग्रामीण भागात अधिकृत परवाना नसताना काही छूपे रूस्तुम बोगस डॉक्टरांनी परिसरातील भोळ्याभाबड्या जनतेला कमी पैशात उपचार करून आपलसे केल आहे. गोरगरीब रुग्णांना महागडे उपचार पद्धती परवडणारी नसल्याने ते अशा बोगस डॉक्टरांच्या जाळ्यात अडकले जात आहेत. याच संधीचा फायदा घेऊन चुकीचा उपचार केल्याने अनेक रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे.सदरील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी वैद्यकीय अधीक्षक आणि तालूका आरोग्य अधिकारी यांना अधिकार देण्यात आले आहेत पण ते काहिच ठोस निर्णय घेत नसल्याने बोगस डॉक्टरांचा सूळसूळाट अधिक वाढला आहे. अरोग्यसेवा हि अत्यावश्यक सेवा म्हणून ओळखली जाते तरी रुग्णाच्या आरोग्याशी खेळण्या-यावर संबंधितांनी आज पर्यत काहीही ठोस निर्णय घेतला नाही याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे. येणा-या काळात बोगस डॉक्टरांवर काय कार्यवाही होणार याकडे सर्वाचे लक्ष लागून आहे.



भोकर तालुक्यात अनेक वर्षांपासून बोगस डॉक्टरांनी अक्षरा धुमाकूळ घातला आहे. परिणामी अधिकृत परवाना धारक असलेल्या डॉक्टरावर त्यांचा परिणाम होतो आहे .शहर व ग्रामीण भागात छूप्या पध्दतीने परवाना नसताना चूकीचा उपचार करणा–या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी शहरातील तालुका डॉक्टर संघटनेनी थेट जिल्हा शल्यचिकित्सकाकडे तक्रार दाखल केली आहे .तक्रार करून बराच काळ लोटला तरी संबंधीतांनी काहीच कार्यवाही केली नाही .तक्रार चक्क गूलदस्त्यातच ठेवल्याने कार्यवाही होणार की नाही याबाबत आता शंका निर्माण झाली आहे .तक्रारीची त्वरीत दखल घेऊन बोगस डॉक्टरांवर कारवाई करावी अशी जनतेची मागणी आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# फक्त आणि फक्त कृतज्ञता

आधुनिक केसरी

पण झाल्या घटनेचा बसलेला मानसिक धक्का प्रचंड होता. काहीच सुचत नव्हते. लोकांनी आम्हाला खाली बसवले. पिण्यासाठी पाणी आणले. बाईकवरून खाली पडलेल्या मुलाच्या डोळ्याजवळून रक्त वाहत होते. त्याचे वडील आमच्याजवळ येऊन तावातावाने बोलू लागले. त्यांचेही बरोबर होते. पण घडणारी घटना घडली होती. आमच्या हातात काहीच राहिले नव्हते. त्याच वेळी डॉ वसुधाताई आणि त्यांचे यजमान डॉ सुहास डोंगरगावकर त्या ठिकाणी आले. त्यांनी लोकांना शांत केले. चाळीसगाव येथील हे मोठे लेखक आहेत. ते आमचे नातेवाईक आहेत. दुर्दैवाने ही घटना घडली आहे असे सांगून त्यांनी लोकांना शांत केले. आमच्या गाडीतील आमच्या सामानाच्या बॅग्ज त्यांच्या गाडीत टाकल्या आणि आम्हाला घेऊन सरळ डॉ अजय भन्साळी यांचे सिद्धार्थ हॉस्पिटल गाठले. डॉ अजय यांना त्यांनी आधी फोन केल्यामुळे ते आणि त्यांचा स्टाफ तयारच होता. गेल्याबरोबर लगेच त्यांनी आमचे ब्लडप्रेशर,



कुठे लागले याची चौकशी केली. आम्हाला कोणतीही काळजी करू नका असे सांगून धीर दिला. एक्स रे घेतले. सुदैवाने त्यांना कुठे फ्रॅक्चर आढळले नाही. मुका मार मात्र आम्हाला दोघांनाही लागला होता. त्यावर उपचार करून धनुर्वाताचे वगैरे इंजेक्शन देऊन काही औषधे लिहून दिली. मला मान, पाठ आणि सौ ला कमरेच्या भागाला मार लागला होता. हे सगळे होईपर्यंत डॉ सौ निधी यांनी आमच्यासाठी कॉफी करून आणली. तुमचे लेख आमच्या डॉक्टरांच्या ग्रुपवर येतात, आम्ही ते वाचतो. तुम्ही खूप छान लिहिता असे डॉ अजय, डॉ सुहास आणि डॉ सौ निधी यांनी सांगितले. डॉ वसुधाताई आणि त्यांचे यजमान हे नेत्रतज्ज्ञ. त्यांनी त्या बाईकवर जखमी झालेल्या मुलाच्या डोळ्यावर उपचार केले. आम्हा दोघांना ते आपल्या घरी घेऊन गेले. डॉ सुहास यांच्या मातोश्री घरी होत्या. आम्ही घरी गेल्यावर परमेश्वराचे आभार मानले. देवाला आणि डॉ च्या आईंना नमस्कार केला. तेवढ्या वेळात डॉ सुहास यांनी विविध ठिकाणी फोन करून माझी गाडी टो करून मालेगावच्या सर्व्हिस सेंटरमध्ये नेण्याची व्यवस्था केली. याच सुमारास या अपघाताचे वृत्त कळल्याने **क्रमशः**



# आनंदी पहाट

## अध्यात्माचे तीन पैलू महत्वाचे

आधुनिक केसरी

सध्याची परिस्थिती, त्या परिस्थितील सर्व सामान्य मनुष्य, त्यांच्या अडीअडचणी, त्या अडचणींच्या निवारणार्थ शोधात असलेल्यांची मानसिकता ह्या विषयांचा सविस्तर खुलासा करून घेणे अधिक आवश्यक आहे. ह्या गुरुतत्वात सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची योग्य दिशा प्राप्त होत असते. ज्यायोगे सर्वत्र सकारात्मक वातावरणाची निर्मिती होत राहते. आपण प्रत्येकाने आपल्या आध्यात्मिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत. आध्यात्म हा मानसिक आणि शारीरिक उपचारांचा अविभाज्य घटक आहे. आध्यात्म संकट समयी अंतर्गत शक्तीचा स्त्रोत असल्याचे आपण जाणून घेतले पाहिजे. ते आपल्या कल्याणाच्या केंद्रस्थानी असून आपल्या जीवनातील सर्व पैलूना समृद्ध करते. शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नातेसंबंध दृढ करण्यास उपयुक्त ठरते. आपल्या कौटुंबिक गरजांसाठी व्यावहारिक, समजूतदार आणि शांत दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. आपल्या अंतःप्रेरणेवर आत्मविश्वास देते आणि यशाकडे जाण्यासाठी आवश्यक ती शक्ती प्रदान करते. आध्यात्मिक तंदुरुस्ती, उद्देश निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाची पायरी म्हणजे स्व-मूल्यांकन करणे होय. आपल्या जीवनाचे सात परिमाण समृद्ध करण्यासाठी वैयक्तिक योजना करण्याची गरज असते. आपले मन, शरीर, आत्मा, प्रेम, कार्य, खेळ, जग ह्याचा त्याच्याशी थेट संबंध असतो. अध्यात्म तीन पैलूंनी बनलेले आहे; नातेसंबंध, मूल्ये आणि जीवनाचा उद्देश हे होत. आध्यात्मात भावना, संवेदना किंवा असा विश्वास आहे की, माझ्यापेक्षा काहीतरी मोठे आहे, संवेदनात्मक अनुभवापेक्षा मानव असण्यापेक्षा काहीतरी अधिक आहे आणि ज्याचा आपण भाग आहोत. त्यामागचे कारण, तो वैश्विक किंवा दैवी निसर्ग हे आहे. आध्यात्म आपल्या चांगल्या भविष्यासाठी आपला दृष्टीकोन मजबूत करते. जीवनात आपल्याला नेहमीच आव्हानांचा सामना करावा लागतो, परंतु त्या कठीण काळात आपण आशावादी राहिलो तर आपण निश्चितच सक्षम होऊ शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# समाजभान.....

आधुनिक केसरी

समाज नाव ठेवील अशा तऱ्हेचे एखाद्याचे वागणे, बोलणे पाहून आपण सहज त्याला म्हणतो तुला काही समाजाचे भान आहे का? समाज काय म्हणेल ,या छत्रीतच आपण बऱ्याचदा चालत असतो. मग समाजाचे भान म्हणजे काय? जशा आपल्या मनाला, डोळ्याला काही गोष्टी वाईट वाटतात. तशाच समाजाच्याही मनाला काही गोष्टी वाईट वाटत असतात. ते भान ठेवून आपण त्या गोष्टी कराव्यात. आपण आपल्या गॅलरीत कपडे वाळत टाकतो. पण ते येता-जाता समाजाला वाईट दिसतात .याचे भान आपल्याला असावे. आपल्या घरात पंचपक्वलनाच्या पंक्ती उठत असतात .आणि दारावर आलेल्या म्हाताऱ्याला आपण एक पोळी देत नाही. दरिद्री म्हणून त्याची हेटाळणी करतो. त्याला हाकलतो. काय सांगावं तोच भगवंत असेल ! तुमची परीक्षा पाहायला आला असेल. काय करतो याचं भान असावं. बेभान जरूर व्हावं. पण भान ठेवून. आपलं अंगण स्वच्छ करायचं, दुसऱ्याच्या अंगणात कचरा लावून. हा कुठला संस्कार तुम्ही तुमच्या मुलांवर करत आहात. स्वच्छ हात धुवायचे आणि दुसऱ्याच्या अंगावर शिंतोडे उडतील एवढ्या जोरात झटकायचे. पान खाऊन रस्त्यावर थुंकणं, खिडकीतून कंगव्यातले केस फेकणे, एखाद्याला भेटण्याची वेळ देणे व आपण उशिरा जाणे. त्यांना तिष्ठत ठेवणे ,खोटे आश्वासन देणे, डोळे व कान यांचा अभाव असल्यासारखं वागणं. याला काय अर्थ आहे. जे संस्कार समाजाचे भान ठेवत नाहीत ते कसले संस्कार? आई-बाबांनो वेळीच सावरा. मुलांवर योग्य तेच संस्कार करू या...

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-52

# महर्षी वेदव्यास

आधुनिक केसरी

महाभारत हे भारतीय महाकाव्य रचणारे ऋषी वेदव्यास हे सर्वश्रेष्ठ ऋषींपैकी एक होते. त्यांचे मुळ नाव होते कृष्ण द्वैपायन. ते रंगाने काळे असल्यामुळे कृष्ण आणि त्यांचा जन्म द्वीपावर म्हणजेच बेटावर झाला होता म्हणून द्वैपायन. पराशर मुनी आणि सत्यवती हे त्यांचे आई वडील होते. त्यांनी वेदांचा अभ्यास केला. भारतात अनेक वर्षे मौखिक परंपरेनेच ज्ञान पुढच्या पिढीला दिले जात होते. मौखिक परंपरेचा अर्थ पाठांतरानेच हे ग्रंथ लोक लक्षात ठेवत होते आणि मग पुढच्या पिढीलाही पाठ करायला लावून त्यांना पिढ्यानुपिढ्या जिवंत ठेवत होते. पण अशा पद्धतीत मानवी स्मरणशक्तीवर विसंबून राहिल्यामुळे ते विस्कळीत झाले होते. कृष्ण द्वैपायन यांनी वेदांचे श्लोक गोळा केले त्यांना त्यांच्या वापर आणि प्रकारानुसार चार वेदांमध्ये विभागले. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद अशी विभागणी त्यांनी केली. आपल्या पैल, वैशंपायन, जैमिनी आणि सुमंतु अशा चार शिष्यांना प्रत्येकी एक वेद शिकवून त्याच्या प्रसाराची जबाबदारी दिली. वेदांचे विभाजन करून सुसूत्रीकरण केल्यामुळे त्यांना वेदव्यास किंवा नुसते व्यास असे नाव पडले. व्यास म्हणजे विभाजन करणारा. त्यांनीच महाभारत सुद्धा लिहिले. ह्या कुरुवंशाच्या इतिहासात ते एक प्रमुख पात्र सुद्धा होते. कौरव पांडवांचे वडील धृतराष्ट्र, पांडू आणि त्यांचा भाऊ विदुर हे व्यासांचे नियोग पद्धतीने झालेले पुत्र होते. त्यामुळे कौरव पांडव हे व्यासांचे या पद्धतीने नातू लागत होते. त्यामुळे एक प्रकारे आपल्याच वंशात झालेल्या युद्धाचा वृत्तांत त्यांनी सविस्तर लिहिला. महाभारतामध्ये चांगले वाईट, शूर आणि भेकड, न्यायी आणि अन्यायी, जातीभेद, भेदांच्या परे असलेले नातेसंबंध, मित्र अशा हर प्रकारची पात्रे आहेत. आणि त्यासोबतच पौराणिक कथा, अनेक उपकथानके, तत्वज्ञान, प्रेम, युद्ध, राजकारण, मनुष्य स्वभाव, भारत देशाचा भूगोल, इतिहास इत्यादी अनेक विषयांवर वर्णन आहे. त्यामुळेच "व्यासोच्छिष्ट्म जगत सर्वम" असे म्हटले जाते त्याचा अर्थ व्यासांनी जगातला कुठलाच विषय सोडला नाही असा होतो. व्यास अत्यंत विद्वान होते त्यामुळेच त्यांच्यासाठी महाभारत लेखनाची जबाबदारी गणपतीनेसुद्धा स्वीकारले व्यासांनी महाभारत सांगितले आणि ते गणपतीने लिहून घेतले.

# "निरुपण"

आधुनिक केसरी


## भक्ती

न मागे कुणाला कधी लेकरा तू
तिचे पादपद्मी, मना बैसवी तू |
दिले जे तिने ते कधी ना सरे रे
तिला सांग जे जे हवे ते तुला रे ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

# भगवंताशी नाते जोडावे



आधुनिक केसरी

भगवंताचे नाम मुखातून न येण्यापेक्षा मुकेपण बरे नाही का ? दृष्टी जर भगवंताची मूर्ती पाहात नसेल तर ती दृष्टी काय कामाची ? आपले कान जर त्याची कीर्ति ऐकत नसतील तर ते कान काय कामाचे ? डोळ्यांनी भगवंताची मूर्ती पाहणे, मुखाने भगवंताचे नामस्मरण करणे, कानांनी त्याचेच गुणानुवाद ऐकणे, हाच खरा अभ्यास आहे. भगवच्चरित्र ऐकायचे कशासाठी ? तर त्याप्रमाणे वागण्यासाठी. भगवत्प्राप्तीसाठी एक सुलभ उपाय आहे. भगवंताशी आपले नाते जोडावे. कोणते तरी नाते लावावे. भगवंत हा माझा स्वामी आहे, मी त्याचा सेवक आहे; तो माता, मी लेकरू; तो पिता, मी पुत्र; तो पती, मी पत्नी; तो पुत्र, मी आई; तो सूत्रधार, मी बाहुले; असे काही नाते लावावे. मुलगा दत्तक घेतल्यावर मग त्याच्याशी पुत्रप्रेम लावतो की नाही ? लग्न होण्यापूर्वी कोण नवरा आणि कोण बायको ? पण लग्न होताच ते नाते लावतो, आणि सहवासाने प्रेम वाढवितो. प्रेम केल्याने प्रेम वाढते. तसे भगवंताविषयीचे प्रेम कोणचे तरी नाते लावून वाढवावे. किंबहुना तो स्वभावच व्हावा, म्हणजे भगवद्प्राप्ती सुलभ होते. हनुमंताने दास्यभक्ति केली, रामाला आपल्या हृदयातच ठेवले. गुहकाचे रामावर तसेच प्रेम होते. रावणाने शत्रू म्हणून, भरताने भाऊ म्हणून, सीतामाईने पती म्हणून, बिभीषणाने मित्र म्हणून, हनुमंताने स्वामी म्हणून, भगवंताला आपलासा करून घेतलाच. ज्या गावात मारुती नाही त्या गावात राहूच नये. मारुती गावात नसेल तर निदान आपल्या घरी तरी ठेवावा. घरात देवाची उपासना करावी. घर हे मंदिराप्रमाणे असावे. परान्न म्हणजे दुसऱ्याने मिळविलेले अन्न. आपण घरी जे अन्न खातो ते देखील परान्नच आहे, कारण अन्नदाता परमात्माच आहे. त्याचे स्मरण ठेवून अन्न खावे. चवीला बळी न पडता, जरूर असेल तेव्हा आणि तेवढेच खाणे, याचे नाव सात्त्विक आहार होय. मुख्य म्हणजे, प्रत्येक गोष्टीत भगवंताची आठवण राहिली पाहिजे. मग ते खाणे, पिणे, गाणे, बजावणे, हिंडणे, काहीही असो. गायनामध्ये ठरलेल्या सुरात शब्द म्हणायचे असतात, त्यामध्ये भगवंताची आठवण राहणे कठीण असते. गायन हे करमणुकीकरिता असले तरी भगवंताला अशा प्रेमाने आळवावे की त्याच्या डोळ्यांत पाणी यावे. राम आपल्या जरूरीपुरते कुठेही देतो, म्हणून भगवंत देईल त्यात समाधानाने राहायला शिकावे. प्रपंचात दुःखप्रसंग आले म्हणजे मग रामस्मरण होते; तसे ते सर्व काळी करावे. रामावर श्रद्धा पूर्ण असावी, म्हणजे आपली काळजी त्याला वाटते. **आजचे बोधवचन आहे** – भगवंताच्या नामात राहिल्यावर त्याला आपलासा करून घ्यायला निराळे काही करण्याची जरूरी नसते. श्रीराम समर्थ

# मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**विधी निर्मिता लीहितो सर्व भाळी।**
**परी लीहिता कोण त्याचे कपाळी।**
**हरू जाळीतो लोक संव्हारकाळी।**
**परी सेवटी शंकरा कोण जाळी।।१७५।।**

**श्लोकार्थ :**
सृष्टी निर्माण करणारा ब्रह्मदेव प्राण्यांच्या कपाळावर त्यांचे भविष्य लिहितो. त्या ब्रह्मदेवाच्या कपाळावर त्यांचे भविष्य लिहिणारा कोण बरें आहे ? विश्व संहार करणारा श्रीशंकर प्रलयकाळी विश्व जाळतो. त्या श्रीशंकराला जाळणारा कोण बरं आहे ?

**विवेचन :** इथून पुढील पाच श्लोकांत समर्थ आपल्याला देवाच्या श्रेष्ठत्वाची जाणीव करून देत आहेत. दाशरथी राम सर्वांना माहीत आहे, परंतु खऱ्या देवाची म्हणजेच आत्मारामाची ओळख होणे अत्यंत महत्वाचे, नव्हे हेच मानवी जीवनाचे मुख्य ध्येय..! निर्गुण असलेला भगवंत भक्तासाठी सगुण रुपात अवतरला. सगुणाची पूजा करूनच निर्गुण जाणता येते. परंतु सगुण आणि निर्गुण जाणताना मनुष्याने त्रिगुणातीत असलेला आत्माराम जाणून घ्यायला हवा असे समर्थ आपल्याला सांगतात. आपल्याकडे तेहतीस कोटी ( तेहतीस प्रकारचे ) देव आहेत, परंतु या

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६



देवांचाही देव जो आत्माराम त्याला जाणले पाहिजे, असे सर्व समर्थ सांगतात.
समर्थ दासबोधातील नवव्या दशकाच्या पाचव्या समासात म्हणतात,"ब्रह्यानें सकळ निर्मिलें । ब्रह्यास कोणें निर्माण केलें । विष्णूनें विश्व पाळिलें । विष्णूस पाळिता कवणु ॥ २४ ॥ रुद्र विश्वसंव्हारकर्ता । परी कोण रुद्रास संव्हारिता । कोण काळाचा नियंता । कळला पाहिजे ॥ २५ ॥"
मनुष्याचा जन्म झाला की त्याच्या भालावर ( कपाळावर ) सटवी त्याचे भाग्य लिहिते अशी आपली मान्यता आहे.
साधारणपणे यात मनुष्याचा जीवनात काय काय घडणार, तो कोणत्या क्षेत्रात कर्तृत्व गाजविणार तसेच त्याचा मृत्यू कधी होणार हे सर्व लिहिलेले असते, असे मानले जाते.
सृष्टीच्या पालनाची जबाबदारी या जगनियंत्याने ब्रह्मा, विष्णू आणि महेश्वर यांच्यावर सोपवली आहे असे म्हणता येईल.
यामध्ये जीवसृष्ठीची उत्पत्ती ब्रम्हदेव करतात, सृष्टीचे पालन पोषण भगवान विष्णू करतात तर सृष्टीचा विनाश करण्याचे कार्य भगवान शंकराचे आहे. निर्मिती आहे म्हणजे त्याचा कोणी निर्माता आहे असे सामान्य सूत्र आहे. याचा अर्थ ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचा कोणी निर्माता आहे...! त्याला जाणून घेणे हे मनुष्याचे मूळ ध्येय. तोच आहे आत्माराम. जो सर्वत्र आहे, सर्व व्यापून आहे. साधकाचे मुख्य ध्येय पुढील प्रमाणे असावे, असे समर्थ आपल्याला सूचित करतात.
ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता तोचि थोर । तो ओळखावा परमेश्वर । नाना यत्नें ॥"

# 26 जानेवारीपर्यंत फलक लावले नाही तर आरोग्य मित्र महाराष्ट्र घेणार ॲक्शन

## चंदुलाल बियाणी : रुग्णालयातील औषधी दुकानातून औषधी खरेदी करण्याची सक्ती न करण्याच्या शासन निर्णयाचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** रुग्णालयातील औषधी दुकानातूनच रुग्णांनी औषधांची खरेदी करावी अशी सक्ती नाही, रुग्णालयातील रुग्ण व त्यांचे नातेवाईक कोणत्याही परवानाधारक औषध विक्रेत्याकडून औषधांची खरेदी करु शकतात,असा महत्वपूर्ण व रुग्णांच्या हिताचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच अशा आशयाचा फलक ठळकपणे संबंधित रुग्णालयांनी रुग्णांना दिसतील अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करावा,असे आदेश काढले आहेत. शासनाच्या हा निर्णय स्वागतार्ह असून डॉक्टर व रुग्णालयांनी तत्काळ याची अंमलबजावणी करावी. येत्या 26 जानेवारीपर्यंत जर या निर्णयाची अंमलबजावणी डॉक्टर व रुग्णालयांनी केली नाही तर आरोग्य मित्र महाराष्ट्रच्या वतीने सदरील फलक लावण्यात येतील, असा इशारा आरोग्य मित्र महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष चंदुलाल बियाणी, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. प्रभू गोरे यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना पाठवण्यात आले आहे. निर्णयाची सविस्तर माहिती अशी की, सर्व विभागीय सह आयुक्त, सहायक आयुक्त व औषध निरीक्षक (औषधे) यांना कळविण्यात येते की, रुग्णांना रुग्णालयातील औषधी दुकानातून औषधी खरेदी करण्याची सक्ती केली जाते अशा तक्रारी वारंवार प्रशासनास प्राप्त होत आहेत. अशा प्रकारे रुग्णालयाने त्यांचे संलग्न दुकानातूनच औषधे खरेदी करण्याची रुग्णांना सक्ती करणे ही बाब नियमबाहय आहे. तरी या अनुषंगे आपणांस कळविण्यात येते की, रुग्णालयातील औषधी. दुकानातूनच रुग्णांनी औषधांची खरेदी करावी अशी सक्ती नाही, रुग्णालयातील रुग्ण व त्यांचे नातेवाईक कोणत्याही परवानाधारक औषध विक्रेत्याकडून औषधांची खरेदी करु शकतात अशा आशयाचा फलक ठळकपणे संबंधित रुग्णालयांनी रुग्णांना दिसतील अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करावा, अशा सूचना आपले मार्फत आपले विभागातील सर्व रुग्णालयातील परवानाधारक औषध विक्रेत्यांना देण्यात याव्यात, असे शासन निर्णयात म्हटले आहे. रुग्णाच्या हिताच्या या निर्णयाची सर्व डॉक्टर व रुग्णालयांनी तत्काळ अंमलबजाणी करावी,असे आवाहनही शेवटी चंदुलाल बियाणी यांनी केले आहे.

# फुलंब्री-खुलताबाद रोडवरील दुभाजक धोकादायकच

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** शहरातून जात असलेल्या फुलंब्री - खुलताबाद रोडच्या बाजूला दुभाजक बनवण्यात आले असून तरी ते धोकादायकच आहे, कारण की एकदा दोन मोठी वाहने पास होणे अवघड झाले आहेत. फुलंब्री शहरातील खुलताबाद रोडच्या साईटला दुभाजक बनवण्यात आले असून तरी ते धोकादायकच होय. मागील काही महिन्यांपूर्वी एका दुचाकी धारकांचा ट्रकच्या धडकेत दुभाजकला धडकुन मृत्यू झाला होता. तरी पण सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत. हा रोड दोन पदरी बनला असला तरी काही कामाचा नाही अजुनही ते धोकादायक बनला आहे. फुलंब्रीपासून तर पिंपळगाव वळण फाट्या परिसरा पर्यंत एक ते दिड किलोमीटर अंतरावर साईटला डिव्हाईडर बनवण्यात आले आहे . ते चुकीच्या पद्धतीने बनवण्यात आले असून तरी पण सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत. या रस्त्यावरून दररोज हजारो वाहने



प्रवास करत असतात यात दुचाकी धारकांना आपला जीव मुठीत धरून दूचाकी चालावे लागते. रस्ता बनला दुपदरी त्यातही दुभाजक जवळ बनले, भविष्यात पुन्हा या अपघात होईल असे कोणाला सांगता येत नाही.

# सदिच्छा भेट



बीड येथे शनिवार दिनांक १० डिसेंबर२०२२ रोजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड व पालकमंत्री अतुल सावे यांनी लोकसत्ता प्रतिनिधी तथा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. सोबत दैनिक लोकप्रभाचे मुख्य संपादक संतोष मानूरकर.

# गांजा सहित 14 लाखांचा माल जप्त

आधुनिक केसरी न्यूज


**धुळे :** सकाळी एका स्विफ्ट कारचा संशय आल्याने वाहनचालकाला वाहन थांबविण्याची सूचना करुनही तो सुसाट वेगाने पळाला. सोनगीर पोलिसांनी शिताफिने त्याचा पाठलाग करण्यास सुरवात केली. तेव्हा भेदरलेल्या वाहनचालकाने कार सरवड फाट्यावर सोडून पोबारा केला. पोलिसांनी कारची झडती घेतली असता त्यातून तब्बल ९ लाख ५६ हजार ४८० रूपयांचा ओला गांजा मिळून आला. या कारवाईत तब्बल १४.५६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश आले. यासंदर्भात अधिक वृत्त असे की, आज पहाटे पाच वाजेच्या सुमारास सोनगीर टोल नाक्याजवळ गस्ती पथकाला संशय आल्याने स्विफ्ट डिझायर कारला थांबण्याचा इशारा केला. मात्र, चालकाने कार सरवड गावाच्या दिशेने वेगात नेली. दरम्यान पोलिसांचा संशय अधिक बळावल्याने त्यांनी कारचा पाठलाग केला. मात्र चालक कार रस्त्याच्या कडेला लावून पसार झाला. यावेळी कारची तपासणी केली असता या कारमधून ११९.५६० कि.ग्रॅम वजनाचा ओला गांजाची पाकिटे आढळून आली.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# जी-२० चे अमृतपर्व आणि मोदींचे यश शिखर



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**भाजपचे जनसमर्थन युवकांच्या आशाआकांक्षाचे प्रतिक आहे.गरिब,दलित,शोषित,पीडित आणि महिलांच्या विकासासाठी भाजप वचनबद्ध आहे.विकासाची फळे शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्याचा हा संकल्प आहे,असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विजय सभेत बोलताना केले.त्याचे प्रतिबिंब प्रस्तुत लेखात उमटले आहे.राजकीय-समाजशास्त्र दृष्टीने हे विश्लेषण महत्वाचे ठरते. जी-२० परिषदेचे नेतृत्व भारताकडे आले आणि संबंध जगाच्या भारताविषयीच्या अपेक्षा उंचावल्या. जी-२० शिखर परिषद म्हणजे स्वातंत्र्यानंतर भारताने संपादन केलेल्या परराष्ट्र धोरणातील यशाचे एक महत्त्वाचे शिखर म्हटले पाहिजे. या परिषदेनंतर भारताची घोडदौड सुरु झाली आहे. भारताचा विकास वेग हा ७.९ टक्क्यांवर वाढला आहे आणि संबंध जगामध्ये भारताची एक विश्वगुरु अशी प्रतिमा उजळ होत चालली आहे. याच पार्श्वभूमीवर झालेल्या गुजरात, हिमाचल प्रदेश आणि दिल्ली महापालिकेच्या निवडणुकीचे विश्लेषण केले पाहिजे. या निवडणुकांनी भारतातील लोकशाही मजबूत आणि भक्कम असल्याचे सिध्द झाले आहे. या तिन्ही राज्याच्या निवडणुकीत एक कोठे ही हिंसाचार झाला नाही आणि लोकांनी मतपेटीच्या माध्यामातून आपल्या यथार्थ भावना प्रकट केल्या. त्यामुळे या तिन्ही निवडणुकांचे अर्थ आणि विश्लेषण करत असताना भारतीय लोकशाहीची प्रगल्भता पुन्हा एकदा सिध्द झाली आहे.**

**मोदींचे गुजरात मॉडेल :**
गुजरात विधान सभेमध्ये भुपेद्र पटेल यांनी नरेंद्र मोदी यांचा रेकॉर्ड मोडला आणि त्यांनी आपला नवा रेकॉर्ड सिध्द केला. या विधानसभेत भाजपाला १५६ जागा मिळाल्या आणि उर्वरित जागामध्ये इतर पक्ष विभागले गेले. हे प्रचंड बहुमत आजवरचे सर्व रेकॉर्ड मोडणारे आणि नवे विक्रम प्रस्थापित करणारे ठरले आहे. गुजरातमध्ये सातव्यांदा भाजपाचे सरकार आले. याचे खरे कारण म्हणजे येथील सामाजिक व आर्थिक विकासाचे कार्य होय. भारतीय जनता पक्षाने महिलांच्या विकासाला हि प्राध्यान दिले. शिवाय दलित, शोषित, वंचित, आदिवासी यांच्या विकासावर सुध्दा विशेष योजना तयार केल्या आणि त्या प्रामाणिकपणे कृतीत आणल्या. त्यामुळे गुजरातच्या सर्व प्रदेशात मग उत्तर गुजरात असो, दक्षिण गुजरात असो कि, सौराष्ट्राचा प्रदेश असो या सर्व प्रदेशातून भारतीय जनता पक्षाला मतदारानी भरघोस कौल दिला. शिवाय आणखी एक गोष्ट अशी की, भारतीय जनता पक्षाला हिंदू, मुस्लिम, दलित, शोषित अशा सर्व जातिधर्माच्या मतदाराकडून प्रतिसाद मिळाला आहे. तसेच भारतीय जनता पक्षाच्या मताची टक्केवारी तर वाढली आहे. शिवाय नरेंद्र मोदी यांनी भूपेंद्र पटेल यांच्यासारखा एक नवा चेहरा आणला आणि नव्याने मंत्रिमंडळ निर्माण केले होते. त्यांच्या नव्या तरुण चेह-याला आणि त्यांच्या मंत्रिमंडळालातील कामकाजाला लोकांनी मोहर दिली आहे आणि मान्यता दिली आहे, असेच म्हणावे लागेल. कुठल्याही प्रदेशाच्या विकासात शेती, उद्योग, शिक्षण व आरोग्य आणि सामाजिक सुरक्षिततेचे उपक्रम याला फार महत्त्व असते. यादृष्टीने विचार करता गुजरात मध्ये मोदी यांच्या काळापासून सिंचन सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. शिवाय लोकांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न त्याने यथार्थपणे सोडविला आहे. 'हर घर जल' ही योजना गुजरात मध्ये जवळजवळ पूर्णपणे यशस्वी झाली आहे. त्याचप्रमाणे उद्योग क्षेत्रात परकिय गुंतवणूक आणण्यास गुजरात यशस्वी झाले आहे. अनेक देशातून गुजरात मध्ये मोठमोठे उद्योग आले आहेत आणि तरुणांना रोजगार ही उपलब्ध होत आहेत. गुजरातमध्ये चाळीसहून अधिक विद्यापीठ कार्यरत आहेत. दिनदयाल पेट्रोल रिफायनरी युनिर्व्हसिटी यासारख्या अभिनव विद्यापीठाने एक नवे क्षेत्र विकसित केले आहेत. इंफ्रास्ट्रक्चर डेव्हल्पमेंट म्हणजे संरचनात्मक विकासासाठी संशोधन संस्था उभ्या करणारे गुजरात हे भारतातील एकमेव राज्य आहे. शेती उद्योगाप्रमाणेच शिक्षण क्षेत्रातही नवे अभिनव प्रयोग करुन लोकाभिमुख शिक्षण, व्यवसायभिमुख शिक्षण देण्यात गुजरातने नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात गुजरातने सुरुवात केली आहे. येथील मध्यम वर्ग, तसेच दलित शोषित वर्ग आणि विशेषतः नव तरुण मतदार यांना आपल्याकडे खेचण्यात भारतीय जनता पक्षाला यश आले आहे. अनुसूची जाती – जमाती व आदिवासी क्षेत्रात भारतीय जनता पक्षाने ८०% जागा पटकाविल्या आहेत. तेव्हा गुजरातने आपले जुने रेकॉर्ड मोडून नवे रेकॉर्ड प्रस्थापित केले आहे, असे म्हटले जाईल.

**दिल्ली मधील नवा बदल :**
दिल्ली मध्ये पुर्वी तिन महापालिका होत्या. त्यांचे विसर्जन करुन एकच महापालिका प्रस्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि यादृष्टीने या महापालिकेवर आपली सत्ता राहावी असा भाजपाचा प्रयत्न होता. मागील पंधरा वर्षात दिल्लीच्या महापालिकेवर भाजपची सत्ता असताना लोकांनी पुन्हा आम आदमी पक्षाला सत्ता का दिली? कशी दिली ? याचे विश्लेषण राजकीय पंडीत करत आहेत. पण ऐवढे मात्र खरे की भारतीय जनता पक्षाकडे एक प्रभावी असा नेता, एक प्रभावी असा चेहरा, साहेबसिंग वर्मा हे ग्रंथपालनशास्त्र विभागाचे प्राध्यापक व ग्रंथपाल होते. त्यांच्या अपघाती मृतूनंतर भारतीय जनता पक्षाला दिल्ली मध्ये प्रभावी असा चेहरा मिळालेला नाही. अरविंद केजरीवाल यांच्याशी टक्कर देणारा आणि लोकांची नाडी ओळखणारा आणि लोकांच्या कल्याणासाठी कार्यक्रम व उपक्रम करणारा नेता दिल्लीला हवा आहे. भारतीय जनता पक्ष या निवडणुकीनंतर दिल्लीमध्ये नेतृत्व बदल करण्याची शक्यता आहे, असे बोलले जात आहे. खरोखरच भारतीय जनता पक्षाने असा एखादा अष्टपैलू नेता, लोकसेवक निवडला पाहिजे. जो अरविंद केजरीवाल यांच्या तोडीसतोड काम करु शकेल. केजरीवाल यांनी शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा या क्षेत्रामध्ये जी काही कामे केली त्या कामास लोकांनी प्रसंती दिली आहे, असे म्हणावे लागेल. त्यांच्या दुस-या फळीतील सिसोदीया यांच्यासारख्या नेत्याने अनेक अडचणी असूनही पक्ष नेतृत्वाच्या भूमिका लोकांसमोर मांडल्या. आता भारतीय जनता पक्षांनी जास्त गाफील न राहता अधिक जबाबदारीने आणि उत्तम प्रकारे आप पेक्षाही चांगले काम करावे लागेल. लोकांच्या गरजा, आशा-आकांक्षा आणि त्यांचे जिव्हाळयाचे प्रश्न या बाबतीत सतर्कता ठेवून जर भारतीय जनता पक्ष लोकांची सेवा करु शकला, तर पुढील वेळी दिल्लीमध्ये पुन्हा एकदा भारतीय जनता पक्ष प्रस्थापित होऊ शकेल.

**लोकशाहीची भावी दिशा :**
ह्या तीन राज्यातील निवडणूका म्हणजे २०२४ च्या निवडणुकीचा ट्रेलर होय . यावरुन असे दिसते की, गुजरातचे मॉडेल हे विकासाचे मॉडेल आहे आणि या मॉडेलचा प्रभाव संपूर्ण देशभर पडणार. भविष्यात भारतीय जनता पक्ष दक्षिणेतील राज्यामध्ये म्हणजे आंध्रप्रदेश, तामिळनाडू, तेलंगना, केरळ, कर्नाटक, पाँडेचरी या सर्व राज्यामध्ये भारतीय पक्षाला चांगली कामगिरी करावी लागेल. दक्षिण भारतात भारतीय जनता पक्ष जर प्रत्येक राज्यामध्ये निम्म्यापेक्षा अधिक जागा मिळवू शकता तर लोकसभेतील भारतीय जनता पक्षाचे आजचे संख्याबळ पन्नासने नक्कीच वाढेल, असे चित्र आहे आणि सुनील देवधर यांचे व्यूहरचनात्मक प्रयत्न नवी दिशा देऊ शकतो. मध्यप्रदेश, महाराष्ट्र, राज्यस्थान, कर्नाटक या राज्यात भाजपची पकड चांगली आहे. काही राज्यामध्ये सरकारे काँग्रेसची असले, तरी देखील भारतीय जनता पक्ष हा केडर पक्ष आहे. या पक्षाचे कार्यकर्ते जबाबदारीने कार्य करतात. त्यामुळे पश्चिम भारतातील चार-पाच राज्यात भारतीय जनता पक्ष नक्कीच पुढे आहे. आता दक्षिणेतसुध्दा भारतीय जनता पक्षाने चांगली कामगिरी केली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या करिष्मा व प्रभाव दिसून आला तर २०२४ च्या निवडणूकातील भारतीय जनता पक्ष सध्या असलेल्या संख्याबळापेक्षा अधिक पन्नास जागा अधिक मिळवू शकेल आणि पुन्हा एकदा या भारताला स्थिर सरकार व भक्कम सरकार देवू शकेल. अमृतपर्व स्वातंत्र्याची ७५ वर्ष झाली आणि आता पुढील २५ वर्षात शताब्दीकडे वाटचाल करत आहो. याला अमृतपर्व असे म्हटले आहे. या अमृतपर्वात अधिक चांगली कामगिरी करणे अधिकाधिक लोकांचा अधिकाधिक विकास करणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. कल्याणकारी राज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे 'राजकीय लोकशाहीचे सामाजिक व आर्थिक लोकशाहीत रुपांतर करणे महत्त्वाचे आहे.' या दृष्टीने घटनेच्या मार्गदर्शनतत्त्वात आपणास जी काही अभिवचन देण्यात आले आहे. त्याचा काळजीपूर्वक अभ्यास करुन भारतीय जनता पक्षाचे नेते वाटचाल करीत आहेत. भारतीय जनता पक्षाचे गुजरात मधील विकासाचा कार्यक्रम व त्यांचा जाहिरनामा यांचा अभ्यास केला असता असे दिसते की, भारतीय जनता पक्षाने उजवे, डावे, मध्यममार्गी असे सर्व विकास कार्यक्रम एकत्र केले आहेत व आपला जाहिरनामा विकसित केला आहे. त्यामुळे भारतीय काँग्रेस पक्ष, कम्युनिस्ट पक्ष आणि आप सारख्या पक्षांचे विकासविषयक कार्यक्रमांचा काळजीपूर्वक अभ्यास करून भारतीय जनता पक्षाने आपल्या विकासाचा नवा अजेंडा बनविला आहे. आणि हा अजेंडा भविष्यकाळात प्रभावी ठरेल आणि तो जनतेच्या पसंतीस उतरेल असे आजचे चित्र गुजरातच्या निवडणुकीने दाखविले आहे. विशेषतः जी-२० परिषदांच्या निमित्याने देशभर वेगवेगळया २० शहरातून जी-२० परिषदेचे यश व त्याचे कार्यक्रम यांची अमंलबजवणी सुरुवात झाली आहे. उदयपूर येथे जी-२० परिषदेची पहिली बैठक झाली आणि या बैठकीत तेथील स्थानिक उद्योजक, शिक्षणतंत्र, विचारवंत, या सर्वांना सामावून घेण्यात आले आणि जी-२० परिषदेची जी बैठक उदयपूर येथे झाली तीचा डंका राज्यस्थानात वाजत आहे. आता पुढील बैठक भारताची आर्थिक राजधानी मुंबई येथे होणार आहे. शिवाय देशातील इतर भागामध्ये सुध्दा महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर यासारख्या शहरात सुध्दा जी-२० परिषदेच्या बैठका होणार आहेत. जी-२० परिषदेच्या बैठकांच्या रुपाने विकासाचे कार्यक्रम आणि भारताचा परराष्ट्र धोरणातील एक यशस्वी वाटचाल करण्याच इरादा अधिक प्रभावी होत आहे. भारत जगामध्ये एक सशक्त राष्ट्र म्हणून उदयास आलेला आहे आणि आपला विकास वेग वाढला आहे. तसेच सरंक्षण क्षेत्रात निर्यात करत आहे. आपले नौदल भक्कम आहे. आपले लष्कर जगातील प्रमुख बलशाली लष्करांपैकी एक आहे. संरक्षण व्यवस्था मजबूत आहे. तसेच आपण शेती क्षेत्रात स्वावलंबी झालो आहोत आणि अन्नधान्यांची निर्यात करण्यास सुरुवात केली आहे. दुध उत्पादनात, भाजीपाला उत्पादन आणि फलोत्पादनात भारत पहिल्या क्रमांकावर आहे. तसेच उद्योग क्षेत्रामध्ये परकिय गुंतवणूकीत मोठया प्रमाणात चालना दिली जात आहे. आणि इतर व्यवसायात गुणवत्ता आणि जगाच्या बाजारपेठेत आपल्या वस्तू व सेवा मेकिंग इंडियाच्या स्वरुपात पुढे जात आहेत. स्टार्टअप मध्ये भारत दुस-या क्रमांकावर आलेल्या आहे. हे सर्व चित्र पाहाता व नव्या शैक्षणिक धोरणाची गतीने अमंलबजावणी करण्याचा प्रयत्न चालू आहे. तसेच आरोग्य क्षेत्रात भारताने कोविडच्या नियंत्रणात चीन, अमेरिका यांच्यापेक्षाही जबरदस्त कामगिरी केली आहे. आणि गरीब माणसांचे आरोग्यविषयक जीवन अधिक सुखी आणि सुरक्षित केले आहे. सामाजिक सुरक्षा, आर्युविमा या क्षेत्रात महत्त्वपूर्ण वाटचाली होत आहेत. हे सर्व पाहता २०२४ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आपला मागचा रेकॉर्ड मोडून नवा रेकॉर्ड प्रस्थापित करेल यात शंका नाही. आणि हाच या तिन्ही राज्यातील निवडणुकीचा अर्थ होय असे म्हणावे लागेल.



**हिमाचलचा नवा अर्थ :** हिमाचल प्रदेशामध्ये दरवेळी सरकार बदलण्याची परंपरा आहे. ती येथील मतदारांनी कायम ठेवली आहे, हे खरे असले तरी देखील भारतीय जनता पक्षाची मताची टक्केवारी फार कमी झालेली नाही. काँग्रेसच्या मतामध्ये एक टक्क्याची वाढ झाली आणि एका टक्क्यांने मतदान वाढल्याने भारतीय जनता पक्षाच्या १५ ते १६ जागा कमी झाल्या म्हणजे याचा अर्थ असा होतो की, एक टक्क्यांनी सुध्दा मतदानात झालेला बदल हा किती मोठा बदल घडवून आणू शकतो, हे हिमाचलने दाखवून दिले आहे. लोकशाहीमध्ये दर पाच वर्षांनी सरकार बदलण्याचा आणि नव्या लोकांना संधी देण्याचा हा प्रघात काही राज्यांनी भारतात टिकवून ठेवला आहे. त्यापैकी हिमाचल प्रदेश हे एक जबाबदार राज्य आहे. येथे निवडून आलेल्या काँग्रेस पक्षाला हिमाचल प्रदेशातील विकासासाठी अधिक चांगले काम करणे आवश्यक आहे. कारण त्यांना फक्त एक टक्का जास्त मते मिळाली आहेत. पुढील पाच वर्षानी पुन्हा जनता बदलाची प्रक्रिया घडवून आणू शकते. त्यामुळे हिमाचलमध्ये सरकार किती जबाबदार, लोकभिमुख आणि उत्तरदायी कामे करते यावरच त्याची कामगिरी अवलंबून असते. आमदारांचे व सरकारचे प्रगती पुस्तक ठेवण्यामध्ये हिमाचलची जनता फार मोठी हुशार आहे, चतुर आहे. योग्यवेळी योग्य निर्णय घेणे हे मतदारांनी दाखविले आहे. तेव्हा हिमाचल प्रदेशातील विजयाचा अर्थ लक्षात घेवून काँग्रेसने अधिक जबाबदारीने कामे केली पाहीजे. कारण सत्ता, सेवा आणि समर्पण या गोष्टीला फार महत्त्व आहे. तारेवरची कसरत करत करत काँग्रेस पक्षाला लोकभिमुख सरकार प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. भारतीय जनता पक्ष एक जबाबदार विरोधी पक्ष म्हणून काम करेल आणि हिमाचल प्रदेश मधील जनतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम प्रामाणिकपणे राबवित राहील, असा ही विश्वास पंतप्रधानानी आपल्या भाषणात व्यक्त केला आहे.

**विकासाचे नवे मॉडेल :**
मागील २०१४ च्या निवडणुकीत गुजरातचे मॉडेल हे विकासाचे मॉडेल आहे. ते मॉडेल भारतामध्ये नरेंद्र मोदी यांनी पसरविले आणि त्यास मान्यता मिळवली आहे. हीच गोष्ट २०१९ च्या निवडणुकीत सुध्दा घडून आली. गुजरात मॉडेलने पुन्हा एकदा देशभर लौकिक मिळविला आणि आता तर गुजरात मॉडेलने ज्यापध्दतीने पसंतीक्रम मिळविला आहे तो पाहता २०२४ च्या निवडणुकीत सुध्दा गुजरातच्या विकासाचे मॉडल देशभर प्रभाव टाकणारे ठरेल यात तिळमात्र शंका नाही. गुजरातमध्ये आम आदमी पक्ष काही चमत्कार करेल असे वाटत होते. पण तसे काही घडले नाही. या पक्षाला मिळालेला प्रतिसाद फारसा लक्षात घेण्याजोगा नाही. त्यांनी ज्या पध्दतीने वातावरण निर्मीती केली होती. त्याप्रमाणात त्यांना पंजाब राज्याप्रमाणे यश मिळाले नाही. हि वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आम आदमी पक्ष याला मताची योग्य प्रमाणात वाढ झाल्यामुळे राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळण्याची चिन्हे असून देखील हा पक्ष दक्षिणेतील राज्यामध्ये लक्षवेधी काम करु शकेल असे वाटत नाही. गुजरात मधील विकासाचे मॉडेल हे सर्वसमावेशक मॉडेल आहे ‘सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास,सबका प्रयास’ हे या कल्पनेचे प्रत्यक्षात रुपांतर करणारे ठरले आहे. त्यामुळे या मॉडलला गुजरातमध्ये शहरी, ग्रामीण, मध्यम वर्गीय, पददलित अशा सर्व वर्गातील लोकांनी प्रतिसाद दिला आहे. आणि एकूण मताची वाढलेली टक्केवारी आणि जागांचे प्रमाण पाहता शिक्षित मुस्लिम मतदारांनी सुध्दा भाजपकडे कौल दिला आहे, असे लक्षात येते. त्यामुळे समाजातील सर्व स्तरातून मिळालेला प्रतिसाद हेच भूपेंद्र पटेल यांच्या विजयाचे ख-या अर्थाने रहस्य म्हणता येईल. या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली येथे केलेले भाषण हे उत्कृष्ट संदेशवहन करणारे भाषण म्हटले पाहिजे. तसेच त्यातील मॅसेजींग त्यांनी इतक्या कुशलतेने केले आहे की, त्यांनी त्यात मतदारांचे विनम्रपणे आभार मानले आहे आणि हे ही सांगितले की, आम्ही लोकांच्या आशा-आकांक्षाची पूर्तता करण्यासाठी वचनबध्द आहोत. आणि नजिकच्या काळात ‘विकास आणि समग्र विकास’ हेच आपले लक्ष आहे. आणि असा विकास करताना लोकांभिमुख दृष्टीकोन ठेवून सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वाचे उपक्रम यशस्वी करण्यावर त्यांचा विशेष भर आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# काँग्रेसच्या 'औकात' ला गुजरातचे उत्तर!



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


आधुनिक केसरी

**देशात गुजरात,हिमालय प्रदेश दिल्ली महापालिकेच्या निवडणुकीचा निकाल वेगवेगळे लागले आहेत.मतदारांनीदिल्ली मनपाची सत्ता आपच्या हातात दिली.तर हिमाचलप्रदेशची सत्ता काँग्रेसकडे तर गुजरातचा भाजपा गड कायम ठेवला आहे.भाजपाला दिल्ली मनपात सत्ता आणता आलेली नाही.या भाजपाने आपमभील दारू,आरोग्य विभागाचे घोटाळे चव्हाट्यावर आणले. आपचे मंत्री सत्येंद्र जैन यांना जेलमध्ये असून अलिशान हॉटेलसारख्या सोयी दिल्या जात आहेत. आपचे नेते कट्टर भ्रष्टाचारी असल्याचा आरोप भाजपाने करत पक्षाचे वस्त्रहरण केले. पण दिल्लीकरांनी पाणी व शिक्षण, मोफत वीजे बीलाला भुलले आहेत.**

आप'ने निवडणुक जिकंण्यासाठी 'रेवडी संस्कृती' सुरु केलेली आहे,ही लोकशाहीसाठी घातक ठरणार आहे.दिल्ली मनपात आम आदमीला १३४ तर भाजपाला १०४ तर काँग्रेस ९ जागा मिळाल्या आहेत.यात भाजपा पराभव झाला असला पक्षाचा 'सुपडासाफ' झाला असे म्हणता येणार नाही. आपचे नेते संजय सिंह यांचा 'उताळपणा' दिसून आला. त्या राष्ट्रीय पातळीवर मोदी विरूध्द केजरीवाल या दोन नेतृत्वातच लढाई होईल,असे म्हणाले.म्हणजे आप हाच भाजपाचा पराभव करू शकतो,असा त्याचा दावा आहे. मग राष्ट्रीय पातळीवर मोदी विरोधातील महाआघाडीचे काय होईल?पण 'लंका अजून लांब आहे. दिल्लीत मनपात भाजपा सक्षम विरोधी म्हणून आलेला आहे.तो 'आप' नाकात दम आणल्याशिवाय राहणार नाही.गुजरातच्या सत्तेचे स्वप्न पाहणाऱ्या आम आदमी पक्षाला तेथे पाच जागा मिळाल्या आहेत.तर हिमाचलप्रदेशमध्ये खातेही उघडता आलेले नाही.दोन्ही राज्यात आम आदमीचे नाक कापले गेले. यात आम आदमी पक्षाला १२.९२ टके मते मिळाल्याने तो आता राष्ट्रीय पक्ष झाल्याचा याचाच आनंद व्यक्त केला जात आहेत.म्हणजे 'नाक कापले तरी छिद्र आहेच' ना! अशी आम आदमी पक्षाची अवस्था आहे.

हिमाचलप्रदेश मध्ये भाजपाची सत्ता होती.पण काँग्रेसने खेचून घेतली आहे. भाजपाला तेथे पराभव झाला हे मान्य करावे लागेल. या राज्यात एकूण ६८जगापैकी ४० जागा जिंकल्या आहेत.तर भाजपा२५ जागेवर यश मिळविले.भाजपाच्या अनेक उमेदवारांचा हजार त्या पेक्षाकमी मताने पराभव झालेला आहे.या राज्यात गांधी,वाड्रा,काँग्रेस परिवाराची लाट,प्रभाव नव्हता.या राज्यात सत्तापलट करण्याची परंपरा चालत आलेली आहे.येथे भाजपा अहंकार नडला आहे. भाजपा नेत्यांनी 'राज नही रियाज बदलेगा'असे म्हणाले. यात भाजपाचे माजी मुख्यमंत्री प्रेमकुमार धुमाल हे नाराज होते. यात पक्षातील वीस उमेदवारांचा बंड केले ते भाजपाला पराभवासाठी कारणीभूत ठरले,असे राजकीय जाणकरांचे मत आहे. भाजपा सरकारमधील आठ मंत्र्यांचा पराभव झालेला आहे. भाजपाने एक राज्य गमावले आहे.काँग्रेसच्या नेत्या प्रियंका वाड्रा यांच्या प्रचाराचा प्रभाव मतदारावर पडला,त्यामुळे या राज्यात काँग्रेसला यश मिळाले,असे काँग्रेसचे म्हणते आहे.तर मग या वाड्रांचा उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत प्रभाव दिसला नाही. त्यांना स्वतःचा भाऊ राहुलचा अमेठी मतदार संघात पराभव वाचवू शकल्या नाहीत. त्यात गुजरातमधील राहूल गांधींच्या मुखदर्शनाने सत्ता परिवर्तन का झाले नाही? तेंव्हा हिमाचलची निवडणुकीत चमत्कार,अथवा एकतर्फी झालेले नाही. काँग्रेस व भाजपात चुरशीचा लढत झालेली आहे .हे मान्य करावे लागेल. आता काँग्रेसचे नेते गांधी परिवाराला त्यांचे दैवत आहे. तेंव्हा तो त्यांच्या अंधश्रध्देचा प्रश्न आहे.या राज्यात सत्तापलट होणार,हे दिसत होते. यात काँग्रेस व भाजपामध्ये मतात केवळ ०.९ टक्याचे अंतर आहे. काँग्रेसने निवडणूक जाहीरनाम्यात सवंग घोषणा केल्या आहेत. त्या पक्षाला पूर्ण कराव्या लागतील.राज्यात पक्षाला यश मिळतात मुख्यमंत्रीपदासाठी अनेक नेते दावेदार पुढे येत आहेत. यातून काँग्रेस पक्षात गटबाजी सुरु झाली आहे,हिमाचल प्रदेशच्या निवडणुकीतून काँग्रेसला आपण भाजपाला पराभूत करू शकतो,असा आत्मविश्वास मात्र निर्माण झालेला आहे.

देशातील तीन निवडणुकीत सर्वांच्या नजरा गुजरात निवडणुकीकडे होत्या!गुजरात व महाराष्ट्र हे दोन्ही जुळे भावंडे आहे.याचे कारण या दोन्ही राज्याचा जन्म १ मे १९६० मध्ये झालेला आहे. गुजरात राज्याची पहिली विधानसभा निवडणूक१९६० मध्ये झाली. तेंव्हा काँग्रेसने १३२ पैकी ११२ जागेवर विजय मिळविला होता.राज्याचे पहिले मुख्यमंत्री महात्मा गांधींचे डॉक्टर जीवराज मेहता हे होते.काँग्रेसची गुजरातमध्ये ३५ वर्षे कांग्रेस सत्तेवर होता. राज्यात मध्यंतरी जनता पक्षाचे सरकार होते.गुजरात राज्यात १९९८ पासून भाजपाची सत्ता आहे.या पक्षाचे पहिले मुख्यमंत्री केशवभाई पटेल मुख्यमंत्री होते.गुजरातच्या १९८५ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक १४९ जागा जिंकल्या. तेव्हा गुजरातमध्ये भाजपामध्ये केशभाई पटेल व शंकरसिंह वाघेला हे जेष्ठ नेते होते व यांचे वर्चस्व होते.मोदी व वाघेला यांच्यात मतभेद होते. पण मोदी यांनी या दोन नेतृत्वाची मैत्री केली. नंतर वाघेला भाजपाची साथ सोडली काँग्रेसची कास धरून मुख्यमंत्री झाले. या नेतृत्वाची साथ घेत २००१ मध्ये नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री झाले. या राज्यात २४ वर्षापासून भाजपाची सत्ता आहे.राज्यात २००१ मध्ये मोठी दंगल झाली. यापूर्वी गुजरातमध्ये अनेक




दंगली झाल्या आहेत.त्यात१९८५ (२०८ मृत्यू) १९९० (२१९ मृत) व १९९२च्या दंगलीत ४४१ जण मृत्यू पावले आहेत. पण २००१च्या दंगलीतून मोदींना टार्गेट केले.यात मोदी व शहा यांना गुजरात दंगली प्रकरणात फाशी व्हावी याचे काँग्रेसने कारस्थान केले होते, हेही उघड झालेले आहे.गुजरातमध्ये मोदीचे नेतृत्व आल्यापासून दंगली थांबल्या आहेत.भाजपा सरकारने राज्यात दंगली घडविणाऱ्या समाजकंटकावर कठोर कारवाया केल्या. त्यामुळे तूथे नवीन पिढीला संचारबंदी काय असते? हे माहित नाही.दंगलीतून तुष्टीकरण राजकारण सत्ता मिळविण्याचे काँग्रेसचे मनसुबे धुळीला मिळाले आहेत.मुस्लिम बहूसंख्य असलेल्या १७ पैकी१२ जागेवर भाजपाला विजय मिळविला आहे.ए.आय एम आय एम व आपने मुस्लिम बहुसंख्य मतदार संघात पक्षाचे उमेदवार उभे केले पण यांचे हाती काही लागले नाही, या दोन्ही पक्षांना मुस्लिम मतदारांनी नाकारले आहे.मोदींनी गुजरात राज्याचा विकासावर अधिक लक्ष केंद्रित केले,म्हणून राज्यात भाजपा गड आजही कायम आहे.गुजरातच्या मतदारांनी विकासाच्या बाजूनेच कौल दिलेला आहे.या गुजरातमध्ये मोदीचे सरकार येणार नाही,असे काँग्रेस व आम आदमीचे नेते ठामपणे सांगत होते.काँग्रेसचे म्हणणे असे की,देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.तेंव्हा लोकात संताप असून गुजरातमध्ये परिवर्तन होणार आहे. महागाई, बेराजगारी हे प्रश्न आजचे नाहीत,काँग्रेस पक्ष सत्तेत असताना हे प्रश्न होतेच!आता काँग्रेस पक्ष सत्तेत आल्यानंतर हे प्रश्न कायमचे सुटणार आहेत काय? गुजरात निवडणुकीकडे काँग्रेस नेतृत्वाने गांभीर्याने घेतले नाही.दोन्ही राज्यात नेतृत्व करणारा चेहरासमोर आणला नाही. काँग्रेस पक्षाला या राज्यात दारूण पराभव झाला आहे.यात थापाड्या नेते केजरीवाल यांनी तर 'गुजरातमध्ये आमचे सरकार येणार' असे पत्रकारांना लिहूनच दिले होते.गुजरात राज्यात विकास झालेला नाही. गुजरात जनता दिल्लीतील शिक्षण,आरोग्य सेवेचा मॉडलला पसंती देत आहेत असे त्यांचे म्हणणे होते.पण गुजरात मतदारांनी त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवला नाही,यावेळच्या २०२२ निवडणुकीत भाजपा सर्वात अधिक म्हणजे १५६ जागेवर विजय मिळविला आहे. काँग्रेसला १७ तर आपला पाच जागावर समाधान मानवे लागले, यात भाजपा५२.६ टक्के,तर काँग्रेसला २७.३तर आपला १२.९ टक्के मते मिळालेली आहेत.यावेळी निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीत गुजरात काँग्रेसचे नेते मधुसुधन मिस्त्री यांनी 'मोदींना औकात दाखवू' असा अपमानास्पद शब्द वापरला. हे सामान्य कार्यकर्ते नाहीत,ते ज्येष्ठ नेते आहेत.२०१९ मध्ये मिस्त्री लोकसभा निवडणुकीत मोदींचे प्रतिस्पर्धी उमेदवार होते.काँग्रेस राष्ट्रीय पक्षाचे अध्यक्ष खडगे यांनी मोदींची रावणाशी तुलना केली.लोकशाहीत विरोधी पक्षांला सत्ताधारी पक्षावर टीका करण्याचे स्वातंत्र्य आहे.खरगे सारख्या राष्ट्रीय पक्षाचा नेत्याने हलकी टीका करणे मुळीच शोभत नाही. गुजरात सरकारच्या धोरण व निर्णयाच्या उणीवा दाखवून टीका केली असती तर गुजरातच्या सुजाण मतदारांनी मान्य केले असते.आपण मोदी व्देषातून काय बोलतो आहोत? याचे काँग्रेस नेत्यांना भान राहत नाही.ते कधी भस्मासूर, चहावाला,नीच, चोर, आदी वाटेल त्या शिव्या देत असतात. मतदार घाणेरडे आरोप सहन करत नाही.काँग्रेसचे नेत्या सोनिया गांधी,राहूल गांधीनी मोदींनी शिव्या देण्याची प्रथा सुरु केली. तेंव्हा विचाराची गंगा उलटी वाहणार तरी कशी? शिशुपालाचा शंभर चूका केल्या,तरच त्याचा पापाचा घडा भरेल,तेंव्हा मृत्यू येईल असे वरदान होते,त्याचा पापाचा घडा भरला तेंव्हाच श्रीकृष्णाने सुदर्शनचक्र चालवून त्याचा शिरच्छेद केला.त्याप्रमाणे त्याप्रमाणे याप्रमाणे गुजरात मतदारांनी मतांचे चक्र चालविले व काँग्रेसला जागा दाखविली आहे विरोधी पक्षाचा सत्ताधारी पक्षावर अंकूश असला पाहिजे,त्याचबरोबर विरोधी पक्ष जबाबदार व सकारात्मक टीका करणारा असला पाहिजे.पण काँग्रेसचे नेते सैराटपणे वागतात व बोलत असतात.विरोधी पक्षाच्या नेत्यात संयमपणा व विरोधाला मर्यादा असावी लागते,ती काँग्रेसमध्ये दिसत नाही. काँग्रेस पक्षाला १३० इतिहास आहे. पक्षाचे नेतृत्व आपल्याच पक्षातील नेत्यांना सुसंस्कृपणाचे धडे का देत नाही ? यातून मोदीचे नव्हे,काँग्रेस पक्षाचे नुकसान होत आहे,हेच कळत नाही! काँग्रेसला गुजरात राज्याचा व मोदीचा विरोध आहे!तो गुजरात अस्मितेचा धक्का मानला गेला.यातून मतदारांनी भाजपाने १५६ जागेवर निवडून नवीन विक्रम घडविला व भाजपाने ऐतिहासिक यश मिळवले आहे.काँग्रेसमधून भाजपात आलेले हार्दिक पटेल,क्रिकेटपटू रविंद्र जडेजा यांची पत्नी रिबाबा जडेजा, काग्रेसचे जिमेश मेवाणी विजयी झाले. पण माजी मुख्यमंत्री शंकरसिंघ वाघेला यांचा मुलगा मेहेंद्रसिंघ वाघेला,तर आपचे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार ईशुदान गढवी हे पराभूत झाले आहेत.विशेष म्हणजे मोरब्बी येथे झुलता पुल तुटल्याची मोठी दुर्घघटना घडली,यात अनेकांचा बळी गेला,काँग्रेसने हा विषय उचलेला होता.तरी पण या मतदार संघातील भाजपाचे उमेदवार कांतिलाल अमृतिया विजयी केले.तसेच बिहारच्या कुऱ्हाणी पोटनिवडणुकीत भाजपाचे केदारप्रसाद गुप्ता, उत्तरप्रदेशच्या मैनपूरी मतदार संघातून सपाचे नेते अखिलेश यादव पत्नी डिंपल यादव यांचा तर रामपूर मतदार संघात भाजपाचे आकाश सक्सेना विजयी झाले.तर खतौली मतदार संघात भाजपाचा राजकुमारी सैना पराभूत झाल्या तर रालोदचे मदन मैय्या विजयीझाले आहेत. विविध राज्यातील पोटनिवडणुकीत छत्तीसगड मध्ये काँग्रेस,ओरिसामध्ये बिजू जनता दल,तर राजस्थानमध्ये काँग्रेस पक्षाचा उमेदवार विजयी झाला आहे. गुजरातमधील भाजपाच्या विक्रमी यशामुळे विरोधी पक्षातील नेत्यांचे पोट दुखते आहे. काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिवसेनेच्या नेत्यांनी अभिनंदन करण्याचे सौजन्य न दाखविता पहाता टोमणे मारले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी देशात भाजपाचे वातावरण नाही,असे म्हंटले.मग देशात कोणत्या पक्षाचे वारे वाहत आहे!हे त्यांनी तरी सांगावे! २०१२ मध्ये अरविंद केजरीवाल यांनी आम आदमी पक्षाची स्थापना केली व दोन राज्यात स्वबळावर पक्षाची सत्ता आणली.देशात ममता बॅनर्जी, के.चंद्रशेखर,जगमोहन रेड्डी,एम.के स्टेलिन,आदित्यनाथ योगी,शिवराजसिंह चव्हाण व मोदी हे नेते पवारांपेक्षा ज्युनिअर आहेत तर पवार हे ज्येष्ठ अनुभवी ,चाणाक्ष, धूरंधर,जाणता राजा ओळखले जातात, पण ते ४२ वर्षापासून महाराष्ट्रात पक्षाची एकहाती सत्ता आणू शकलेला नाहीत.तरी त्यांना राष्ट्रीय राजकीय,नेते जाणकार म्हंटले जाते! याचे आश्चर्य वाटते. राहूलबाबा 'भारतजोडो'चा यात्रेचा यात्रेला परिणाम गुजरात,हिमाचल प्रदेश,दिल्ली निवडणुकीत परिणाम झालेला दिसत नाही.दिल्लीत व गुजरात निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा दारूण झाला आहे.हिमाचल प्रदेशच्या निवडणुकीने मात्र काँग्रेस मध्ये आपण भाजपाला पराभव करू शकतो असा आत्मविश्वास वाढला आहे,हे खरे आहे! गुजरात पोरबंदर कुटीयाना विधान मतदार संघातून सपाचे एकमेव उमेदवार कोंधल जडेजा विजयी झाले आहेत!यावर सपा नेते अखिलेश यादव यांनी गुजरात मध्ये सपाच्या मुल्याचे, विचाराचे रोपटे लावले आहे,अशी प्रतिक्रिया दिली आहे.पण या रोपट्याचे वटवृक्ष होईल काय? एकूण या निवडणुकीत भाजपाच्या मताच्या टक्केवारीत वाढ झालेली आहे.तेंव्हा २०२४ मध्ये मोदी व भाजपा सरकारला पराभूत करणे हे काँग्रेससह प्रादेशिक पक्षांसमोर मोठे आव्हान असणार आहे.

# विकासाचे राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**राजकारणाचा पाया समाजकारण असेल आणि त्याची अंमलबजावणी तंतोतंत होत असेल तर कोणताही समाज अथवा प्रदेश फार काळ मागास राहू शकत नाही. आपण विकास म्हणजे फक्त भौतिक विकास हे गृहीत धरलेले आहे आणि काळाच्या ओघात ते बरोबरही असू शकते. कारण आंतरिक विकास ही दृश्य बाब नसते, ती तुमच्या कृतीतून दृश्यमान होत असते. आणि आधुनिक राज्यव्यवस्था ही कायद्यावर चालणारी असल्यामुळे कोणाची मर्जी अथवा नीतिमत्ता याचा व्यवस्था म्हणून संबंध येत नाही. आज राजाच्या शक्तीपेक्षा कायदा काय सांगतो, ही गोष्ट महत्त्वाची आहे. विकासाचे राजकारण करत असताना कायद्याची अमंलबजावणी हा भाग अनुस्यूत आहेच.**

प्रसिद्ध विचारवंत रुसो यांनी म्हटले आहे की, आपल्या बांधवावर अधिकार गाजवण्याचा निसर्गाने कुणाही मानवाला हक्क दिलेला नाही. तसेच शक्तीमुळे कोणताही हक्क निर्माण होत नाही. म्हणून मानवी समाजातील कायदेशीर अधिकाराला आधार जर कोणता असेल तर संमती. ही संमती जनतेकडून कशी मिळवायची यावर सारे राजकारण अवलंबून आहे. लांगूलचालन, प्रलोभन, धाक दाखवून अथवा जनजागृतीतून त्याविषयीची अनुमती कायद्याचे राज्य मिळवू शकते. खरा प्रश्न पडतो तो हा विकास ज्या समूहासाठी करायचा आहे, त्याला विश्वासात कसे घ्यायचे. तसे पाहिले तर लोकशाहीमध्ये जनता आपल्या विकासासाठी विनाशर्त परवानगी देत असते. कारण कोणत्याही समाजातील किंवा प्रदेशातील सामान्य जनतेला दोन वेळचे पोटभर जेवण, खर्चापुरते पैसे आणि कोठे जाण्या-येण्यास मुक्त संचार असेल, किमान भौतिक सुविधा उपलब्ध असतील तर आपल्यावर शासन कोण करत आहे, या प्रश्नांशी त्याला फार काही कर्तव्य असत नाही. आपली प्रगती होत नसेल तर आपल्याकडून काही चुका तर होत नाहीत ना, हे समाजाने एकदा निश्चितच तपासून पाहिले पाहिजे. राजकीय धोरणकर्त्यांच्या बाबतीत असलेला आपला अलिप्तपणा किंवा आत्मसंतुष्टी वैयक्तिक आणि सामाजिक विकासास बाधा आणणारा ठरू शकतो. आपल्या सद्सद्विवेक बुद्धीपेक्षा सत्ता किंवा शक्तीपूढे मान झुकवणे आणि विशिष्टांना विशिष्ट वागणूक यामुळेही विकासास खीळ बसू शकते. न्याय, नीतीपेक्षा सामुहिक दबावामुळे एखादा निर्णय ज्या समाजामध्ये घेतला जातो आणि भौतिकतेपेक्षा दैववादावर विश्वास वाढू लागल्यास आपली भौतिक अधोगती होत आहे, हे समजण्यास हरकत नसावी. अधोगतीचे अत्युच्च टोक म्हणजे परागतीला प्रगती समजणे होय. हे असे होण्याचे कारण आपल्या ऐतिहासिक आकलनात दडलेले आहे. तत्कालीन फायद्यासाठी राजकीय डावपेचांची आखणी करून सामाजिक आणि आर्थिक दुरावस्थेकडे केलेले दुर्लक्ष आम्हांस महाग पडले. इतिहास विसरण्याची अशिक्षित वृत्ती आमच्यातून अजूनही हद्दपार झाली नसल्यास आमची प्रगती साधणार तर कशी? कारण लोकशाहीत सामाजिक वैगुण्याला सोबत घेऊन चालणे म्हणजे पेट्रोलपंपावर मशाली बळगण्यासारखे आहे. आमच्यात जातीभेद तर आहेच, सोबतीला सामाजिक बेफिकिरी आणि माणसा माणसात प्रतवारी करण्याची सनातनवृत्ती विकासास अडथळे निर्माण करणारी ठरते. आमचा पोथीनिष्ठ दृष्टिकोन भलेही आम्हांस मवाळ बनवत असेल पण या मवाळपणातूनच आम्ही पारतंत्र्यात गेल्याचे उदाहरण आमच्या अनुभवात आहे. विकासाच्या राजकारणात सत्ताधारी वर्गाचा निर्धार देशाची दिशा ठरवत असतो. चूक की बरोबर हे तज्ज्ञ आणि काळ ठरवतील, त्यांना तो निसर्गसिद्ध अधिकारही आहे. परंतु निर्धाराने निर्णय घेण्याची वृत्ती आम्हांस आगेकूच करण्यात मदत करणारीच ठरेल. चुका होतील, त्या दुरुस्तही करता येतील; परंतु आम्ही निर्णयच जर घेत नसू तर ती कालपटावर घोडचूक ठरेल. लोकशाहीत शासन जनतेला जबाबदार असते म्हणजे जनतेच्या सर्वांगीण कल्याणाची तजबीज शासनाने करायलाच पाहिजे. केवळ भौतिक विकास साधने एवढाच भाग यात नसून समाजातील ग्रंथप्रामाण्य आणि शब्दप्रामाण्य कमी करून त्याद्वारे निर्माण झालेली अंधश्रद्धा




आणि अविवेक कमी करण्याचे अथवा संपविण्याचे कार्य देखील करावे लागणार आहे. या ठिकाणी मतभेद उद्भवू शकतो. कारण बहुतांश जनता अमूर्तावर विश्वास ठेवून जीवन जगत असते. यातून अंधश्रद्धा निर्माण होत असली तरी आचार आणि विचारांच्या स्वातंत्र्यामुळे अमुक गोष्ट अंधश्रद्ध आहे आणि तमुक बाब विज्ञानविरोधी होय, असे अटीतटीला येऊन आपण वाद घालू शकत नाही. यावेळी आपल्यासमोर लोकांमधील विवेक जागृत करून समतोल विचार निर्माण कसे होतील हे पाहिले पाहिजे. बरे ज्या कृतीमुळे समाजाचे स्वास्थ्य आणि स्थैर्य बिघडणार नाही आणि ती कृती भौतिकतेस बाधा पोहचत नसेल तर अशा कृती व्यक्ती स्वातंत्र्याच्या सदराखाली सोडून देण्यास हरकत नाही. कारण समाज विकसित होत असताना तो भौतिकतेसोबतच नैतिक, आत्मिक आणि आध्यात्मिक बाबतीतही विकसित झाला पाहिजे. आपले राजकारण सर्वांना सोबत घेऊन चालणारे, समन्यायी स्वरूपाचे आणि देशवासियांमध्ये बंधुभाव निर्माण करणारे असले पाहिजे. कारण आज देशातील वास्तव दिवसेंदिवस अविश्वासाचे, संशयाचे आणि गढूळ होत आहे. आपल्या लहानपणी आपण अनुभवलेला भातृभाव जाणते अजाणतेपणी आपण हरवून बसलो आहोत. विश्वकुटुंबाची संकल्पना जोपासताना आपल्या जवळचा माणूस दूर जात असेल, परस्परविरोधी वातावरण निर्माण होत असेल, तर आपले विकासाचे राजकारण पुढे जाणार नाही. या देशातील महिला, कष्टकरी, वंचीत, आदिवासी यांना शासन आपले आहे, आपण सुरक्षित आहोत असे वाटले पाहिजे. दिवसाढवळ्या छेडछाडीच्या आणि बलात्काराच्या घटना घडणे, आदिवासींच्या जल, जमीन आणि जंगलावर घाला घालणे तसेच वंचीत घटकांचा अव्हेर करणे आपल्या विकासाच्या राजकारणात बसत नाही.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# उत्पन्नाच्या एक-चतुर्थांश हिस्सा आपत्कालीन सेवेस राखीव



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**जगातील अविकसित देशांतील बालके व माता यांच्या आरोग्य सुधारणेसाठी पोषक आहार, पर्यावरण-स्वच्छता, शिक्षण, समाजकल्याण इ.बाबींमध्ये मूलभूत सेवा सुविधांविषयक एक योजना तयार केली. बालहक्कांच्या जाहीरनाम्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्याच्यावर संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने सोपवली आहे. त्यानुसार मुलांच्या शारीरिक व मानसिक वाढीसाठी पोषक आहार आदी सुविधा व सवलती त्यांना प्राप्त करून द्याव्यात, असे निवेदन त्यात आहे. या जाहीरनाम्यान्वये बालकांचे हक्क जपण्यात आले आहेत. बालकांच्या आंतरराष्ट्रीय वर्षातील संयुक्त राष्ट्रांच्या विविध उपकमांचा समन्वय साधणारी युनिसेफ ही मध्यवर्ती संघटना होय. ही ज्ञानवर्धक व अभ्यासपूर्ण माहिती श्री एन. के. कुमार जी. गुरुजी या लेखातून मांडत आहेत, अवश्य वाचा.**

संयुक्त राष्ट्रांनी बालकल्याणार्थ स्थापन केलेले अभिकरण- एजन्सी होय. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने दि.११ डिसेंबर १९४६ रोजी त्याची स्थापना केली. त्याचे पूर्वीचे नाव युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रेन्स इमर्जन्सी फंड असून युनिसेफ या संक्षिप्त नावाने ही संस्था सर्वपरिचित आहे. यूरोपमध्ये दुसऱ्या महायुद्धाची झळ पोहोचलेल्या व तातडीच्या मदतीची गरज असलेल्या बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार आदी पुरवण्याचे कार्य युनिसेफने स्थापनेनंतर लगेचच तत्परतेने सुरू केले. त्यानंतर त्याने आपले सेवाक्षेत्र विस्तारले आणि सन १९५०नंतर विशेषतः कमी विकास झालेल्या देशांत आणि आपद्ग्रस्त भागांत लक्ष केंद्रित केले. बालकांमधील रोगराई, कुपोषण, निरक्षरता यांचे उच्चाटण करण्यासाठी काही दीर्घ पल्ल्याचे उपक्रम कार्यान्वित केले. पुढे सन १९५३मध्ये त्याच्या शीर्षकातील  इंटरनॅशनल व इमर्जन्सी हे शब्द वगळले. विद्यमान काळातील युनिसेफचे कार्य म्हणजे अविकसित तसेच विकसनशील देशांतील कोट्यावधी बालकांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्या त्या देशांतील शासन राबवत असलेल्या कार्यक्रमांना सर्वतोपरी साहाय्य करणे व शंभराहून अधिक देशांतील बालकांचे अनारोग्य, उपासमार, निरक्षरता यांसारखे मूलभूत प्रश्न सोडवणे यासाठी मदत करते. बालकांसाठी रोगनियंत्रण कार्यक्रम, आरोग्य केंद्रे, दीन-सेवाकेंद्रे, शालेय आहार योजना, तसेच इतरही अनेक प्रकल्प व उपक्रम राबविण्यासाठी नानाविध प्रकारच्या सुविधा पुरवते. सुश्रूषा, अध्यापनादी सेवांचे प्रशिक्षण व्यक्तींना देण्यासाठी यामार्फत आर्थिक अनुदानही दिले जाते.

युनिसेफचे एक मुख्य कार्यालय न्यूयॉर्क शहरात आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक समितीमार्फत विविध देशांतील प्रतिनिधींचे कार्यकारी मंडळ तीन वर्षांच्या कालावधीसाठी निवडले जाते. त्याच्या या कार्यकारी मंडळाच्या अखत्यारीत धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वे घालून देणे व त्याच्या कार्यकमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे, ही कार्ये प्रामुख्याने येतात. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव कार्यकारी संचालकाची नियुक्ती करतात. त्याच्या न्यूयॉर्कच्या मुख्यालयातील १,४०० कर्मचारी तसेच जगभरातील सुमारे ४० क्षेत्रीय कार्यालये ही कार्यकारी संचालकांच्या नियंत्रणाखाली येतात. त्याचे शंभराहून अधिक देशांत जे उपक्रम चालतात, त्यांपैकी अनेक संयुक्त राष्ट्रांच्या इतर अभिकरणाच्या तसेच काही स्वयंसेवी संस्थांच्या सहयोगाने संयुक्त रीत्या चालतात. संयुक्त राष्ट्र संघाच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेमार्फत विविध देशांचे नागरिक असलेल्या ३६ कार्यकर्त्यांची निवडलेली समिती या संस्थेचा दैनंदिन व्यवहार व इतर कामकाज सांभाळते. याशिवाय योजना बनविणे, उपक्रमांना मान्यता देणे व आर्थिक नियोजन करणे, अशा जबाबदाऱ्या या समितीमार्फत पार पाडल्या जातात.

युनिसेफ- दि युनायटेड नेशन्स चिल्ड्रंस फण्ड म्हणजे पूर्वीची दि युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रंस इमर्जन्सी फण्ड याची स्थापना झाली. ती संयुक्त राष्ट्रसंघामार्फत दुसरे विश्वयुद्ध संपल्यानंतर युद्धामध्ये होरपळलेल्या देशांमधील मातांना आणि मुलांना आवश्यक तो अन्नपुरवठा आणि वैद्यकीय मदत पुरवण्यासाठी दि.११ डिसेंबर १९४६ रोजी करण्यात आली. पोलिश फिजिशियन लुडविक रॅशमन यांच्याकडे या संस्थेचे संस्थापक म्हणून पाहिले जाते. तसेच या संस्थेचे प्रथम अध्यक्ष देखील हेच होते. हे एकमेव अध्यक्ष आहेत ज्यांनी दोन वर्षांपेक्षा या संस्थेचा अध्यक्ष म्हणून कारभार सांभाळला होता. सन १९५० साली या संस्थेच्या कार्याची कक्षा वाढवून विकसनशील देशांमधल्या लहान मुलं आणि स्त्रिया यांच्या दीर्घकालीन गरजा आणि समस्यांचे निदान करण्याचा निर्णय घेण्यात आला. सन १९५३ साली ही संस्था संयुक्त राष्ट्रसंघाचा कायमचा भाग झाली आणि यातून



इंटरनॅशनल व इमर्जन्सी हे दोन शब्द वगळण्यात आले. तरीदेखील याचे पूर्वीचे संक्षिप्त नाव युनिसेफ तसेच वापरात आहे. सरकारी आणि खाजगी देणगीदारांकडून मिळणाऱ्या देणग्यांमार्फत या संस्थेचा कारभार चालवला जातो. या संस्थेचं सन २०१५ सालचं उत्पन्न ५ अब्ज ९५ लक्ष ५७ हजार ४७१ डॉलर इतके होते. संस्थेच्या कारभारासाठी आवश्यक असलेल्या सर्व आवश्यक बाबींमध्ये विविध देशांमार्फत मिळून दोन तृतीयांश एवढा वाटा उचलल्या जातो. उर्वरित वाटा खाजगी संस्था आणि स्वेच्छेने काही लोकांनी वैयक्तिक रित्या उचललेला असतो. संस्थेच्या उत्पन्नाच्या ९२ टक्के वाटा हा या संस्थेमार्फत राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांवर खर्च केला जातो. यांचे उपक्रम- योजना लहान मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि त्यांच्या आयुष्याच्या कल्याणासाठी चालना देणाऱ्या असतात. या संस्थेचं कार्य एकूण जगातील १९२ देशांमध्ये चालतं. दीडशेहून अधिक देशांमध्ये या संस्थेची कार्यालयं आहेत आणि चौतीस राष्ट्रीय समित्यांमार्फत विविध देशांमध्ये या संस्थेचे कामकाज यजमान देशासोबत मिळून तयार केल्या जाणाऱ्या उपक्रमांमार्फत चालवले जाते. संस्थेच्या विविध ठिकाणी असलेल्या सात मुख्य प्रादेशिक कार्यालयातून विविध देशात असलेल्या कार्यालयांना तांत्रिक मदत देण्यात येते. याच संस्थेचं दुसरे मुख्य कार्यालय डेन्मार्क देशाच्या राजधानी असलेल्या कोपनहेगन येथेही आहे. मुलांना आवश्यक असणाऱ्या लसी आणि प्रतिजैविक औषधांचा पुरवठा हा मुख्यतः या कार्यालयातून करण्यात येतो. याशिवाय एड्स पीडित, कुपोषित माता व बालकांना मदत करणे, आपत्तीसमयी राहण्याची सोय करणे किंवा निवाऱ्यासाठी ठिकाण उपलब्ध करून देणे, तात्पुरत्या छावण्या उभारणे, कुटुंबातील विखुरलेल्या- हरवलेल्या सदस्यांचे पुर्नमिलन घडवणे आणि शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करणे, आदी उपक्रम राबविले जातात.

युनिसेफला स्वेच्छेने दिल्या जाणाऱ्या देणग्या, निधी यांद्वारे अर्थसाहाय्य होते. त्याच्या उत्पन्नाचा जवळजवळ तीन-चतुर्थांश हिस्सा वेगवेगळ्या देशांच्या शासनांकडून येतो. काही उत्पन्न निरनिराळ्या संघटना, व्यक्ती यांच्या देणग्यांतून मिळते, तसेच भेटकार्डांची विकी व इतर निधिसंकलन योजना यांतूनही काही उत्पन्न जमते. त्याच्या एकूण उत्पन्नापैकी एक-चतुर्थांश हिस्सा तातडीच्या आपत्कालीन सेवांसाठी राखून ठेवलेला असतो. नैसर्गिक आपत्ती, राजकीय अस्थैर्य, साथीचे रोग अशा कारणांमुळे नुकसान पोहोचलेल्या विपद्ग्रस्त बालकांसाठी त्याचा उपयोग केला जातो. दीर्घ पल्ल्याच्या पुनर्वसन योजनांसाठीही युनिसेफ साहाय्य देते. बालपणी उद्‌भभवणाऱ्या रोगांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच एच्आयव्ही- एड्स सारख्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये, म्हणून उपयोजिलेल्या प्रतिरक्षक उपकमांना युनिसेफ सर्वतोपरी मदत करते. सन १९७६मध्ये त्याने जगातील अविकसित देशांतील बालके व माता यांच्या आरोग्य सुधारणेसाठी पोषक आहार, पर्यावरण-स्वच्छता, शिक्षण, समाजकल्याण इ.बाबींमध्ये मूलभूत सेवा सुविधांविषयक एक योजना तयार केली. बालहक्कांच्या जाहीरनाम्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्याच्यावर संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने सोपवली आहे. त्यानुसार मुलांच्या शारीरिक व मानसिक वाढीसाठी पोषक आहार आदी सुविधा व सवलती त्यांना प्राप्त करून द्याव्यात, असे निवेदन त्यात आहे. या जाहीरनाम्यान्वये बालकांचे हक्क जपण्यात आले आहेत. साहेब, आपल्याकडे अविकसित भागातील प्राथमिक शाळा कमी पटसंख्येच्या बनावाखाली बंद केल्या जात आहेत. युनिसेफ यात जातीने लक्ष घालेल का? मागास भागातील आमच्या या दळभद्री बालकांना न्याय मिळेल का? असे लोकातून प्रश्नचिन्ह उमटतात. बालकांच्या आंतरराष्ट्रीय वर्षातील  संयुक्त राष्ट्रांच्या विविध उपकमांचा समन्वय साधणारी युनिसेफ ही मध्यवर्ती संघटना होय. सन १९६५मध्ये त्याला त्याच्या बालकल्याणाच्या कार्यार्थ, तसेच आंतरराष्ट्रीय बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या भूमिकेबद्दल शांततेसाठी असलेला नोबेल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. या शिवाय सन १९८९ साली इंदिरा गांधी शांतता पुरस्कार आणि सन २००६ साली प्रिन्स ऑफ अस्च्यूरियास अवॉर्ड ऑफ कॉँकॉर्ड ही पारितोषिकेही देण्यात आली आहेत.

# भरतीसाठी त्रेधा-तिरपीट



भारत सोनवणे
संपर्क क्र. 90753 15960

आधुनिक केसरी

**काल सायंकाळची गोष्ट खूप दिवसानंतर माझ्या तालुक्याच्या गावाला गेलो असल्यानं जून्या मित्रांची भेट झाली. हल्ली शहरात माझ्या वयाच्या मुलांमध्ये साधारण तीन-चार वर्षानंतर आलेल्या पोलिस भरती, अग्निपथ योजनेतून अग्नीवीर भरतीतून भारतीय सैन्य दलात भरती, केंद्रीय, राज्य पातळीवर निम लष्करी दलातून होणारी भरती आणि महाराष्ट्र वनविभागात वनरक्षक भरती होण्याच्या ध्येयाने शहरातील बहुतांश मुलं भरतीच्या तयारीला लागली आहे.**

जसजशी भरती जवळ येत आहे, तसतसे तरुणांचीही संख्या वाढत आहे. शहरातील सर्व छोटी-मोठी मैदाने तरुणांच्या गर्दीने फुलून गेली आहेत. सर्वजण जीव तोडून सराव करता आहेत. पोलिस भरतीमध्ये आतापर्यंत अठरा हजार जागांसाठी जवळजवळ वीस लाख फॉर्म मुलांनी भरले आहेत. त्यामुळं यावर्षी इतक्या मोठ्या पदांची भरती असूनही चांगलीच स्पर्धा असणार आहे. याउपर खेड्या गावातील मुलांची अवस्था तर खूप वाईट अन् खूप संघर्ष त्यांना करावा लागत आहे. आज गावी येत असताना रस्त्याने येताना बरेच भावी पोलिस, सैनिक सराव करतांना दिसले. खेडेगावावरची ती मुलं त्यांना लाखोंनी पैसे भरुन नौक-या मिळवणं त्यांना शक्य नसतं म्हणुन बिचारे रात्रंदिवस ही अशी मेहनत घेत असतात.

रस्त्यांनी ५-६ कीमी रोज सकाळ-संध्याकाळ पळतात, का तर यांना शासनाने गावात कुठलीही सुविधा त्यांच्यासाठी केलेली नसते. व्यायाम शाळा, मोकळं मैदान नसते पण ते मुलं ध्येयवेडे असतात वर्दीसाठी,देशाच्या सेवेसाठी. यांच्याकडे फारसं कुणी लक्ष देत नाही, गावातल्या अतिहुशार लोकं यांना टूकार समजतात. असो इतकं काही असुनही ही मुलं पुर्णपणे मेहनत घेतात, भरतीला जातात. आज भेटलेल्या अश्याच तरुण मित्रांनी त्यांच्याबद्दल, त्यांना येणाऱ्या अडीअडचणींबद्दल थोडेसे लिहायला लावले म्हणून हा लेख. अपेक्षा काहीच नव्हती त्यांची, परंतु पुढे जे काही मांडले आहे त्या गोष्टींचा सरकारने विचार करावे इतकंच. भरती करणारी बहुतांश मुलं ही गरिब घरातील असल्यामुळे भरतीला जातांना सोबत जेमतेमच पैसे असतात. तीन-चारशे कीमी प्रवास करून मुलं मैदानी चाचणीसाठी ज्या शहरात असते तिथे जातात तिथे ऐन भरतीच्या दिवशी पोहचणे अवघड असते. त्यामुळे आधिच्या दिवशी ही मुलं त्या ठिकाणी जातात. अश्यावेळी त्यांना तिथे राहण्याची कुठलीही सोय नसते. ऐनवेळी मग जिथं घडीभर आसरा भेटल तिथं ही मुलं वृत्तपत्रावर झोपून रात्र काढतात, कुणी रेल्वे स्टेशनवर तर कुणी एसटी स्टँडवर तर कुणी



रस्त्याच्या कडेला जिथं आसरा भेटल तिथं ही मुलं झोपून जातात. अश्यावेळी लाखोंच्या गर्दीत त्यांचे कागदपत्रे हरवतात पुरेसा न भेटलेला आराम,अपुरे जेवन, प्रवासामुळे आलेला थकवा यांमुळे प्रचंड मेहनत घेउनही अनेकजण फक्त वेळीच न भेटलेल्या आरामामुळे मैदानावर मैदानी चाचणीत अपात्र ठरतात आणि त्यांच्या पदरी निराशा पडते. दोन-तीन वर्ष केलेली अफाट मेहनत चुटकी सरशी बेकार ठरते. सांगायचा उद्देश हाच की, सरकाराने याची दखल घ्यावी.

पुढे काही महिन्याभरात पोलीस भरतीचे मैदानी चाचणी सुरू होणार आहे त्यावेळी भरती होणाऱ्या शहरांमध्ये या तरूणांची कमीतकमी त्यांना मैदानी चाचणी ज्या ठिकाणी होणार आहे अश्या ठिकाणी बस स्थानकापासून, रेल्वे स्टेशनपासून सिटी बसच्या माध्यमातून सोडण्याची, रहाण्याची, जेवनाची तरी व्यवस्था असावी कारण हे तरुण भावी पोलिस, सैनिक होऊन देशसेवा करणार आहे. हे सर्व मी स्वतः अनुभवलं आहे. सोबतच माझ्यासोबत माझ्या पिढीच्या लाखो तरुणांनी अनुभवलं आहे, त्यामुळे यावेळी होणाऱ्या भरतीच्या वेळेस सरकारने या वरील बाबींचा विचार करून या तरुण मुलांची मदत करावी. जेणेकरून हीच उद्याची भावी पिढी जी सीमेवर आपल्या देशाचं संरक्षण करणार आहे तिची मदत होईल.

# मानवी स्वभावाचे वेगळेपण



दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

आधुनिक केसरी

**"व्यक्ती तितक्या प्रकृती असं म्हणणं बरोबर आहे  निरीक्षण करा तुम्ही जरा सर्व स्वभावपैलू सापडतील..." मागे दोन दिवसांच्या पूर्वी एका लग्नसभारंभात गेलो होतो.लग्नातील विविध सोपस्कार पार पाडत असतांना वेळ किती झाला हे कळलेच नाही.वेळेचा मुहूर्त त्यांच्याहातातून सुटून जात होता. लग्नात वर-वधू पक्षाला आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित झालेल्या वऱ्हाडी मंडळींची चुलबुल, चर्चा सुरू झाली.**

मनुष्याला सवड मिळाली की, एकमेकांचे उणे-दुणे काढायला मागे पुढे पाहत नाही. परस्परांच्या खोड्या करून क्षणिक समाधान मिळवत असते परंतु ज्यांच्याविषयी बोलतो त्यांच्या गोष्टी त्याच्यासमोरच बोलल्यास "दूध का दूध आणि पाणी का पाणी" होईल पण एकमेकांच्या आत्म्याला ठेस पोहचेल असं बोलणे म्हणजे गैरसमज निर्माण करून एकमेकांच्या मनात आकस निर्माण करणे होय.कोणतेही सण असो वा समारंभ त्यात चुका तर होणारच पण त्यातील केवळ आणि केवळ चुका शोधून इतरांचे मन कलुषित करण्याचा घाट काही मानवी समूह करतात हे एक मानवी स्वभावाचा दोष आहे.

"जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही"असं म्हणतात ना! हे अगदी खरं आहे.काही इतके भांडखोर,चुगलखोर असतात की,ज्या ठिकाणी जातील त्या ठिकाणी भांडणेच लावून परत येतील त्यामुळे प्रत्येकाचा स्वभाव लक्षात घेऊन आचरण करायला हवे.एक बाब प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवी की,आपली दृष्टी व दृष्टिकोन कसा आहे त्यावर साऱ्या बाबी अवलंबून आहेत."पेराल तसे उगवेल" या म्हणीप्रमाणे वर्तन करणे अतिशय योग्य होईल.प्रत्येक बाबतीत चुका शोधून चुकांचे भांडवल करून नकारात्मक बीज समाजात पेरणाऱ्या व्यक्ती वा समूहापासून दूर असायला हवे कारण एक नकारात्मक बाब आपल्या मनात असलेल्या दहा सकारात्मक विचारांना बाजूला सारत असते.आपल्या विचाराशी समरस होणारे मानवी स्वभावाचे व्यक्ती एकत्र असायला हवे.प्राचीन काळापासून तर आता आधुनिक काळात देखील डोकावून बघितल्यास विश्वासघात,धोका,दगा-फटका हे आपल्या अवतीभवती आचरण करणाऱ्या व्यक्तीनेच दिलेला आहे त्यामुळे एखाद्या व्यक्तीवर विश्वास ठेवतांना अंधपद्धतीने नको तर डोळसपद्धतीने विश्वास ठेवायला हवा अन्यथा तुमच्या विचाराला वा स्वभावाचा फायदा घेण्यासाठी टपून बसलेलेच असतात.

"नेहमी सत्य बोलावे व सत्याचीच कास धरावी" असे अनेक संत महापुरुषांनी आपल्या मानव जातीला सांगितले आहे. मानवाच्या वृत्तीत आणि नितीत बदल झाल्याने स्वार्थीभावना अधिकच बळावत आहे म्हणून "खोटे बोलतो नि रेटून बोलतो" अशी ही मानवी स्वभावाची विचित्र व्यथा देखील बघायला मिळते आणि काही तर ठगास ठक महाठग देखील नजरेत पडतात.इतरांची कुचेष्ठा करून स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असतात पण अशी प्रतिष्ठा वाढवत असतांना इतरांना कमी दर्जाची,हीन वागणूक देऊन आपण श्रेष्ठ असण्याचा आव आणणे हे चुकीचे आहे.मांजराने दूध कितीही लपूनछपून पिण्याचा प्रयत्न केला तरी जाणीव होतेच.अगदी तसेच आहे त्यामुळे टवाळकी करून फुशारकी मारण्यापेक्षा इतरांचा सन्मान केल्यास अगदी समर्पक व योग्य होईल.

"स्वभावाला औषध नाही" असं म्हटलं जाते पण स्वभावातील दोष बाजूला काढणे हे आपल्याच हातात आहे तर काहींचा असा सूर असतो की,आपण जे करू तेच योग्य म्हणजे हट्टीपणा,आततायीपणा आपल्या जीवनात कामी नसतोच. इतरांचे मत,विचार ध्यानात घेऊनच इतरांचे स्वभावातील वेगळेपण समजून घ्यायला तुम्हाला वाव आहे.मानवाचा मूळ स्वभाव बदलविता येत नसला तरी वैचारिक बाबतीत नकारात्मक ते सकारात्मक असा स्वभावाचा प्रवास आपल्याला निश्चितच करता येईल.अती प्रमाणात राग,चिडचिडेपणा योग्य नाही.नैराश्यतेच्या गर्तेत राहणाऱ्या मानवी स्वभावाच्या व्यक्तीने  नकारात्मकतेचे बीज पेरू नयेत.प्रत्येक व्यक्तीने सकारात्मक विचारांची वा सत्याची कास घेऊन मार्गक्रमण व्हायला हवे.नैराश्य,उदास,निराश व्यक्ती इतरांच्या आयुष्यात उजेड आणण्यासाठी प्रयत्न करेल अशी आशा बाळगू नका. नैराश्यवादी व्यक्तीपासून सकारात्मतेच्या विचार पेरणाऱ्या व्यक्तीने दूर राहणे हेच उचित ठरेल अश्या विविधांगी प्रकारचे मानवी स्वभावातील वेगळेपण तुम्हाला क्षणोक्षणी सापडतील हे मात्र खरे आहे.

# भारतात जातीवाद कधी संपणार ?




डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी


**देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशकांहून अधिक काळ लोटला असून भारत स्वातंत्र्याच्या शतकपूर्तीच्या उंबरठ्यावर येऊन उभा ठाकला असताना देखील आपण भारताची जातिव्यवस्थेच्या तावडीतून आपण  सुटका करू शकलेलो नाही.असे आज खेदाने म्हणावे लागत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशकांहून अधिक काळ लोटला तरी जातिव्यवस्थेच्या तावडीतून आपण आपली सुटका करू शकलो नाही.-  देशाने आर्थिक आणि तांत्रिक आघाडीवर लक्षणीय प्रगती केली आहे, परंतु जात, समुदाय आणि लिंगाच्या आधारावर भेदभावाची वाढती प्रकरणे ही चिंतेची बाब आहे. देशातून जातिव्यवस्था संपुष्टात आली पाहिजे आणि भविष्यातील भारत जातीविरहित व वर्गविरहित झाला पाहिजे. असं स्वप्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी यांनी बघितलं होत.**

संविधान सभेतील एका भाषणात बाबासाहेब म्हणतात, 'जातीभेद मानणे, अस्पृश्यता पाळणे हा राष्ट्रद्रोह आहे. कारण भारतातील जातीव्यवस्थेमुळे समाजात भेदभाव निर्माण होतो. आपसात विरोधी भावना तयार होतात. बंधुभाव नष्ट होतो आणि बंधुभाव नसेल, तर स्वातंत्र्य आणि समतेला काहीही अर्थ राहत नाही.' ही विषमता मनुस्मृतीत असल्यामुळेच डॉ. बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळली, जातीची समस्या प्रगतीच्या आड येत असते.देशाला स्वातंत्र्य मिळून सातदशकांहून अधिक काळ लोटला तरी जातिव्यवस्थेच्या तावडीतून आपण आपली सुटका करू शकलो नाही, ही विडंबना आहे.
जातिव्यवस्था आपल्यातील वितुष्ट तर वाढवतेच पण आपल्या एकात्मतेत तेढ निर्माण करण्याचे काम करते. जातीव्यवस्था लहानपणापासूनच प्रत्येक माणसाच्या मनात उच्च-नीच, श्रेष्ठ आणि कनिष्ठतेची बीजे पेरते. विशिष्ट जातीचे सदस्य असल्याने कुणाला फायदा तर कुणाला तोटा सहन करावा लागतो. जात ही श्रमाच्या प्रतिष्ठेच्या संकल्पनेच्या विरोधात काम करते आणि ते आपल्या राजकीय गुलामगिरीचे मूळ कारण आहे.
जातिव्यवस्थेमुळे प्रभावित झालेल्या समाजाच्या कमकुवतपणामुळे व्यापक क्षेत्रात राजकीय एकात्मता प्रस्थापित होत नाही आणि त्यामुळे देशावरील कोणत्याही बाह्य आक्रमणाच्या वेळी मोठ्या वर्गाला परावृत्त केले जाते. स्वार्थी राजकारण्यांमुळे जातीवादाने पूर्वीपेक्षा अधिक घातक रूप धारण केले असून त्यामुळे सामाजिक कटुता वाढली आहे. जातिव्यवस्थेमुळे भारतातील विविध धार्मिक गट सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या एकमेकांच्या जवळ येऊ शकले नाहीत, त्यामुळे एक मजबूत समाज निर्माण होऊ शकला नाही. जातीव्यवस्थेने शेवटी देशात फाळणी निर्माण केली. आंबेडकरांनी 'जातिव्यवस्थेचे निर्मूलन' या पुस्तकात




म्हटले आहे की 'प्रत्येक समाजातील बौद्धिक वर्ग हा शासक वर्ग नसला तरी तो एक प्रभावी वर्ग आहे.' केवळ बुद्धी असणे हा गुण नाही. आपण बुद्धीचा वापर कशासाठी करतो यावर बुद्धीचे गुण आणि अवगुण अवलंबून असतात आणि आपण बुद्धीचा कसा वापर करतो हे आपल्या जीवनाच्या उद्देशावर अवलंबून असते. येथील पारंपारिक बुद्धिजीवी वर्गाने आपली बुद्धिमत्ता समाजाच्या हितासाठी वापरण्याऐवजी समाजाच्या शोषणासाठी वापरली आहे.
जात ही विटांची भिंत किंवा काटेरी तारांसारखी भौतिक वस्तू नाही जी हिंदूंना समेट होण्यापासून रोखते आणि जी तोडली पाहिजे. जात ही एक संकल्पना आहे आणि ती मनाची अवस्था आहे, त्यामुळे जात नष्ट करणे म्हणजे भौतिक अडथळे दूर करणे नव्हे. जातीय श्रेष्ठत्वाच्या अहंकारामुळे एक माणूस दुसऱ्या मानवापासून वेगळा राहतो.
अनेक अनैतिक सामाजिक प्रथा आणि नैतिकतेच्या खालच्या पातळीला जातिव्यवस्थाही कारणीभूत ठरली आहे. जसजशी लोकसंख्या वाढत गेली, तसतशी लोकांना उपजीविका मिळवण्यासाठी गुप्त मार्ग आणि अनैतिक पद्धतींचा अवलंब करावा लागला.
जातीवाद हा राष्ट्राच्या विकासातील प्रमुख अडथळा आहे. जे सामाजिक असमानता आणि अन्यायाचे प्रमुख स्त्रोत म्हणून काम करते. त्याचे समाधान आंतरजातीय विवाहाच्या स्वरूपात असू शकते. आंतरजातीय विवाहामुळे जातीवादाची मुळे कमकुवत होतील. पण आजही कोणत्याही व्यक्तीचे लग्न झाल्यावर त्याच वेळी त्याच्या आयुष्यात जात पाहिली जाते. या दुष्कृत्याचा समूळ नायनाट करायचा असेल, तर अशी पावले उचलावी लागतील ज्यामुळे विवाहाच्या वेळी जातीय सुसंगतता संपेल. किमान राजपत्रित पदे असलेल्या व्यक्तींनी जातीच्या संकुचित मर्यादेबाहेर आपोआप विवाह करणे अपेक्षित आहे. आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना शासकीय पदांवर नियुक्ती करताना प्राधान्य द्यावे. अशी व्यवस्था घटनादुरुस्ती करून बनवली पाहिजे, ज्याअंतर्गत जे तरुण-तरुणी आपल्या जातीबाहेर लग्न करण्यास तयार असतील त्यांनाच राजपत्रित पदांवर निवडले जावे. जातीच्या उच्चाटनासाठी राजकीय नेतृत्वाची जिद्द आणि प्रामाणिकपणा आवश्यक आहे. राजकीय व्यक्ती किंवा नेतृत्वाने जातीवादी संघटना, संघटना आणि कार्यक्रमांपासून दूर राहावे आणि सरकारने जातीवादी संघटना, मेळावे, कार्यक्रम यापासून परावृत्त केले पाहिजे, परंतु तरीही भारतीय राजकारणात त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाला विशिष्ट जातीपुरते मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. जोपर्यंत समाजातून जातीवादाचा अंधार नाहीसा होत नाही, तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मतेचा सूर्य उगवणार नाही, हे समजून घेतले पाहिजे. भारतातील एकूण जातींची संख्या ६७४३ असल्याचे दिसून येते. यामध्ये पोटजातींचा समावेश नाही. ही प्रथा गेल्या ३५०० वर्षांपासून अबाधित आहे. ती दूर करण्यासाठी लोकशाही व्यवस्था हे सर्वात मोठे हत्यार बनू शकते, परंतु शेकडो वर्षांपासून चालत आलेली परंपरा इतक्या कमी वेळात दूर करणे सोपे नाही.
भारत सरकारने आणि राज्यघटनेच्या रचनाकारांनी काही धोरणे आणि नियम घालून ती दूर करण्याचा प्रयत्न केला, परंतु ही व्यवस्था भारतीय समाजात दुधात भेसळयुक्त पाण्यासारखी प्रचलित आहे. ही भेसळ दूर करण्यासाठी कार्यक्षमतेबरोबरच काही कठोर पावले उचलण्याची गरज आहे, जे भारतीय राजकारणी आजपर्यंत टाळत आले आहेत कारण त्यामुळे त्यांचे राजकीय जीवन धोक्यात येऊ शकते. बुद्ध, नानक, कबीर, डॉ बाबासाहेब आंबेडकर इत्यादींनी आपापल्या काळात आपापल्या परीने उत्तम काम केले, पण आता पुन्हा राष्ट्राच्या राजकीय व सामाजिक व्यासपीठावर या समस्येवर चर्चा करून त्यावर उपाय शोधण्यासाठी प्रामाणिक ज्ञानी माणसांची गरज आहे. जर आपल्याला खरोखरच समतेचा जातविहीन समाज निर्माण करायचा असेल तर आपल्याला राष्ट्रीय स्तरावर सामाजिक न्यायाचे तर्कसंगत मॉडेल तयार करावे लागेल. त्यासाठी वाद कमी आणि विचार जास्त करण्याची गरज आहे.

# मी, जात-धर्म आणि सोशल मीडिया



रविंद्र साळवे
संपर्क क्र. 9822262003


आधुनिक केसरी

**अशात मी जाती धर्माच्या पलीकडे विचार करु लागलो आहे. कधी काळी जाती धर्माचा बऱ्यापैकी कडवट विचार माझ्या डोक्यात होता. मात्र नंतर मी बदलत गेलो. त्यामुळे जातीधर्मावर आधारित एकाही ग्रूपचा आता मी मेंबर नाही. अगदी ओन्ली , बुद्धिस्ट, निळाई , कडक निळा अशा एकाही ग्रूपचा व्हाटसप व फेसबुकला मेंबर नाही. आपण कोणीही माझे फेसबुक चेक करू शकता. आणि इतर लेखक साहित्यिक विचारवंत यांच्याही फार कमी ग्रूपवर आहे. याचे कारण मोबाईलवर अनेक ग्रूप झाले की निव्वळ टाईमपास होतो. मेसेज बॉक्स गच्च भरतो.  कधी भेटीचा योग आल्यास माझा मोबाईल घेऊन हे चेक करु शकता. त्याचे स्वागतच असेल.**

फक्त समतावादी हिंदू धर्म परिषद या ज्ञानेश् वाकुडकर यांच्या फेसबुकवरील धर्म शब्द असलेल्या एका पेजचा मेंबर आहे. विषमतावादी हिंदू धर्माला डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाकारलं आहे. मात्र हिंदू धर्मातसुद्धा काही समतावादी माणसे आहेत. या सर्वांना सोबत घेऊन मा. ज्ञानेश वाकूडकर यांनी सुधारणावादी चळवळ सुरू केलेली आहे. काही दिवसापूर्वी मी वाकूडकरसर यांच्या कामावर एक प्रशंसनीय लेख देखील लिहिला आहे.

माझ्या घरी कोणताही धार्मिक विधी होत नाही. महापुरुषांच्या तसबिरी असल्या तरी त्यांनाही कधी अगरबत्ती लावत नाही. पूजा अर्चा करत नाही. मात्र त्यांच्या विचारावर चालण्याचा प्रयत्न करतो. १००% कोणीच चालू शकत नाही याची मला जाणीव आहे. कडक निळा जयभीम लिहिणारे वा  एक कोटी बौद्धांचा गृप वाले कैक कडवट लोक मी माझ्या फेसबुक/व्हाटसपला ब्लॉक केलेले आहेत. केवळ आपल्याच जाती धर्मातील लोकांमध्ये आपण मिसळत राहिलो तर जातजाणीवा अधिक तीव्र होतात. मुलांमध्येही जातीचे गुणविशेष येतात. तेही जातीतलेच जोडीदार शोधू लागतात. त्या ऐवजी भिन्न जातीधर्मातील लोकांमध्ये वावर असल्यास व्यक्तीमत्व अधिक चौफेर होते असे मला वाटते. याशिवाय महत्वाचे हे की मी माझ्या जाती/ धर्मातील दोषांवर सुधारणेच्या अंगाने  टीका करतो. जात वा धर्माची मी निवड केलेली नाही ती जन्मजात मला चिकटून आली आहे. जातीचा वृथा अभिमान बाळगणे मला आवडत नाही. आपण जातीला, धर्माला चिकटून राहायचे आणि इतरांनी मात्र त्यापासुन दूर व्हायचे ही अपेक्षा चुकीची आहे.

'आंबेडकरी चळवळ आणि आर्थिक प्रश्न'




हे माझे टिकात्मक पुस्तक आहे. त्यात जातीच्या नावे पोटभरूपणा करणाऱ्या लोकांना मी चांगलेच फैलावर घेतलेले आहे. कोणत्याही धर्मातील जुनाट  परंपरावर सुधारणावादी दृष्टीने टीका कराव्यात... अगदी स्वधर्मावरही, असे माझे मत आहे. कोणताही धर्म कडवट झाला की फक्त त्या त्या धर्मस्थळी असलेल्या दानपेट्या पैशाने गच्च भरतात व त्या त्या धर्मातील पुरोहित गब्बर होतात (  अगदी एका क्विंटल पेक्षाही जास्त ) शिवाय मतीचे लोकप्रतिनिधी निवडण्याऐवजी विशिष्ट जातीचे लोक विजयी होतात. दारात पाय ठेवल्यावर गटारात पाय जातो तरीही  लोक जातीचाच प्रतिनिधी निवडतात. यामुळे विकास आणि प्रगती थांबते... ही माझी वैयक्तिक मते आहेत आणि अशा मताचे लोक  निर्माण करण्यासाठी मी लिहित असतो.  माझ्या घरी बरीच पुस्तके आहेत आणि मी सतत वाचत असतो. याशिवाय वृत्तपत्रीय व विविध नियतकालिकांचे वाचनही सुरूच असते. वाचनामुळे मला वैचारिक प्रतिवाद करायला नेहमीच आवडते. समोरचा माणूस किमान आपल्या इतका वा थोडातरी जास्त अभ्यासू असला पाहिजे ही माझी अट आहे. बाकी व्हाटसप युनिव्हर्सिटीतल्या पदवीवाल्या अर्थात अंधभक्त लोकांविषयी न बोललेलेच बरे. त्यांच्यातही काही भोळे भाबडे आहेत. त्यांच्यातल्या अनेकांना वरिष्ठ पातळीवरील राजकीय डावपेच माहिती नसतात. आपला कोण कसा वापर करतो, हे त्यांना माहिती नसते. समोर आलेल्या मजकूरावर ते भाबडेपणाने चटकन विश्वास ठेवतात. मी त्यांनाही सुधारण्याचा प्रयत्न करत असतो मात्र त्यांची सत्य स्विकारण्याची तयारी असेल तर ! अन्यथा चर्चा थांबवतो... कारण जग खूप मोठे आहे आणि जगात खूप चांगली माणसे आहेत. जाती धर्माच्या पलीकडे जावून विचार करणारे लोक आहेत. त्यांना भेटायला बोलायला मला कायम आवडत आले आहे. समाज माध्यमावर असे प्रागतिक विचारांचे अनेकजण आहेत. त्यांना भेटल्यावर, जाणून घेतल्यावर आणि वाचल्यावर असा विचार करणारे आपण एकटेच नाहीत याची प्रकर्षाने जाणीव झाली. आपल्या देशाचे आजवर कडवट जात आणि धर्माभिमानाने जास्त वाईट झाले आहे आणि अजूनही नवीन पिढी त्यातच अडकून जात जात जात आणि धर्म धर्म करणार असेल तर आपल्या देशाचा अफगाणिस्तान वा पाकिस्तान झाल्याशिवाय राहणार  नाही. धर्मावर आधारित राष्ट्र टिकत नाही याचं पाकिस्तान जवळचे उदाहरण आहे. त्यामुळे कडवटपणापासून दूर जाणे म्हणजेच माणूसपणाच्या अधिक जवळ जाणे कधीही उत्तम.



# ग्रामीण भागातच व्हावीत संमेलने

आधुनिक केसरी

खरेतर साहित्य संमेलने ही आता ग्रामीण भागातच झाली पाहिजेत. दलित, ग्रामीण, शेतकरी, कामगार, कष्टकरी जनतेचे प्रश्न,त्यांच्या जटील समस्या जर समजून घ्यायच्या असतील तर ग्रामीण भागातच साहित्य संमेलनाचे आयोजन केले पाहिजे जेणेकरून त्यांच्या समस्या साहित्यातून उजागर करता येतील. त्यांचे विषय परिसंवादातून मांडता येतील, ऐकणारा वर्गही शेतकरी,गुराखी,मजुर असला पाहिजे. कारण खेड्यातील अत्यंत सामान्य माणूस आजही आधुनिक, भौतिक जगाच्या प्रवाहात आलेला नाही. तो आधुनिक जगाच्या मुख्य प्रवाहात आला पाहिजे.

विमुक्त जाती, भटक्या जमातींना अजूनही गावोगाव भटकंती करत पालावरचे जीवन जगावे लागते. अशा वंचित समुहाच्या समस्या आपल्या साहित्याद्वारे त्या शासन-प्रशासनाच्या दृष्टीस आणून देण्याचे काम साहित्यिकांचे आहे किंबहुना ती त्यांची महत्वाची जबाबदारी आहे. म्हणून यापुढे साहित्य संमेलनाचे आयोजन ग्रामीण भागातच केले जावे.

**- डॉ. धोंडोपंत मानवतकर**
**लेखक ग्रामीण साहित्याचे संशोधक अभ्यासक आहेत.**

## ध्येयलढाई

दुःख पिऊन जगणे आता
शिकलो आहे
अजून मेलो नाही धैर्याने
टिकलो आहे

पाषाणहृदयी दुनियेने
छळले अती मला
सोसून छळयातना पुढे मी
धकलो आहे

कालचे जिवलग मित्र शत्रू
बनले जेव्हा
स्वमैत्रीच्या दुनियेत मी
थिरकलो आहे

हसलो जेव्हा हर्षाने त्यांनी
रडवले मला
आत्मबलाने वेदना मंदाऊ
शकलो आहे
मानून आपले जगलो येथे
प्रत्येकाला
आपल्याच लोकांना आता
मुकलो आहे

झाल्या चिंधड्या अचानक
विश्वासाच्या
निर्धाराने मनाला बळ देऊ
शकलो आहे

पाय ओढण्याचे माझे
झाले यत्नकैकदा
'ध्येयलढाई' तितीक्षेने मी
जिंकलो आहे

-मनोज शोभाबाई प्रकाश
अग्रवाल, औरंगाबाद.



## काळोख



काळोख्या रातीला
अंधाराचे पाय
स्मशानाची हाय
किंकाळते..

काळोख्या रातीला
अंधाराची भिती
चांदण्यांची छाती
दडपते..

काळोख्या रातीला
अंधाराची साद
भुताटकी नाद
घोंघावती..

काळोख्या रातीला
अंधाराचा खेळ
चुके ताळमेळ
चक्रावून..

काळोख्या रातीला
अंधाराचा शाप
कापे थरकाप
थरथर..!

महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत, जि. सांगली

## असहाय्य वेदना

झाल्या तुझ्यासाठी
मुलगा असो की मुलगी
जन्मणार आई बाबांसाठी

मुलगी होऊनी आई होणे
हा तिचा परत पुनर्जन्म
जगण्यासाठी मरण पत्करते
हेची तिचे पुण्यकर्म

गाय फोडीते हंबरडा
वासरू दुध पिता
गोड ते अमृत होई
परमेश्वरासी आनंद होता

कुंभार होऊनी आकार दिधला
सुंदर रुपी हकदार झाला
संस्कारातुनी घडुनी
देशासाठी योध्दा आला

तुजवीण या जगी
मज कोणी नाही
वेदने मधुनी मातृत्वाला
अमृताचा पाझर फुटून येई

सौ.भाग्यश्री दायमा,जयसिंगपूर
मो 9850114339



## अस कधी होईल का ?

समाजाला तोडायला निघालेली
भावकी समाजाला जोडायला कधी
शिकतील का
आपल्याच भावाच रक्त वाहतांना
पाहणाऱ्याला ते आपलच रक्त आहे
याची जान कधी होईल का

समाजात उठलेल जातिवादाचं वादळ
एकदाच कधी शांत होईल का
आपल्यावरच पेटून उठणारे आपलेच
हात आपल्याला मिठी मारण्यासाठी
पुढे कधी येईल का

हा जातीवादाचा अहंकार मिटवून
प्रेमाने सर्वजण कधी गोड होतील का
समाज एकतेच्या सावलीसाठी
वारंवार या जातिवादाच्या उन्हात
फिरणाऱ्यांना

सावलीत एकतेच्या समाज कधी
एकमेकांना समजावून घेईल का

आपल्याच बंधूवर डोळा ठेवणाऱ्यांचा
डोळा भेदायला आपला कुणी कधी
येईल का आपल्याच रक्तात भेद
करणारे भेदरे स्वःताला कधी निरखून
पाहतील का

मना-मनात भिनलेले
जातिवादाचे बीज
मातीत दाबून कायमस्वरूपी
संपवण्यात
यश कधी येईल का

जाती-जातीचे
फडके घेऊन मिरवणाऱ्याला
आपल्या-आपल्यातच विरोधाचा
नारा लावून- लावून गळा ज्याम
करणाऱ्यांना वेगवेगळ्या फांद्या
असणाऱ्या वृक्षाच खोड एकच असते
याची समज कधी येईल का

झाडाला एका जागी
जखडून ठेवणाऱ्या मुळांना
विसरून गेलेल्या खोडाला नि
फांद्याला स्वःताच्या आयुष्याची जान
कधी होईल का

एका ढाच्याच्या बनलेल्या माणसाला
त्याच्या माणुसकीची व्याख्या कधी
उमजेल का सर्व आपण-आपलेच
आहोत या भावना
मनात प्रत्येकाच्या कधी रूजतील का

आपण मिळुन तुटून पडलो या
भारतीय समाज एकतेसाठी
तर हा खंडलेला समाज
कधी एक होईल का

भारतीय समाज एकत्र होऊन
विविधतेत एकता हे ब्रिद सदा
अजरामर होईल का

प्रश्न-प्रश्न प्रश्नच नुसते
उत्तर कुठे सापडेल का
जुन्या कर्मठ पाऊल खुणा मिटून
एकतेचे ठसे उमटतील का

का राहतील फक्त
प्रश्नच ..प्रश्न ....

- लक्ष्मण वाल्डे-कन्नड
मो.नं-8888606068

## जातं

जातं बाई जातं
गोल गोल जातं
दाणे मुखात घेऊन
पांढर पीठ देतं

जातं बाई जातं
आजीसोबत नातं
गरं गरं फिरतांना
गाणं मजेत गातं

जातं बाई जातं
खुट्याशी जिवलग
नातं
कष्टाची महती
सर्वांना पटवून देतं

जातं बाई जातं
अडगळीत पडलं
जातं
नवीन पिढीशी
तुटलं कायमचं नातं

- रविंद्र व्ही.
चालीकवार



## महिमा

जीवन प्रवास | व्हावा अनमोल
शब्द अर्थ खोल | आयुष्याचा ||१||
असो संगतीला | शब्दांचा आहेर
प्रेमाचे माहेर | साहित्यिक ||२||
शब्द गुंफण्याने | फुलतो अभंग
जल्लोषात दंग | मन माझे ||३||
लागली मनाला | अभंगाची गोडी
सोडविण्या कोडी | जीवनाची ||४||
नाळ जोडण्यास | शब्दांची पेरणी
नात्यांची जोडणी | भक्तिभाव ||५||
चाखण्यास हवा | अभंगाचा मेवा
करण्यास सेवा | साहित्याची ||६||
जगी संतभुमी | खरी भारताची
व्हावी आनंदाची | मांदियाळी ||७||
अनमोल ठेवा | स्नेहाने प्रतिमा
वर्णिते महिमा | अभंगाचा ||८||

-सौ. प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे,४४

## मोबाईल आणि शिवराय

बर झालं ना महाराज
तुमच्या वेळी मोबाईल नव्हते
नाहीतर चित्र तेव्हाचे आत्तासारखे
कसे भयाण नाहो असते
मावळे गुंतले असते
फक्त नी फक्त मोबाईल मध्येच
वे टु कोंढाणा, वे टु पन्हाळा
स्टेटसला असती, नुसतीच खेचाखेच
युद्ध जिंकल्यावर त्याचही
मग पोस्टर झळकलं असतं
शुभेच्छा अनं अभिनंदनानं
साऱ्यांनाच वेड लावलं असतं
काही नवीन केल की
मावळ्यांनी टाकला असता स्नॅप
मार्ग नवे नवे शोधण्यासाठी
वापरला असता गुगल मॅप
नवीन योजनांचे आराखडे
मग झळकले असते व्हाट्सऍपवर
सावज आयतेच गावले असते
या मोबाईलमुळे शत्रूना तर
युद्ध सोडून मावळे रोज
करत बसले असते चॅटिंग
निष्ठा स्वराज्याशी नसतीच उरली
मात्र रोज झाली असती चीटिंग
नवीन ठिकानांचे लावून लोकेशन
इन्स्टावर पडली असती स्टोरी
लाईक, कमेंटच्या नादात मात्र
रयत गुरफटली असती सारी
फेसबुक अनं सिनेमे पाहत
मावळे जागले असते रात्र रात्र
मग का उतरलं असतं सत्यात
हे सुंदर स्वराज्याचं चित्र
सेल्फीचं तर आत्तासारखं
नवं घुमलं असतं वारं
तलवार ढाली ऐवजी मग
मोबाईलच घेऊन, फिरली असती पोरं
फितूरं, गद्दार अन शत्रूना तर
सारे समजले असते कावे
मग कसे साकार झाले असते
स्वप्न हिंदवी स्वराज्याचे नवे
म्हणून म्हणतो महाराज
बरं त्या काळी मोबाईल नव्हते
म्हणूनच निष्ठा स्वराज्यावरं
अनं माणुस माणसात होते ॥

-कविराज : मनिष आहिरे

## सिमावर्ती

सिमावर्ती भागातली
गरीबबिचारी जनता
रे कुठे दुखते खुपते
वेदना कधी जाणता

साध्या सोयी सुविधा
झगडा त्याच्याकरता
आपलेचं ते नागरिक
सांगा कधी हे स्मरता

सवती लेकरा समान
कशास त्यांना मानता
परक्यासारखे आहेत
रे कुठे गेली समानता

सिमाभागात राहतात
रे दोष त्यांचा कोणता
दुजा भाव घाली घाव
परदेशी त्यांना गणता

अतिरेक असे घातक
अस्वस्थ होई जनता
सिमा वाद मिटवावा
सावरा निदान आता

मनाची सिमा वाढवा
भेद भाव का पाहता
एकात्मतेच्या प्रदेशा
भारताआपण राहता

- हेमंत मुसरीफ, पुणे
9730306996.



## माझ्या भिमा...!

वंदन आमचे तुला भिमराव, वंदन तुला,
तुच आम्हा लोकशाहीचा मार्ग दावीला.

तुझ्या वरदानाने इथे नांदती लोकशाही,
एकतेने राहती हिंदू- मुस्लिम, शिख- इसाई.
तुझ्या रूपाने अंधारात क्रांतीसूर्य उगवला,
तुच आम्हा लोकशाहीचा मार्ग दावीला.

नाकारून सारे भेदभाव- विषमता,
समाजात आणली तुम्ही समानता.
त्यावरती राज्यघटनेने हल्ला चढविला,
तुच आम्हा तोकशाहीचा मार्ग दावीला.

अन्यायाशी इथे आम्हा लढायला,
संविधानाने दिलेत हक्क आम्हाला.
शिक्षणाने आमच्यावरचा अन्याय दूर झाला,
तुच आम्हा लोकशाहीचा मार्ग दावीला.

तत्व सद्गुणातले," प्रज्ञा-शिल-करूणा",
बाग फुलविण्यास जन्माला ये भिमा पुन्हा.
या जयंती निमित्ताने करतो वंदन तुजला,



तुच आम्हा लोकशाहीचा मार्ग दावीला...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४.

## आभाळ

दिवसागणिक
आभाळ कोडमडतय माझं
हातांना सोसावेल
एवढ्या बळाचा धनी
कोण ?

आयुष्याच्या परड्यात
स्वप्नांनी कितीही ऊंची
गाठो अस्तित्वाचा एक वारा
धुळच धुळ दाही दिशा

निर्बलता
ही माझी मानसिक आहे
सवय हातांना
ओझ्याचीच झाली आहे

खूपच सहज
झालंय हे निळं वाळवंट
कधी डोक्यावर
तर कधी तळव्यावर
निजलेल
खचायच नाय
ही जिद्दही तेवढीच मोठी
हायजमिनीचा मात्र
काही भरवसा नाय

हाडांचा आवाज
अधून मधून ऐकू येतो
आत्मा मात्र
पाय गाडून लढतो

कधीतरी असाही दिवस
देव देईन आभाळ खूप
उंचावर अन् मलाही शांत
झोप येईन

पण तोवर
दिवसागणिक आभाळ
कोडमडतय माझं.

-अमोल सोनाजी मोकासे
9730781775

# अभिनयातील भीष्माचार्य दिलीपकुमार



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी


**ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांची आज जयंती. बरोबर १०० वर्षांपूर्वी म्हणजे ११ डिसेंबर १९२२ रोजी दिलीपकुमार यांचा जन्म पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कँटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले.**

दुसऱ्या महायुद्धात लष्करी कँटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल - ए - आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे



चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान - ए - इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. ७ जुलै २०२१ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे दुःखद निधन झाले.

दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचेच नाही तर देशाचे मोठे नुकसान झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना विनम्र अभिवादन!



# तुका म्हणे अखंडित सुखें ।

तुकारामनीती
भाग 37



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**जवळपास हजारेक वर्षांचा ज्ञात-दीर्घ इतिहास असलेली वारकरी परंपरा अलौकिक असून संप्रदायाचे महत्वपूर्ण वैशिष्ट्ये संत वाङ्मय अधोरेखित करते हे विशेष! संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत जनाबाई आद्य संतांच्या अभंग-कीर्तनाचा धांडोळा घेतला असता तत्कालीन आव्हाने आणि त्यानुसार घडलेल्या अनेक बाबी समोर येऊन वारकरी संप्रदाय डोळ्यासमोर जिवंत उभा राहतो. धर्म हा कोणत्याही समाजाचा कणा असल्यामुळे अनेक धुरिणांनी आपल्या सर्वांगीण विकासात्मक विचारशैली सोबत आपल्या धर्माचे अधिष्ठान व्यक्त करण्याचा महत्वपूर्ण प्रयत्न करून आपण जन्माला आलेल्या समूहाला नवी चेतना देण्याचे महत्कार्य केलेले आढळून येते. या धर्मसुधारकांच्या मांदियाळीत महात्मा बसवेश्वर, चक्रधर स्वामी, स्वामी विवेकानंद, महात्मा ज्योतीराव फुले, महर्षी दयानंद सरस्वती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदि महामानवांनी आपला सर्वांगीण सुधारणेच्या विचारांची पेरणी करण्यासाठी प्रकर्षाने नव्या विचारांच्या धर्माचा आधार घेतला. धर्म म्हणजे धारण करणे, म्हणजेच मनाची धारणा करून जीवनाला त्या मार्गाने मार्गस्थ करणे होय. या धुरिणांनी आपल्या समकालीन धर्माची चिकित्सा करून समतेचे तत्व, मानवी मूल्यांना प्राधान्य देणारा आणि कर्मकांडास नकारणारा नवा किंवा अगोदरचा धर्म स्वीकारण्याचे महत्कार्य केले.**

त्यात हे सगळेच महापुरुष यशस्वी झाले असतांना तेराव्या शतकात वर्णव्यवस्थेने स्तोम माजवले होते, समाज कडेकोट भिंतीमध्ये विभागला गेला होता आणि भेदाभेदाने कळस गाठला होता. याचा परिपाक म्हणजे अठरापगड जातीतील श्री विठ्ठलाची भक्ती करणाऱ्या, जाती भेद न मानणाऱ्या सर्वच लोकांनी वारकरी संप्रदायाची भगवी पताका खांद्यावर घेऊन वाळवंटात भजन-कीर्तन करायला प्रारंभ केला आणि धर्मक्षेत्रांत आणखी एक क्रांतिकारी अध्याय लिहिला गेला!
चौदाव्या शतकानंतरच्या काळात वारकरी सांप्रदायाला मरगळ आली. कट्टर धार्मिकतेचा पुन्हा प्रचार-प्रसार सुरु झाल्यामुळे वारकरी धर्म थंडावला. ज्ञानदेव-नामदेवानंतर पुढे सोळाव्या शतकांत जवळपास अडीचशे वर्षांनी महाराष्ट्राला संत एकनाथांच्या रूपाने एक निष्ठावान, खंबीर, श्रीमंत वारकरी मिळाला आणि वारकरी संप्रदायाने कात टाकली. वारकरी धर्माचे पुनरुज्जीवन झाले. पैठणला गोदावरीच्या तीरावर नाथांनी आपले अधिष्ठान निर्माण करून नामदेव-ज्ञानदेवांचा वसा-वारसा पुढे नेला. त्यानंतर लगेच सतराव्या शतकांत संत तूकोबांनी वारकरी संप्रदायाला कळस चढवला. तुकोबांचा वारकरी धर्म आणि देव हा सगळ्यांपेक्षा विशेष होता. तुकोबांचा कालखंड जरी वर्णव्यवस्थेने स्तोम माजवलेला, जातीभेद, कर्मकांडांनी विळखा घातलेला असला तरी; प्रसंगी तुकोबांनी लाठ्याकाठ्या अंगावर झेलून आपला वारकरीधर्म इमानेइतबारे निभावण्याचे महत्कार्य केले. वारकरी संत देव आणि स्वतःमध्ये कोणताच भेद मानत नसून ते एकरूप झाले आहेत याचा उल्लेख तुकोबाराय नाटाच्या या

***हरि तैसे हरीचे दास । नाहीं तयां भय मोह चिंता आस।***
***होउनि राहाती उदास । बळकट कांस भक्तिची ॥१॥***
***धरूनि पाय त्यजिलें जन । न लगे मान मृत्तिका धन ।***
***कंठीं नाममृत पान। न लगे आन ऐसें झालें ॥२॥***
***वाव तरी उदंडचि पोटीं । धीर सिंधु ऐसे जगजेठी ।***
***कामक्रोधा न सुटे मिठी ।गिर्हे तरी वेठी राबविती ॥३॥***
***बळ तरी नागवती काळा । लीन तरी सकळांच्या तळा ।***
***उदार तरी देहासी सकळा । जाणोनि कळा सर्व नेणते ॥४॥***
***संसार तो तयांचा दास । मोक्ष तो पाहातसे वास ।***
***रिद्धीसिद्धी देशवटा त्रास । न शिवती यास वैष्णवजन ॥५॥***
***जन्ममृत्यु स्वप्नांसारिखें । आप त्या न दिसे पारखें ।***
***तुका म्हणे अखंडित सुखें ।***
***वाणी वदे मुखें प्रेमामृताची ॥६॥ (६५३)***


अभंगात करतात. नाटाच्या अभंगातील ४३ क्रमांकाचा हा अभंग अत्यंत बोलका असून यात संत तुकोबांची देव-संत ही अभेदाची म्हणजेच अद्वैती भूमिका जाहीर करतात. नाटाच्या अभंगांच्या अनुषंगाने या अगोदरच्या भागांत आपण प्रस्तावना बऱ्यापैकी पहिली असून तुकोबाराय आपल्या दैवताची आळवणी मोठ्या भक्तिभावाने करतांना दिसतात.
तुकोबांचे अभंगवाङ्मयसहजतेने समाज प्रवाही असून अगदी लडिवाळ लेकरांप्रमाणे "जाणोनि नेणतें करीं माझें मन । तुझी प्रेमखूण दावोनियां" असे आवाहन करून लोकांना देवाशी सहजतेने जोडून टाकतात. यात वरील अभंग म्हणजे वारकरी संतांसारखा किवा वारकरी संत हे या देवासारखे आहेत याची प्रतीती वारंवार येत राहते. हरीभक्त कसा असावा? याचे सुंदर उदाहरण म्हणजे भय, मोह, चिंता, आस यावर ज्याने मात केली आहे तो खरा हरिदास! आपल्या भक्तीची शक्तिशाली कास घेऊन त्यांनी काम-क्रोधादी षडरिपुंचे पूर्णतः क्षालन केले असून ते स्वतंत्र झाले आहेत. हरीभक्तांनी आपल्या हृदयात श्री विठ्ठलाचे पाय धारण केले असून मानसन्मानाच्या पलीकडे त्यांची वृत्ती गेली आहे. त्यांनी लोकभावनेचा त्याग केला आहे. हरीभक्तांच्या कंठात केवळ आणि केवळ श्री हरीचे नाम असून कोणत्याही अपेक्षेविना त्यांचे हृदय विशाल-अथांग सागरासारखे झाले आहे. कळीकाळाच्या मानगुटीवर पाय देण्याचे सामर्थ्य या हरीभक्तांमध्ये आले असून काम-क्रोधांना जिंकण्याचे महान कार्य हरीभक्तांनी केले आहे. ही एका सामान्य वारकऱ्याची शक्ती असून तो आणि देव एकाच पंगतीत



बसतात हे विशेष! 'मोह'रूपी मायेचा 'होम' करून जीवा-शिवाच्या ठाई केवळ श्री विठ्ठल विराजमान झाला आहे. हरीभक्त एवढे उदार झालेत की, त्यांना त्यांच्या देहाचे तादात्म्य राहिले नाही. त्यांची वृत्ती देहातीत झाली आहे. आपला संपूर्ण संसार देवाच्या पायी वाहिला असून 'मोक्ष सुखाला लाथा' मारण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठाई विराजमान झाले आहे. त्यापुढे जाऊन रिद्धीसिद्धी यांनासुद्धा आपले गुलाम करून टाकले आहे. ही तुकोबांनी व्यक्त केलेली खऱ्या हरिभक्तांची अलौकिक लक्षणे समोर येतात. या अभंगाचे शेवटचे चरण अत्यंत महत्वाचे असून यात खऱ्या अर्थाने तूकोबांनी कळसच केला आहे! माणसाला सर्वांत जास्त भीती ही मृत्यूची असतांना तुकोबाराय 'जन्म-मृत्यु' हे स्वप्नवत असून आम्हाला त्याची अजिबात भीती नसल्याचे प्रतिपादन करतात. त्याला कारण म्हणजे आम्ही सतत मुखाने प्रेमामृत पाझरत असतो. आम्हाला ईश्वराचे नाम आणि प्रेमामृताशिवाय काहींच आवश्यक वाटत नाही याचे कटाक्षाने तुकोबाराय प्रतिपादन करतात.
प्रस्तुत नाटाच्या अभंगात तुकोबाराय तमाम मानव जातीला काही महत्वपूर्ण इशारे देतात. माणसाने साधारणतः स्वजनेषणा, लोकेषणा आणि वित्तेषणा याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करावा. 'एषणा' म्हणजेच आस. प्रत्येक जीवाच्या ठिकाणी या तीन एषणा स्वभावतः वास करीत असतात. संतांनी या एषणांवर मात केलेली असते. स्वजनेषणा म्हणजे पत्नी, संततीची आस, लोकेषणा म्हणजे नातेवाईक, मित्रमंडळी, अन्य जन यांच्याबद्दलचे आकर्षण, समाजात लोकांनी आपल्याला मान द्यावा, आणि धनेषणा म्हणजे संपत्तीची, श्रीमंतीची आस! हरिदासांनी स्वजन तसेच समाजातील इतरेजन या सर्वांचा त्याग करून एकनिष्ठपणे भगवंताच्या चरणांचा आश्रय घेतलेला असतो हे इथे तुकोबाराय अधोरेखित करतात. सामान्य माणसांनी सुद्धा साधरणतः या एषणा पासून सावध राहिल्यास त्याचे हृदय नित्य प्रेमामृताने ओतप्रोत राहील! तुकोबांच्या अभंगांचे बारकाईने सिंहावलोकन केले असता त्यांना सामान्य माणूस, संत आणि भगवंत यात भेद ठेवायचा नाही. सर्वत्र अभेद वातावरण निर्माण होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने लोकशाहीची रुजवणूक होणे आहे.

जनसामान्य माणूस सहजतेने संतत्वाला पोहचला पाहिजे ही तुकोबांच्या हृदयीची तळमळ सामान्य लोकांना कळायला लागली, परिणामी लोक तुकोबांचे अभंग-कीर्तन मोठ्या आवडीने ऐकायला लागले. त्यांनी तुकोबांना आपल्या हृदय सिंहासनावर बसवून त्यांची मानस पूजा करायला प्रारंभ केला. याची फळे तुकोबांना भोगावी लागली. मार खावा लागला! तुकोबांच्या गाथ्यातील एकएक अभंगरत्न म्हणजे सामान्य माणसांना आपले जीवन सहज-सोपे उलगडून सांगणारे आणि त्यांनाच देवाच्या ठिकाणी नेऊन बसवणारे आहेत. ही तुकोबांच्या अभंगातील जनसामान्य लोकांना देवाच्या बरोबरीने नेऊन बसविण्याची सर्वश्रेष्ठ तुकाराम नीती आपल्याला सहजतेने लक्षात यायला हवी. आज घडीला खरे तुकोबाराय समाजाला सांगण्याची वेळ आली आहे! आज कीर्तन-भजनाचा सुळसुळाट झाला आहे. कीर्तन भक्तीच्या नावाखाली बीभत्स बोलले जात आहे. निव्वळ विनोद आणि पैसा याने वारकरी संप्रदायात थैमान घातले आहे. संतांचे लक्षणे आणि त्यांच्या विचारांचे पाईक असणाऱ्या लोकांना डोळे असून आंधळा झालेला समाज थारा द्यायला तयार नाही. कीर्तन-सप्ताहाच्या नावाखाली लाखोंची उलाढाल होत असून कोणतेही मुलतत्व लोकापर्यंत न जाता समाज दिवसाढवळ्या लुटला जात आहे. अखंड हरीनाम सप्ताहातील श्री ज्ञानेश्वरी पारायण आणि श्री तुकाराम गाथा भजन हे दोन मुलभूत कार्यक्रम बंद झाले असून त्याची जागा भागवत-रामायण कथांनी काबीज केली आहे. ही वारकरी संप्रदायाची फार मोठी अधोगती आहे! लोकांना गाथा-ज्ञानेश्वरी पारायण सोडून पुराणातील त्याच त्या गोष्टी मोठ्या भावनिकदृष्ट्या गायन करून भोळ्या-भाबड्या बाया-माणसांना भावनिक करून लुटले जात आहे. ही मोठी अवघड बाब समाजाने वेळीच ओळखून गाथा-ज्ञानेश्वरी पारायण पूर्ववत सुरु करावे लागेल. असे होऊन तुकोबांनी सांगितलेली साधी-सोपी प्रेमाची भाषा आणि वारकरी तत्वे अंगिकारली की; तमाम माणूस सुखी-आनंदी झाल्याशिवाय राहणार नाही! असे होणे म्हणजेच तुकोबांच्या गाथ्याचे आणि या तुकाराम नीतीचे सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही! जय तुकोबाराय!

# निवडणूक निकालांचा अन्वयार्थ



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**नुकताच भाजपाने गुजरात मध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये 156 जिंकून महाविक्रम केलेला आहे. यापूर्वी कुठल्याही राजनीतिक पक्षाने इतक्या जागा जिंकल्या नव्हत्या.तेव्हढ्या जागा भाजपाने जिंकलेल्या आहेत. हा महाविक्रम आहे. सातत्याने एखाद्या पक्षाने एखाद्या राज्यामध्ये विजय मिळवीत जाण्याची ही अनोखी घटना आहे. काँग्रेस आणि आप यांनी गुजरातमध्ये कितीही हातपाय आपटले तरीही त्यांना विशेष काही करता आलेले नाही व मतदारांनी निवडणुकीचा कौल भाजपाच्या  बाजूने दिलेला आहे.गुजरात म्हणजे विकास गुजरात म्हणजे मोदी असे समीकरण आहे.**

संपूर्ण देशासाठी गुजरात हे विकासाचे मॉडेल आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी भाजपाने विकासाचे हे मॉडेल तयार केले त्या ठिकाणी जर भाजपा जिंकला नाही तर देशामध्ये जो संदेश जाईल तो चुकीचा राहील. म्हणून भाजपाच्या सर्वच ज्येष्ठ श्रेष्ठ लोकांनी गुजरातवर आपली संपूर्ण शक्ती पणाला लावलेली होती. मतदारांनी सुद्धा त्यांना निराश केले नाही. मागच्या निवडणुकीत भाजपा आणि काँग्रेस यांच्या जागांमधील अंतर फार कमी होतं. त्यामुळे आता भाजपाच्या हातून गुजरात जाईल की काय अशा पद्धतीच्या शक्यता वर्तविण्यात येत होत्या. परंतु मागच्या वेळेस च्या सर्व चुका भरून काढत भाजपाने काँग्रेस कडून जागा हिसकावलेल्या आहेत. काँग्रेसच्या जागा कमी झाल्या ही भाजपा करता तेवढी आनंदाची गोष्ट नसेल जेवढी आपने गुजरातमध्ये मिळवलेला विजय ही भाजपा करता तेवढीच चिंतेची गोष्ट आहे. आपने सत्ता स्थापनेचे दावे कितीही केले असले तरीसुद्धा त्यांना पाच जागांवर समाधान मानावे लागलेले आहे. परंतु भाजपाच्या या गडामध्ये आपचा प्रवेशही का व्हावा हे भाजपच्या नेत्यांना निश्चितच सलत असणारच आहे. सत्ताधारी पक्षाला जनतेने जर नाकारले तर त्याला अँटी इंकंबन्सी म्हणजे सत्तेविरुद्ध जनादेश अशा पद्धतीने म्हणण्याची परंपरा आहे. त्यामुळे सत्ताधारी जर  पराभूत झाले तर ते व त्यांचे कार्यकर्ते स्वतःला सत्तेविरुद्ध जनतेचा रोष होता असे सांगून समजावीत असतात. परंतु अँटी इंकंबन्सी जर



हिमाचलमध्ये होती तर गुजरात मध्ये का नव्हती  ?असे काय आहे की ज्याच्यामुळे गुजरात मध्ये वारंवार सत्तेत असून सुद्धा जनता भाजपच्या पाठीमागे उभी आहे याचा विचार हिमाचल मधील भाजपा नेतृत्वाने करण्याची आवश्यकता आहे. केंद्रामध्ये मोदींचे सरकार व हिमाचल मध्ये सुद्धा भाजपा सरकारच होते .असे असताना विकासाचे डबल इंजिन जनतेने का नाकारले हा एक मोठा प्रश्न आहे .हिमाचल हे सीमावर्ती राज्य आहे. त्यामुळे देशाच्या सीमा या सुरक्षित असल्या पाहिजे. तेथून घुसखोरी, तस्करी असे उद्योग चालायला नको यासाठी सीमावर्ती राज्य म्हणून  व हिमाचल छोटे असले तरीसुद्धा भाजपाने तेथे व्यवस्थित लक्ष देणे आवश्यक होते. घटना घडून गेल्यावर त्यावरती कितीही विश्लेषण केले व दुःख व्यक्त केले तरीही जे घडून गेले ते घडून गेले त्याची भरपाई पुन्हा होत नाही. त्यासाठी पुन्हा पाच वर्ष थांबणे किंवा ऑपरेशन लोटस ची वेळ येण्याची वाट पाहणे या व्यतिरिक्त दुसरे काही हाती राहत नाही. प्रथम क्रमांक मिळविणे कठीण आहे. पण त्यापेक्षाही तो टिकवणे जास्त कठीण आहे. एकदा जर विजयाची चव तुमच्या नेतृत्वाला आणि कार्यकर्त्यांना लागली तर त्यानंतर मात्र पराभव पचविणे जड जात असते. ज्या पद्धतीने आज आपने गुजरात मध्ये चंचू प्रवेश केलेला आहे. या प्रवेशाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही एकेकाळी काँग्रेस हा अत्यंत बलाढ्य आणि मोठा पक्ष होता आणि भाजपा मात्र वेगवेगळ्या राज्यात चंचू प्रवेश करून आपली उपस्थिती दाखवीत होता. तो चंचू प्रवेश करणारा भाजपा आज सत्ताधारी बनला आहे.काँग्रेसने भाजपाच्या संभाव्य शक्तीकडे केलेले हे दुर्लक्ष काँग्रेसला भोवले असे म्हणायला हरकत नाही. तेच भाजपाचे होऊ नये यासाठी नेतृत्वाने लक्ष देणे आवश्यक आहे. ही चिंता व्यर्थ नाही आहे. कारण ज्या आप ने दिल्लीमध्ये विधानसभा  खेचून घेतली ती विधानसभा आता परत देण्याचे तो नाव घेत नाही आहे. भाजपा करता सुद्धा आप ही दिल्लीमध्ये एक मोठी डोकेदुखी बनलेली आहे. आणि आता तर त्यांनी भाजपाकडे  असलेली नगरपालिका सुद्धा हिरावून घेतलेली आहे. भाजपाच्या मतांची टक्केवारी जरी मागील वेळेस पेक्षा दिल्लीमध्ये वाढलेली असली तरीही त्यांच्या जागा मात्र कमी झाल्या आहे व आप ला तेथे पूर्ण बहुमत मिळालेले आहे. जर दिल्लीच्या जनतेने जो राज्यात असेल त्यालाच महानगरपालिका देण्याचा विचार केला तर कुठल्याही वेळेस राज्यात व महानगरपालिकेमध्ये अशा पद्धतीची पुनरावृत्ती होऊ शकते यासाठी आतापासूनच नेतृत्वाने दिल्लीसाठी कंबर कसण्याची आवश्यकता आहे. नाही म्हणता म्हणता आप ने पंजाब सुद्धा जिंकलेला आहे व आता तो एक राष्ट्रीय पक्ष झालेला आहे. त्याच्या या वाढत्या प्रभावाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.  अमेरिकेचे हस्तक जर निवडणुकीत भारतात जिंकायला लागले तर भारतीय लोकशाहीचा तो पराभवच ठरेल. त्यामुळे लोकशाही परिपक्व झाली पाहिजे. फुकट सोयी स्वीकारण्याची जनतेची मानसिकता बदलवली पाहिजे.जनतेचे प्रबोधन झाले पाहिजे. जनतेपर्यंत वास्तूस्थिती, राष्ट्रीय भूमिका व विकासाचे कार्य या गोष्टी घेऊन आम्ही पोहोचू शकलो पाहिजे. याचा विचार व यासाठी प्रयत्न निवडणुकीपूर्वी करणे व निकाल आपल्या बाजूने वळविणे हे आवश्यक आहे अन्यथा तो  केवळ पराभवानंतरचा अश्रू पातच ठरेल.

# माणसाला माणूसपण शिकवणारी कविता 'सलत राहतं काहीतरी'

आधुनिक केसरी

**'सलत राहतं काहीतरी' हा कवी प्रा.डॉ.अशोक पाठक यांचा कवितासंग्रह शीर्षकापासूनच वाचकाला आपल्याकडे आकृष्ट करतो.सलत राहणे हे वेगवेगळ्या प्रकारचे असू शकते.काही लोकांना दुसऱ्याचे चांगले झाले,म्हणून त्यांचे चांगले होणे सलत राहते.तर काही लोकांना मनात आकस ठेवून जगण्याची सवय असते,त्यामुळे काहींच्या मनात सलत असते;पण काही लोक असेही असू शकतात.ज्यांच्या मनात कुणाबद्दल कधीही आकस नसतो किंवा कोणाचे भले झाले म्हणून ते जळावू वृत्तीने ते कोणावर जळत नाहीत किंवा त्यांच्या मनात कोणी सलत नाही.मग तरीही कवीच्या मनात काय ? आणि का ? काहीतरी सतत राहत असेल असा प्रश्न पडतो.**

या कवितासंग्रहातील कवितांचे वाचन केल्यानंतर हळूहळू आपल्याला कवीला काय  ? आणि का सलत राहते हे कळते. इथले शासन-प्रशासन ज्यांच्याकडे मोठ्या अपेक्षेने पहावे. ज्यांच्याकडून काही आदर्श घ्यावेत असे लोक जेव्हा चुकीच्या पद्धतीने वागतात.जे शासन-प्रशासन ज्यांनी सर्वसामान्यांचे हित जोपासले पाहिजे;पण ते होताना दिसत नाही. सर्वसामान्यांची जेव्हा येथे कुचंबणा होते. तेव्हा त्याने न्याय तरी कुठे आणि कोणाला मागावा; म्हणून सामान्य माणूस जेव्हा न्याय मागायला जातो.तेव्हा इथली न्यायव्यवस्थाही खऱ्याची राहिलेली नाही. हे जेव्हा दिसून येते.तेव्हा कवीच्या मनात ह्या गोष्टी सलत राहतात.जेव्हा उच्चशिक्षित लोकही जातीवरून आणि धर्मावरून भेदभाव करतात.चुकीच्या प्रथा आणि परंपरा,अंधश्रद्धा यांना विरोध केला तर लोक काय म्हणतील ;म्हणून तशाच चुकीच्या पद्धतीने शिकलेले लोकही वागू लागतात.तेव्हा कवीच्या मनात ह्या चूकीच्या गोष्टी सलत राहतात. लोक एकमेकांचे कान भरून दुसऱ्यांच्या बद्दल मनात विषाची पेरणी करतात आणि त्याचे परिणाम मग सगळ्या समाजाला भोगावे लागतात. लोकांचे जगणे एक आणि वागणे एक हे मनात सलत राहते; म्हणून ते म्हणतात.

**'लोक समोर एक आणि माघारी एक बोलतात छळतात मग ह्या गोष्टी मनाला' (पृ.३३)**

लोकांच्या असल्या वागण्याचे कोणालाही काही घेणेदेणे नसते. जेव्हा आपल्या स्वतःवर वेळ येते, आपली गरज असते. तेव्हा मात्र हे लोक नम्र होतात,व्याकुळ होतात,दीनवाणे वाटू लागतात आणि दुसऱ्याच्या दुःखावर हे लोक खुशाल हसतात.हे असले लोक पाहिले की कवीला वाईट वाटते.लोकांनी चांगले वागले पाहिजे. स्वतःला जसा दुसऱ्याकडून मानसन्मान अपेक्षित आहे. तसाच मान सन्मान आपण दुसऱ्यालाही घ्यावा.हे लोकांना कळत नाही. जशी करणी,तशी भरणी या न्यायाने निसर्गचक्र चालत असते. माणसाला दुसऱ्याचे दोष पटकन दिसतात,परंतु आपले दोष दिसत नाहीत म्हणून ते म्हणतात.

**'आपल्यातले दोष न दिसे कुणा दुसऱ्याकडे बोट दाखवी पुन्हा पुन्हा'  ( पृ.२७ )**

समाजात वावरताना हे असले लोक भेटत गेल्यानंतर कुठल्या माणसाला समाधान वाटणार आहे.जिकडेतिकडे खोटे मुखवटे लावून भपकेबाज दिखावा करून जर माणसं जगत असतील तर त्यांच्या असण्याला काहीही अर्थ नाही.पण सगळीच माणसं वाईट नसतात.माणसं कुठून कुठून येतात आणि मनाचा ठाव घेतात व मनात कायमचे घर करतात. काही माणसं रोज माणसात,माणसाच्या गर्दीत असूनही एकटेएकटे असतात.त्यांना ही खोटी बेगडी गर्दी आवडत नाही. आपली वाटत नाही ,म्हणून गर्दीतही ते एकटेच असतात. पण ही माणसं ज्यांच्या संपर्कात येतील. त्यांच्या जीवनात चैतन्याचा प्रकाश पाडतात आणि एक दिवस आपल्यातून नकळत निघून ही जातात. त्या माणसां बद्दल ते म्हणतात.'

***अशीच असतात माणसं या***
***इथेच न सांगता एक दिवस***
***घरात सगळा उजेड करून***
***अंधारात गुडूप होऊन जातात***
***माणसं'  (पृ.१६)***




कधीकधी आपल्या मनाला न पटणाऱ्या घटना घडामोडी घडतात.  त्या न पडणाऱ्या घटना म्हणजे जणू आपल्या दुःखाचा उत्सवच घडत असतो,पण माणसाच्या हतबलते पुढे त्याचे कुणाला काही वाटत नाही. परिस्थिती पुढे कोणी काही करू शकत नाही,की कोणाची संवेदनाही जागी होत नाही.अशी संवेदनशिलता हरवत गेल्यामुळे माणसातली आपलेपणा,आपुलकी तर कमी झालीच पण त्यासोबतच आपल्या गावातले गावपणही कसे हरवत गेले याबद्दल ते म्हणतात.

***'माणसांना शोधण्यासाठी हे रस्ते दूर दूर गेले गर्दीत***
***माणसांच्या आपले गांव हरवले'  (पृ.३७)***

ह्या कवितासंग्रहातून समान धागे असलेल्या काही कविता आलेल्या आहेत. यामध्ये 'देवळीतले दिवे' हे प्रतिक वापरलेल्या काही कविता आलेल्या आहेत.देवळीतला दिवा हा अंधारात मार्ग दाखवणारा,संकटातून बाहेर पडण्यासाठी दिशादर्शक म्हणून असलेला,देवळीतला दिवा मानसिक अंधकारातून वैचारिक उजेड दाखवणारा आहे. पण काही विघ्नसंतोषी लोक या देवळीतल्या दिव्यालाही मुद्दामहून फुंकर घालून विझवण्याचा प्रयत्न करतात.लोकांच्या मनात द्वेष पसरवतात. अशा लोकांना कुठलीच प्रगती नको असते.त्याबद्दल ते म्हणतात.

**'जातीच्या नव्या भिंती उभ्या करून**
**काळोखाशी नातं सांगत आहेत माणसं**
**उजेडाशी पक्षपात करत देवळीतल्या**
**दिव्यांना फुंकर घालत आहेत माणसं'**
**(पृ.२९)**

कवीच्या मनातली ही फुंकर नुसती फुंकर नाहीतर समाजात जे कोणी वेगळं काही करण्याचा प्रयत्न करतात.वेगळे जगू वागू पहातात,परिवर्तन घडवू पहातात त्यांना कुठल्यातरी प्रकारचे अडथळे आणणे आहे. आपण पाहतो इथे नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे, कलबुर्गी,गौरी लंकेश यांच्यासारखे माणसं दिवसाढवळ्या मारले जातात.सगळेच माणसं असे बलिदान देऊ शकत नाही.मग भीतीपोटी काही लोक आपला खरा चेहरा बाजूला ठेवून त्यावर नवा चेहरा चढवून जगू लागतात.त्या बद्दल कवी अशोक पाठक म्हणतात.

***'आजचा दिवस भूतकाळात ढकलू लागलो***
***दिवे देवळीतले मलवू लागलो***
***स्वतःला फसवत फसवत***
***अंधारात मग्न होऊ लागलो'  (पृ.४७)***

देवळीतले दिवे पृ.५१, तिचे सगळे भास पृ. ६९,
या कवितांमधून देवळीतल्या दिव्यांचे संदर्भ येत राहतात. यानंतर झाडांचे संदर्भ त्यांचा अधिवास असलेल्या
झडून गेलीत पान, आदिम सुख,
ह्या झाडांनी,उदास रंग, लळा,झाडांच्या आतले,ही कुठपर्यंत पसरलीत झाडं,कळत असून नसून ह्या कवितांमधून झाडांचे असतेपण आणि इतर संबंध अधोरेखित होत राहतात.
तर आईची माया आईच्या असतानाच्या आठवणी आईची लेकरांसाठी होणारी तगमग आणि हे जग सोडून गेलेली आई आता कोणत्याच
तत्वज्ञानाने भेटणार नाही. हे वास्तव स्वीकारल्यानंतर व्याकूळ कवीच्या मनाची होणारी अवस्था व्यक्त करताना ते म्हणतात.

***'तिचे सगळे भास आता  मनात घर करत आहेत***
***भरत आहेत डोळे वरचेवर'***      **(पृ.६९)**

प्रा.सतीश बडवे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना,चित्रकार भ.मा.परसवाळे यांचे मुखपृष्ठ तसेच आतील कवितेला समर्पक रेखाटने.कवितासंग्रहचे बलस्थानेच आहेत.एकंदरितच माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे. जीवन जगत असताना जी काही मूल्य,तत्वे आहेत त्या तत्त्वांचा आपण अंगीकार केला पाहिजे. नाहीतर माणसांमध्ये आणि जनावरांमध्ये काहीच फरक असणार नाही.खऱ्या अर्थाने माणसाला माणूसपण शिकवणारी कविता 'सलत राहतं काहीतरी' मधून आपल्याला वाचायला भेटते.

**कवितासंग्रह- सलत राहतं काहीतरी**
**कवी- प्रा.डॉ.अशोक पाठक**
**प्रकाशक - कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे.**
**पृष्ठ -७०, मूल्य -१००**

- शरद ठाकर, सेलू जि.परभणी
८२७५३३६६७५

आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

आजकाल चायनीज पदार्थांचा सुळसुळाट, मंचुरियन, नूडल्स ह्यासारख्यापदार्थात कोबी, पातीचा कांदा, पात असतेच. त्यामुळे एरवी भाज्या बघीतल्या की नाक, तोंड वेंगडणारी मुले अरे त्या पदार्थांत किनई कबेज, स्पिनच, चिली, स्प्रिंग ओनियन घातली म्हणले की भाजी गट्टम् होते. जळलं मेलं लक्षण ! इंग्रजी नाव घेतली की नको असणाऱ्या भाज्या आपसूक पोटात जातात हे आजकालच्या मुलांच्या बाबतीत सर्रास दिसून येणारी गोष्ट. पण कोणाच्या का कोंबड्याने सुर्य उगवला हे महत्वाचे नाही का? इंग्रजी नाव घ्या नाहीतर स्वभाषेत नाव घ्या, पोटात भाज्या गेल्या की माय, आई मदर, मम्मी, अम्मा, अव्वा समस्त वर्ग एकदम खुषच ! मग स्प्रिंग ओनियन च्या पिकलची रेसिपी तुमच्यासाठी खास ! घ्या लिहून आणी कळवा नक्कीच आवडली का ते ! झटकन कमी साहीत्यात खमंग होणारी अशी पातीच्या कांद्याचे लोणचं याची रेसिपी .करा आणि कळवा नक्कीच...

**पातीच्या कांद्याचे लोणचं**

**साहित्य-**  8 ते 10 पातीचे कांदे, अर्धे लिंबू चवीनुसार मीठ, फोडणीसाठी तेल, मोहरी, हिंग, हळद, जिरे 2 चमचे लोणच्याचा मसाला , छोटा चमचा लाल तिखट इत्यादी. **कृती** - प्रथम कांदे स्वच्छ करून त्याला 4 भागात चिरा पाडून घ्या. नंतर एका बाउल मध्ये कांदे, लोणच्याचा मसाला,मीठ घालून मिक्स करा त्या वर अर्धे लिंबू पिळा नंतर वरून नेहमीप्रमाणे खमंग गरम  फोडणी घाला झटपट तयार आहे स्प्रिंग ओनियनचे लोणचे अर्थात पातीच्या कांद्याचे लोणचे. माझ्या आईची खास रेसिपी तुमच्यासाठी खास.

## पातीच्या कांद्याचे लोणचं



# नाती जपणाऱ्या प्रामाणिक कर्मचाऱ्याची कथा




अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**प्रत्येक नोकरी करणाऱ्या व्यक्तीच्या आयुष्यात निवृत्त होण्याचा दिवस येतो. उमेदीच्या काळापासून सुरु झालेला हा प्रवास, जबाबदारीतून मोकळे होऊन स्वतःसाठी, स्वतःच्या कुटुंबासाठी वेळ देण्याची संधी प्रदान करणारा तो दिवस म्हणजे रिटायरमेंट. निवृत्ती म्हणजे जीवनाची नवी आवृत्ती असते, असे म्हणतात. अर्थार्जनासाठी कायम मेहनत करणाऱ्या नोकरदार माणसाला उरलेले आयुष्य सुखा-समाधानाने जगायचं असतं. सगळ्या जबाबदाऱ्यांमधून मोकळं होऊन स्वतःसाठी काही करायचे असते. तर काहीना प्रश्न पडतो की , आता आपला वेळ कसा जाणार ?**

याच निवृत्तीच्या पार्श्वभूमीवर भाष्य करणारी एक लघु कादंबरी वाचकांच्या भेटीस आली आहे. लेखक सुनील पांडे हे नेहमीच नवनवीन संकल्पना घेऊन लेखन करत असतात. यावेळी ही ते नवी संकल्पना घेऊन आले आहेत. एक दिवसीय कादंबरी... ही संकल्पना वेगळी आहे. कादंबरी म्हंटले की त्याची व्याप्ती आणि विस्तार भिन्न असतो. पण एक दिवसीय कादंबरीच्या संकल्पनेद्वारे सुनील पांडे यांनी सदर कथानक अनेक बाजुनी सुंदररित्या फुलवले आहे. कादंबरीचे नाव आहे , 'गोष्ट एका रिटायरमेंटची'. ही एक दिवसीय कादंबरी आहे. एका दिवसात घडणारे हे कथानक असले तरी त्याला अनेक पदर आहेत. ही कथा आहे मुंबई महानगरपालिकेत ४० वर्षे शिपाई म्हणून प्रामाणिकपणे काम करून निवृत्त होणाऱ्या गजानन साठे यांची . तसेच सतत बॉसगिरी करणाऱ्या कडक शिस्तिच्या वाघमारे साहेबांची. दोघांच्या ही रिटायरमेन्टचा दिवस ३१ डिसेंबर.

३१ डिसेंबर यादिवशी घडणारे हे कथानक असले तरी वर्तमानातून भूतकाळात पुन्हा वर्तमानकाळात ही कादंबरी प्रवास करत राहते. फ़्लैश बैक तंत्राचा वापर लेखकाने उत्तमरित्या केलेला आहे. प्रामाणिक , मेहनती, माणुसपण जपणारे गजानन साठे म्हणजे मामा. ऑफिसमध्ये त्यांना संबोधतात. यावरून लक्षात येते, साठे यांनी ऑफिसमधील प्रत्येकाशी असलेले नाते किती प्रेमाने जपले आहे. साठे यांनी आपल्या प्रेमळ आणि संवेदनशील स्वभावाने कित्येक माणसे जपली आहेत. म्हणूनच ते निवृत्त होताना अनेकांना दुःख होत असल्याचे वाचताना जाणवते. या ४० वर्षाच्या नोकरीत कित्येक माणसे त्यांना भेटली , अनेक साहेब लोक पाहिले. या काळात जे अनुभव मिळाले, त्यांचा लेखाजोखा म्हणजे ही कादंबरी होय. ही कादंबरी फक्त गजानन साठे आणि वाघमारे साहेब यांची राहत नाही. तर यात साठे यांना प्रवासात भेटलेल्या जीवाभावाच्या माणसांचं जीवनपटच थोडक्यात या कादंबरीतून दर्शवलेले आहे. नोकरीच्या निमित्ताने साठे मामा लोकलने प्रवास करत. या लोकल प्रवासाने त्यांना अनेक मित्र लाभले. नोकरी व्यतिरिक्त आपली कला जोपासणारे साठे मामा कविता सुद्धा लिहितात. माणसाने एक तरी कला जोपासावी, हा संदेश देणारे हे साठे मामा आदर्श जीवनाची व्याख्या सांगतात.घरची परिस्थिती बेताची असली तरी आपल्या दिवंगत पत्नीच्या आठवणींना ते जपतात आणि मुलगी नलू हिच्या बालपणात रमतात. किती सुंदररित्या हे पात्र लेखकाने साकारले आहे. याउलट ऑफिसमधील बॉस वाघमारे. कडक शिस्तीचे, ऑफिसमध्ये काम करणाऱ्या लोकांशी ठराविक अंतर ठेवून वागणारे, सतत मेमो देणारे आणि चिडून बोलणारे. या स्वभावामुळे त्यांच्या आणि ऑफिसमध्ये काम करणाऱ्या अधिकारी, लिपिक , शिपाई यांमध्ये एक प्रकारची दरी निर्माण झालेली. वाघमारे साहेब रिटायर होण्याचा आनंद स्वाभाविक सगळ्यांना होणारच. शेवटी पद, पैसा, खुर्ची गेली की माणसाप्रति असलेला आदरही संपतो. माणसाचे चांगले वर्तन , आपुलकीचे बोल यामुळेच तो इतरांच्या कायम स्मरणात राहतो. साठे मामा यांनी आपल्या प्रेमळ, नम्र स्वभावाने इतरांच्या मनात आपले स्थान निर्माण केले.




वाघमारे यांना अपेक्षित असलेले गुण न मिळाल्यामुळे त्यांच्या मुलाने केलेली आत्महत्या, पत्नीशी असणारा विसंवाद, स्वतःच्या मुलीने पळून जाऊन केलेले लग्न . ह्या सर्व घटनांमुळे उद्विग्न झालेले वाघमारे स्वतःच्या स्वभावामुळे माणसं, नाती जपण्यात अपयशी ठरतात. आपले वडील आपल्याशी बोलत नाहीत, तरीही आपल्या वडिलांवर जीवापाड प्रेम करणारी माधुरी ( वाघमारे यांची मुलगी) साठे मामाकडे आपलं मन मोकळे करताना दिसते. नात्यांतील नाजुक पदर हळूहळू आपल्या ओघवत्या शैलीत लेखकाने उलगडले आहेत. प्रथमपुरुषी निवेदन, पात्रांचे संवाद आणि लेखकाची यत्तम लेखनशैली, कथानकाची आकर्षक रचना वाचकांना गुंतवून ठेवते.

गजानन साठे यांच्याकडे भलेही संपत्ती नाही पण आपली माणसे आहेत, नाती आहेत. दुसरीकडे बॉस वाघमारे, मुबलक मालमत्ता, श्रीमंत असूनही सुखाला पोरके झालेले , नाती न जपणारे. हा फरक या कथानकातून अधोरेखित केला आहे. फक्त पैसा महत्त्वाचा नाही तर माणुसकी असायला हवी, माणसे जोडायला शिकले पाहिजे, माणुसकी हिच खरी संपत्ती आहे, ही शिकवण देणारी ही कादंबरी आहे. गजानन साठे हे आपलं आयुष्य किती प्रामाणिकपणे जगतात तसेच आपले बॉस वाघमारे यांना माणुसकीची जाणीव कसे करून देतात, याची संवेदनशील गोष्ट म्हणजे ही कादंबरी.

आपल्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांशी कसे वागावे, उच्च - नीच हा भाव न ठेवता आपुलकिने कसे वागावे, याची शिकवण यातून मिळते. निवृत्तीनंतरचे आयुष्य कसे जगावे, कलेची साधना कशी करावी, कला कशी जपावी , आनंदी , समाधानी जीवन कसे जगावे, याची मौलिक शिकवण देणारी ही एक दिवसीय कादंबरी प्रत्येकाने वाचावी. ही एक दिवसीय कादंबरी संपूर्ण आयुष्याला कलाटणी देणारी आहे .

ही कादंबरी लेखकाने साहित्यिक नागेश शेवाळकर यांना अर्पण केली असून कादंबरीचे समर्पक मुखपृष्ठ संतोष घोंगडे यांनी साकारले आहे. तसेच डॉ. स्नेहल तावरे यांनी पुस्तकाची पाठराखण केली आहे.एकूणच काय, ही कादंबरी वाचा आणि जीवनाच्या नव्या आवृत्तीला प्रारंभ करा !

**( गोष्ट एका रिटायरमेंटची -एक दिवसीय कादंबरी /लेखक सुनील पांडे / स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे / मूल्य : १५० रुपये )**

# ज्येष्ठांनो बक्षीस पत्र करताना काळजी घ्या




सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**मुलांच्या नावे संपत्ती करताना मुलांकडून म्हातारपणी काळजी घ्यावी अशी अट लिखित स्वरुपात लिहून घ्यावी, असं महत्वाच निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलं आहे. अन्यथा मुलांनी त्यांच्या वृद्ध पालकांकडे दुर्लक्ष केल्यास पालकांनी केलेलं बक्षीस पत्र (गिफ्ट डिड) रद्द होऊ शकत नाही. न्यायमूर्ती संजय के. कौल आणि ए. एस. ओका यांच्या खंडपीठाने मंगळवारी जेष्ठ नागरिकांना हा सल्ला दिला आहे. गुरुग्राममधील एका आईने तिच्या मुलांना काही मालमत्ता भेट दिल्या होत्या. त्यानंतर मुले तिची काळजी घेत नसल्याचा आरोप करून तिने नंतर बक्षीस पत्र रद्द करण्यासाठी मेंटेनन्स ट्रिब्युनलकडे धाव घेतली.**

न्यायाधिकरणाने आरोप खरे ठरल्यानंतर मे २०१८ मध्ये बक्षीस पत्र रद्द केले. पंजाब आणि हरियाणा हायकोर्टाने न्यायाधिकरणाच्या निर्णयाशी सहमती दर्शवली आहे. मात्र, न्यायमूर्ती कौल आणि ओका यांनी या निर्णयाला स्थगिती दिली आहे. बक्षीस पत्रामध्ये वृद्ध महिलेने तिची तीन मुले, दोन मुली आणि एक मुलगा यांना मालमत्ता भेट म्हणून देताना तिच्या देखभालीसाठी स्पष्ट उल्लेख नाही. त्यामुळे बक्षीस पत्र रद्द करता येऊ शकणार नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले आहे. अनेकदा जेष्ठ नागरिकांना मुलं आजारपणात व वृद्धापकाळात त्यांची देखभाल करतील, अशी आशा असते. मुलांकडून त्यांना फार अपेक्षा असतात त्यामुळं मुलांच्या प्रेमापोटी ते स्व-कमाईतून कमावलेली मालमत्ता बक्षीस पत्राद्वारे विनाअट त्यांच्या नावे करतात. जेष्ठ नागरिक जेव्हा त्यांची मालमत्ता त्यांच्या जवळच्या लोकांना किंवा मुलांच्या नावे देतात तेव्हा त्याबदल्यात जेष्ठ नागरिकांची काळजी घ्यावी, अशी अट त्यात जोडलेली नसते. बऱ्याचदा असे निर्णय प्रेम आणि आपुलकीच्या भावनेने घेतले जातात. त्या बदल्यात कोणतीही अपेक्षा ठेवली जात नाही. वृद्धापकाळात मुलं मात्र पालकांकडे साफ दुर्लक्ष करतात. मुले मोठी झाल्यावर मालमत्ता स्वतःच्या नावावर करत आई-वडिलांना घरातून बाहेर काढतात, त्यांच्या औषधांसाठी किंवा खर्चासाठी पैसे न देणे, उपासमार होणे, मानसिक छळ होणे, त्यांना मारहाण करणे, अशा अनेक समस्यांना आजही देशातील तील ज्येष्ठ नागरिक तोंड देत आहेत. आई-बाप जन्मभराची पुंजी मुलांवर खर्ची घालतात. घरदार मुलांच्या नावे करतात... आणि मग एक टप्पा असा येतो, की त्या घरातल्या म्हाताऱ्या आई-वडिलांचे किंवा त्यातल्या एकाचे अस्तित्व मुलांना, सुनांना अगदी नातवंडांनाही घरात नकोसे होते. त्यांना नैतिकतेचे, सामंजस्याचे, सुस्वभावाचे डोस देणे सुरू होते. ज्येष्ठांना सन्मानाने जगता यायचे असेल तर हे वातावरण



बदलण्याची आवश्यकता आहे. मुलगे आणि मुली या दोघांवरही ज्येष्ठांच्या देखभालीची जबाबदारी असायला हवी. वडिलांच्या संपत्तीत मुलींना मुलांएवढाच वाटा देण्याचा कायदा असेल आणि तो मुलींकडून अधिकाराच्या प्रस्थापनेसाठी वापरला जात असेल तर मुलींवर सुद्धा जबाबदारीही टाकली पाहिजे. विनाअट बक्षीस पत्र दिल्याने वृद्धापकाळात जरी भेट दिलेली संपत्ती परत घेण्याची पालकांची ईच्छा असली तरी ते असं कायद्याने करु शकत नाहीत. त्यामुळे पालकांनी आपली संपत्ती मुलांच्या नावे मालमत्ता बक्षीस पत्र करताना मुलं आपला वृद्धापकाळात योग्य ती काळजी घेतील अशी अट घातली पाहिजे. जर मुलांनी अशा सुविधा आणि भौतिक गरजा प्रदान करण्यात नकार दिला किंवा ते यात अपयशी ठरले तर साहजिकच कायद्यानुसार मालमत्ता हस्तांतरण फसवणूक किंवा जबरदस्तीने किंवा अवाजवी प्रभावाने केले गेले आहे असे मानले जाईल. असे हस्तांतरण नंतर हस्तांतरणकर्त्याच्या विनंतीनंतर रद्द करण्यायोग्य बनते आणि देखभाल न्यायाधिकरणाला हस्तांतरण रद्द म्हणून घोषित करण्याचा अधिकार प्राप्त होतो. जेव्हा तुम्ही तुमच्या मालमत्तेचे कोणतेही मूल्य न घेता विनामूल्य हस्तांतरित करता, तेव्हा ते बक्षीस पत्र म्हणून केले जाते. साधारणतः एखादी व्यक्ती जवळच्या नातेवाईकालाच मालमत्ता भेट देऊ शकते. भेट म्हणून दिलेली मालमत्ता सहसा परत करता येत नाही. मालमत्ता हस्तांतरण कायद्याचे कलम १२६ बक्षीस पत्र कोणत्या परिस्थितीत रद्द केले जाऊ शकते याच्याशी संबंधित आहे. भेट देणारा आणि घेणारा दोघेही या मुद्द्यावर सहमत असल्यास, बक्षीस पत्र परस्पर संमतीने निलंबित किंवा रद्द केली जाऊ शकते. जर बक्षीस पत्रावर वर स्वाक्षरी करूनही मालमत्ता हस्तांतरित केली गेली नाही आणि भेट देणाऱ्याने नंतर त्याचा/तिचा निर्णय बदलला, तर बक्षीस पत्र त्याच्या इच्छेनुसार रद्द केली जाऊ शकते. उदाहरणार्थ एखाद्या व्यक्तीने आपले राहते घर आपल्या भावाला बक्षीस पत्र केले. तरी जोपर्यंत ते नोंदणीकृत होत नाही तोपर्यंत त्या घराचा मालकी हक्क भावाला मिळत नाही. फसवणूक किंवा जबरदस्तीने मिळवलेली मालमत्ता रद्द केली जाऊ शकते. जर बक्षीस पत्रामध्ये मालमत्ता भेट देण्यासाठी आवश्यक अट म्हणून कोणतीही तरतूद असेल आणि ती पूर्ण झाली नाही, तरीही बक्षीस पत्र रद्द केले जाऊ शकते. उदाहरणार्थ, जर एका वडिलांनी आपल्या मुलाला त्याची संपत्ती या अटीवर भेट दिली की तो त्याची आयुष्यभर काळजी घेईल आणि नंतर मुलाने ही जबाबदारी पार पाडली नाही, तर वडील त्याचे बक्षीस पत्र रद्द करून मालमत्तेवर परत दावा मिळवू शकतो. अशा एका प्रकरणात २०१८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने ज्येष्ठ नागरिक प्राधिकरणाचा निर्णय योग्य ठरवत मुलगा आणि सुनेच्या नावे केलेले एक बक्षीसपत्र रद्द केले आहे. आपली मालमत्ता आपल्या मुलांना किंवा जवळच्या नातेवाईकांना बक्षीस पत्र देत असताना काही अटींच्या अधिन राहून जर बक्षीस पत्र दिले तर ज्येष्ठांचा वृद्धापकाळ निश्चितच सुरक्षित व सुखकारक जाऊ शकेल हाच सर्वोच्च न्यायालयाच्या या सल्ल्यातून घ्यावयाचा बोध आहे.

# नद्यांचे संवर्धन करणे गरजेचे!



आधुनिक केसरी

निसर्ग आणि मानवामध्ये नद्या जीवनदायीनी आहेत.पाण्यावाचुन नदीचे अस्तित्व नाही.नद्यावरच मानवाचे व निसर्गाचे अस्तित्व अवलंबून आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत नदीला खुप महत्वाचे स्थान आहे.परंतु आज नद्यांची अवस्था खुपच वाईट झालेली आहे. पुर्वी सारखे नद्यांचे पाणी आता स्वच्छ राहीलेले नाही.पृष्ठभागावरील पाण्याचा सुमारे ९२ टक्के वापर करण्यात योग्य राहीलेला नाही. असं प्रदुषण नियंत्रण बोर्डाचे म्हणणे आहे. आज देशातील नद्या दुषित झाल्या आहेत. नद्यांमध्ये घाण पाणी सोडले जाते. वाढते औद्योगिकीकरण व शहरीकरणामुळे सांडपाणी नद्यांत सोडले जाते. कारखान्यातील सांडपाणी, बहुतांश देशातील नद्या घाण होण्यामागचे मुख्य कारण आहे. नद्यांनी आपली शुद्धता सोडली आहे. नद्यांचे संवर्धन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे. मानवजातीसाठी व जैवविविधतेसाठी नद्या महत्वाच्या आहेत. नद्यांचे सौंदर्य अबाधित राखणे आपलं कर्तव्य आहे.व जबाबदारी देखील आहे. त्यासाठी नद्यांची स्वच्छता करून नद्या प्रदुषणरहीत ठेवण्यासाठी प्रयत्न करायला हवा.नद्यांच्या पुनरूज्जीवनासाठी अथक प्रयत्न होणे गरजेचे आहे. सध्या देशात ठीक ठिकाणी नद्यांचे पुनरूज्जीवन करण्याचे काम चालू आहे. राज्यात देखील नद्यांचे पुनरूज्जीवनाचे काम हाती घेतले आहे. जलतज्ञ राजेंद्रसिंह यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात आहे. जवळपास ७५नद्यांचा यात समावेश आहे.

आज जवळपास देशात बहुतांश नद्यांना प्रदुषणाने ग्रासले आहे. भविष्यातील धोके ओळखता नद्यांच्या संवर्धनासाठी अथक पावले उचलण्याची गरज आहे. आपल्या पुढच्या पिढीसाठी नेसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

# अपमान आणि उपकार

आधुनिक केसरी

एकदा दोन मित्र वाळवंटातून चाललेले असतात, रस्त्यात त्यांच्यात काहीतरी बाचाबाची होते आणि बाचाबाचीचे रुपांतर भांडणात होते. इतके कडाक्याचे भांडण होते कि एक मित्र दुसऱ्या मित्राच्या थोबाडीत ठेवून देतो. ज्याला थोबाडीत बसते तो दुसरा मित्र खूप दुःखी होतो, गप्प बसतो आणि वाळूमध्ये बोटाने लिहितो," आज माझ्या प्राणप्रिय मित्राने मला थोबाडीत दिली, ज्याला मी जीवापाड मैत्री करतो त्याने मला आज मारले." ज्याने थोबाडीत मारलेली असते तो हे पाहतो पण काहीच न बोलता दोघेही पुढे चालत राहतात. पुढे गेल्यावर त्यांना एक तलाव दिसतो, दोघेही जण पाण्यात उतरून स्नान करायचे ठरवतात, अंघोळ करता करता थोबाडीत खाल्लेला मित्र अचानक पाण्यात घसरतो, तिथे नेमकी दलदल असते, तो जोरजोराने ओरडायला सुरुवात करतो. ज्याने थोबाडीत मारलेली असते तो मित्र क्षणाचाही विचार न करता आपल्या मित्राच्या सहाय्याला धावतो आणि त्याला त्या दलदलीतून बाहेर ओढून काढतो. जेंव्हा तो बुडणारा मित्र पाण्याबाहेर येतो, अंग कोरडे करतो तेंव्हा तो एका दगडाने दगडावर कोरून लिहितो,"आज माझ्या प्राणप्रिय मित्राने मला मरणाच्या दारातून ओढून परत आणले, मी आज मेलोच असतो पण त्याने स्वतःचा जीव धोक्यात घालून मला वाचविले." हे पण तो थोबाडीत देणारा वाचतो आणि त्याला राहवत नाही तो त्या मित्राला विचारतो कि,"पहिले मी तुला मारले तर ते तू वाळूत लिहिले आणि आता तुला पाण्यातून वाचविले तर ते तू दगडावर कोरून लिहिले हे असे का?" लिहिणारा मित्र म्हणाला," जेंव्हा कोणी आपल्या ह्रदयाला, मनाला, भावनेला ठेच लावेल तेंव्हा ते सर्व काही वाळूत लिहावे कारण काही काळानंतर वाळू हि विस्कळीत होऊन जाते आणि मनातील भावनाही फार काळ एकसारख्या राहत नाहीत. पण जर कुणी उपकार केले तर ते मात्र दगडावर कोरून लिहिले कारण दगडावर कोरलेले जसे कायमस्वरूपी टिकून राहते तसे उपकार हे कायम लक्षात ठेवले जावेत.

# समृद्धी महामार्ग : देवेंद्र फडणवीस यांचा महत्वकांक्षी प्रकल्प पुर्णत्वास

आधुनिक केसरी

**समृद्धी महामार्गाचा पहिला टप्पा नागपूर - शिर्डीचे लोकार्पण ११ डिसेंबर २०२२ रोजी देशाचे नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते नागपूर येथे होणार आहे. पहिल्या पंचवार्षिक मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या 'ड्रीम प्रॉजेक्ट' पैकी एक असलेला ७०१ किलोमीटरचा समृद्धी महामार्ग आहे. मुंबई नागपूर द्रुतगती मार्गाचे भूमिपूजन समारंभ डिसेंबर २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते झाला. "ज्या प्रकल्पाचे भूमिपूजन आम्ही करतो, त्या प्रकल्पाचे लोकार्पण देखील करतो" ही पंतप्रधान नरेंद्र मोदीजी संकल्पना फडणवीस यांनी जोपसली आहे. महाराष्ट्राला समृद्ध करणारा महामार्ग असेल.**

जनतेच्या मनाशी जोडणारा महामार्ग- राज्याच्या राजधानीचा उपराजधानीशी थेट जोडलेला हा पहिला महामार्ग आहे. ७०१ किलोमीटर अंतरचा प्रवास अवघ्या ८ तासांत पूर्ण होणार. समृद्धी महामार्गामुळे राज्यातील विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि कोकण हे विभाग जोडल्याने या चार विभागातील शेतकऱ्यांना, व्यावसायिक, उद्योजकांना दळणवळणात सुलभता निर्माण होईल. राज्यातील २० जिल्ह्यांमधून समृद्धी महामार्ग जात असून, तरुणांना रोजगार निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात वाव असणार. समृद्धी महामार्ग पहिला महामार्ग असेल की, ज्यात गावे किंवा शहरे विस्थापित झालेली नाहीत.

शेतकऱ्यांना समृद्ध करणारा महामार्ग - ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या महामार्ग मध्ये गेल्या आहेत, त्या शेतकऱ्यांना रेडी रेकनर दराच्या दहा पट मोबदला देण्यात आला आहे. रेडी रेकनर च्या दहा पट मोबदला मिळाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धी देणारा राज्यातील पहिला महामार्ग म्हणून समृद्धी महामार्गाची ओळख असणार. समृद्धी महामार्गामुळे शेतकऱ्यांना शेती व्यवसाय फायदेशीर ठरणार आहे. विदर्भ, खानदेश मधला शेतकरी आपला माल थेट मुंबईच्या बाजारात घेऊन येण्याची सोय असल्यामुळे शेती व्यवसायात तेजी येणार. समृद्धी महामार्ग बहुतांशी शेत शिवारातून जात असल्याने महामार्गावर १७ ठिकाणी कृषी समृद्धी केंद्र असणार आहेत. या गतिमार्गास जिथे इतर राज्य किंवा राष्ट्रीय महामार्ग छेदतील तिथे ही कृषी समृद्धी केंद्रे विकसित केली जाणार आहेत. अशा दोन नगरांमधले सरासरी अंतर ३० कि.मी. असणार आहे. या केंद्रांमध्ये शेतीवर आधारित अन्न व फळ प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य असेल आणि त्याशिवाय तिथे अन्य उत्पादन आणि व्यापार केंद्रही असेल. याबरोबरच इथे सर्व मूलभूत सोयीसुविधांसकट रहिवासी क्षेत्रही असेल. आधुनिक नगररचनेच्या नियमांनुसार इथले जमीन वापराचे प्रमाण ठरविले जाईल. जमिनीचा अर्धा भाग हा निवासी क्षेत्रासाठी राखीव असेल.

राज्यातील पर्यटन , धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना एकत्र जोडणारा समृद्ध महामार्ग - या महामार्गामुळे राज्यातील अनेक पर्यटन स्थळे एका मार्गावर आलेली आहेत. पर्यटन स्थळात लोणार सरोवर, वेरूळ अजिंठा लेणी, पेंच राष्ट्रीय उद्यान समृद्धी महामार्गावर जोडली आहेत. धार्मिक स्थळात बुलढाणा जिल्ह्यातील गजानन महाराज शेगाव आणि नगर जिल्ह्यातील शिर्डी ही महत्त्वाची धार्मिक स्थळाची कनेक्टिव्हिटी निर्माण झाली आहे. ऐतिहासिक स्थळात वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील देवगिरी किल्लाच्या परिसरातून हा महामार्ग जात असल्याने ऐतिहासिक पर्यटन स्थळ ही या समृद्धी महामार्गाने एकत्र आलेले आहेत.



राज्यातील एकमेव 'ग्रीन फिल्ड' इंडस्ट्रीयल कॉरिडॉर महाराष्ट्रातील पहिला 'ग्रीन फिल्ड' महामार्ग अशी नोंद समृद्धी महामार्गाची होणार.मुंबई नागपूर समृद्धी द्रुतगती महामार्गाचे ग्रीन कॉरिडॉरमध्ये रूपांतर होणार आहे. एमएसआरडीसीने रस्त्यालगत १२.६८ लाख झाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय द्रुतगती मार्गाच्या मध्यभागी १२.८७ लाख लहान झाडे आणि झुडपे आणि कंपाउंड वॉलच्या आत ३.२१ लाख झुडपे लावण्यात येणार आहेत. कॉरिडॉरच्या बाजूने २५० मेगावॅटचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याची सरकारची योजना आहे. या समृद्धी एक्सप्रेस वे हरित प्रकल्पासाठी अंदाजे ९०० कोटी रुपये खर्च येणार आहे, ज्यामध्ये सात वर्षांसाठी झाडे आणि झाडांच्या देखभालीचा खर्च देखील समाविष्ट आहे. तसेच, समृद्धी एक्सप्रेस वेच्या प्रत्येक झाडाला जिओटॅग केले जाईल.

प्रति तास १५० किलोमीटरच्या वेगाने वाहने महामार्गावर धावणार- यामुळे नागपूर - मुंबई प्रवास आता ८ तासात पूर्ण होणार आहे. एकाच महामार्गावर २० जिल्ह्याच्या २६ तालुक्यातील ३९२ गावांना जोडणारा हा समृद्धी महामार्ग आहे. वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी २४ ठिकाणी प्रवेश मार्ग आणि बाहेर पाडण्याचे ची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच या २४ ठिकाणी टोल नाके निर्माण केले आहेत.

समृद्धी महामार्ग इंडस्ट्रीयल कॉरिडॉर अशीही ओळख निर्माण होणार आहे. कारण, नागपूर मधला 'मिहान' कॉरिडॉरशी कनेक्टिव्हिटी निर्माण समृद्धी महामार्गामुळे झाली आहे. राज्यात उद्योग धंदे वाढीसाठी महामार्गालगत औद्योगिक वसाहतीसाठी इंडस्ट्रियल भूखंड राखीव ठेवण्यात आले आहेत. भविष्यात या महामार्गालगत १० ते १५ लाख रोजगाराच्या संधी विविध क्षेत्रात निर्माण होणार आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मरारविम) या प्रकल्पाची अंमलबजावणी करणारी संस्था असेल. सपाट जमिनीवर या मार्गावर वाहनांची वेगमर्यादा ताशी १५० किमी असेल व सह्याद्री घाटात ताशी १०० किमी असेल. राज्य सरकार या मार्गावर २४ शहरे तयार करणार आहे. या शहरांत अत्याधुनिक आरोग्य सुविधा, कौशल्य व्यवस्थापन केंद्रे, आयटी पार्क आणि शैक्षणिक संस्था असतील. या प्रकल्पासाठी १० जिल्ह्यांतून एकूण २८,२८० हेक्टर जमीन अधिग्रहित केली गेली आहे, त्यातील ८,५२० हेक्टर महामार्गासाठी वापरली जाणार आहे तर १०,८०० हेक्टर ही नवीन नगरांसाठी असेल. प्रकल्पासाठी वित्तपुरवठा करण्यासाठी मरारविमला बँकांकडून २८ हजार कोटी रुपयांच्या कर्जाची गरज आहे. महामार्गावरील पूर्व बांधकाम कार्याचा वेग वाढविण्यासाठी, मरारविमने या प्रकल्पाला पाच पॅकेजमध्ये विभागण्याचा निर्णय घेतला आणि प्रत्येक पॅकेजसाठी तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी स्वतंत्र सल्लागार कंपनी नेमली. नागरी काम आता १६ पॅकेजमध्ये विभाजित करण्यात आले आहे.

हा गतिमार्ग ठाणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बुलढाणा, वाशीम, अमरावती, वर्धा आणि नागपूर या दहा जिल्हंयातून जाईल. हा १२० मीटर रुंदीचा असेल. यामधला मध्यवर्ती दुभाजकाचा भाग हा २२.५ मीटर्सचा आहे. यामध्ये दोन्ही बाजूला चार-चार अशा एकूण आठ मार्गिका (लेन्स) असतील. जर भविष्यात एखादी मार्गिका वाढवायची झाली तर त्यासाठी रस्त्याच्या मध्यात असलेल्या मोकळ्या भागाचा उपयोग करता येईल. त्यामुळे भविष्यात ज्यावेळी नव्या मार्गिका हव्या असतील तेव्हा त्यासाठी १२० मीटर्सच्या आखणीबाहेरील जमिनीची गरज लागणार नाही. या प्रकल्पात ५०हून अधिक उड्डाणपूल आणि २४हून अधिक छेदमार्ग (इंटरचेंजेस) असणार आहेत. या खेरीज या मार्गावर ५पेक्षा जास्त बोगदे, वाहनांसाठी महामार्गाच्या खालून जाणारे४००हून अधिक भुयारी मार्ग तर पादचाऱ्यासाठी ३००हून अधिक भुयारी मार्ग अनेक मोक्याच्या ठिकाणांवर बांधण्यात येणार आहेत. यामुळे मुख्य गतिमार्गावरील वाहतूक कोणत्याही व्यत्ययाशिवाय सुरळीत चालू राहील. तसेच स्थानिक जनतेलाही त्यांच्या दळणवळणात महामार्गाचा कोणताच अडथळा होणार नाही, आणि अपघात टाळले जातील. या गतिमार्गावरील प्रवेश व बाहेर पडण्याची ठिकाणे नियंत्रित असतील. महामार्गावर जेवढे अंतर कापले गेले त्यानुसार टोल आकारला जाईल. महामार्गावर स्वयंचलित टोल आकारणी बसवण्याचा प्रस्ताव आहे. या द्रुतगती महामार्गाच्या कडेला असलेल्या पूरक मार्गामध्ये सेवावाहिन्या जसे ओएफसी केबल्स (OPTICAL FIBER CABLE), गॅस पाईप लाईन्स आणि वीज वाहतूक करणाऱ्या टाकल्या जातील.

समृद्धी महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे उदघाटन ११ डिसेंबर २०२२ ला पंतप्रधान नरेंद्र यांच्या हस्ते होणार आहे. नागपूर ते शिर्डी या ७०१ किमीच्या नागपूर मुंबई समृद्धी महामार्गाचा पहिला टप्पा ११ डिसेंबर २०२२ पासून कार्यान्वित होईल. पहिला टप्पा नागपूर ते शिर्डी दरम्यान ५२० किमीचा आहे. हा महामार्ग खुला झाल्यानंतर नागपूर ते शिर्डी अंतर १० तासांऐवजी ५ तासांत कापता येईल.

**शब्दांकन :**

**भाऊसाहेब वाकचौरे पाटील**

**संयोजक, भाजपा, सोशल मीडिया सेल, उत्तर नगर जिल्हा**

# बालमनाची निसर्गाशी नाळ जोडणारा कवितासंग्रह - ' माझे गाणे आनंदाचे.'

आधुनिक केसरी

कथा, कादंबरी, ललित, कविता अशा साहित्य प्रकारांतून कसदार लेखन करणारे साहित्यिक म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला सुपरिचीत असलेले डॉ. कैलास दौंड यांनी बालकांसाठी माझे गाणे आनंदाचे हा बालकविता संग्रह लिहिला आहे.

बालमनाला आपल्या सभोवती असलेल्या गोष्टी, घडणाऱ्या घटनांबद्दल कुतूहल असते. त्याविषयी जाणून घेण्याची उत्कट इच्छा असते. सभोवतीच्या छोट्या छोट्या गोष्टी त्यांना खुणावत असतात. त्यांच्याशी खेळण्या बागडण्यातून त्यांचा संवाद होत असतो. अशा विविध दैनंदिन अनुभवांची माळ गुंफलेल्या कविता बालमनाला आनंदाची अनुभूती करून देणाऱ्या आहेत. या कविता संग्रहात कवी,

***'कठीण असती डोंगरवाटा***
***दगड आणि चुकवीत काटा***
***टाळून धोका सांभाळून जाऊ***
***चला मुलांनो आपण सारे फिरायला जाऊ.'***

असे म्हणत निसर्गाकडे उघड्या डोळ्यांनी बघण्याची तसेच निसर्ग निरीक्षणाची नवी दृष्टी देतात. कवी कैलास दौंड मुलांचे मन जाणतात. बालमनाला पडणारे स्वप्न, भेडसावणारे प्रश्न कवी नेमकेपणाने हेरून आपल्या कवितांतून मांडतात. परीच्या पंखांची गादी, आकाश निरीक्षण,स्वप्नातील शाळा, खिडकी, एकदा यासारख्या कविता मुलांना आनंदाने चिंब भिजवून टाकतात.

***'माळरानी पानोपानी***
***रानीवनी गाऊ गाणी***
***माळरानी उनाड वारा***
***पडत्या पावसात, वेचू गारा'***

अशा ओळींतून कवीने निसर्गाला गुरू मानत मुलांच्या मनात निसर्ग पेरण्याचा प्रयत्न केलेला आहे. निसर्ग हाच संपूर्ण सजीव सृष्टीचा जीवनदाता आहे. त्याच्याविषयी बालमनात आपूलकीची भावना निर्माण करण्याचा कवी आपल्या कवितांतून प्रयत्न करतात. पाऊस, उन्हाळा, सूर्योदय, थोडं फिरायला जाऊ, वाढ बाई वाढ, पक्षी, उन्हाळ्याची चाहूल, झाडापाशी खेळताना, पाणवेडी या कविता मुलांना निसर्गाच्या जवळ घेऊन जातात. बालकांना आपल्या सभोवतीच्या निसर्गाची ओळख करून देतात. या बाल कवितासंग्रहातील बहुतांश कविता या सभोवतीच्या निसर्गाशी नाळ जोडणाऱ्या कविता आहेत. कवी या कवितांतून जसा निसर्गाशी बालमनाची नाळ जोडतात तसेच ते बाबांची सुट्टी, माझे गाव, सहभोजन, आजीचे बोल अशा कवितांतून बालमनाला वेगळ्या अनुभवांची अनुभूतीही देतात.

***'काळीभोर माती कणांत रूजते***
***हिरवाई देते रानभर***
***माझ्या मनी येते, आपणही द्यावे***
***काहीतरी व्हावे आपणही'***

अशा ओळींतून निसर्गाप्रमाणे आपणही इतरांना काहीतरी देणे लागतो. ही भावना बालमनात रूजवण्याचा प्रयत्न कवीने केला आहे.

'काय व्हायचंय ?' ही कविता बालमनाचा कानोसा घेत-

***'कुणासाठी काहीतरी***
***मला सुद्धा व्हायचंय***
***देशासाठी, लोकांसाठी***
***मला सुद्धा उरायचंय.'***




म्हणत आपले जीवन सत्कारणी अर्पण करण्याची इच्छा व्यक्त करतोय. सर्वत्र आनंदाची पेरणी करणारी 'माझे गाणे आनंदाचे' ही कविता,

***'नवतेचे अन् नवतेजाचे***
***सृष्टीमधल्या सामर्थ्याचे***
***भूमी होऊनी जगण्याचे***
***माझे गाणे व्यापकतेचे'***

म्हणत व्यापकतेची जाणीव बालमनात फुलवण्याचा आशावाद देते. या संग्रहातील कविता बालकांना विश्वातील माणसांना प्रेमाच्या धाग्याने गुंफण्याचा आशावाद देतात. शिवाशिवीचा खेळ खेळत मैत्री फुलवतात. सहभोजनातून एकत्र जेवणाची मज्जा देतात. तर आता गट्टी फू सुटू दे म्हणत बालपणीचा निखळ आनंद देतात. हा कविता संग्रह आकर्षक चित्रांनी अत्यंत सुरेख सजलेला आहे. प्रसिद्ध बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी पुस्तकाची पाठराखण केली आहे.

**पुस्तकाचे नाव : माझे गाणे आनंदाचे (बाल कविता)**
**कवी - डॉ. कैलास दौंड**
**प्रकाशक - अनुराधा प्रकाशन**
**पृष्ठे - ४४ किंमत - ५० रू.**

**- गुलाब बिसेन, मो. नं. 9404235191**

# शाळा, विद्यालय, महाविद्यालय व कॉन्व्हेंटवाल्यांची एकाधिकारशाही



प्रा. प्रवीण डिगांबर बोंद्रे
संपर्क क्र. : 7620021396

आधुनिक केसरी

**कॉन्व्हेंट म्हटल्या की आजच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण, कपडे, बॅग, ट्युशन्स सगळं काही यांचेच. विद्यार्थ्यांच्या पालकांनी इतर ठिकाणांवरून कपडे घेतो म्हटले तर कॉन्व्हेंट वाल्यांना ते चालत नाही. आता कॉन्व्हेंट वालेच विद्यार्थ्यांना कपडे देत आहेत. पुस्तके सुद्धा कॉन्व्हेंट मधूनच घ्यावी लागतात.**

म्हणजे सगळं काही कॉन्व्हेंटच पुरविणार. कॉन्व्हेंट वाल्यांची ही एकाधिकारशाही चालू झाली आहे. किंवा याला आपण यांची मक्तेदारी म्हणू शकतो . हे सगळं साहित्य पुरवण्याच्या नावावर कॉन्व्हेंट्स वाल्यांनी चांगलीच दुकानदारी चालू केली आहे.

दुसरी गोष्ट ह्या कॉन्व्हेंट इंग्रजी शिक्षण देण्याच्या नावावर विद्यार्थ्यांच्या पालकांकडून खूपच जास्त ऍडमिशन फी घेत आहेत. गरीब लोकांना आपल्या मुलांना या कॉन्व्हेंटचे शिक्षण देता येत नाही.कारण त्यांच्याकडे पैसा नसतो.

आजकाल सगळीकडे कॉन्व्हेंटची मक्तेदारी किंवा एकाधिकारशाही दिसून येत आहे. कॉन्व्हेंटच नाहीतर काही काही शाळा, विद्यालय व महाविद्यालयांची पण एकाधिकारशाही आपल्याला दिसून येत आहे. कधीकधी बाहेरील एनजीओ चे लोक काही प्रोजेक्ट किंवा शैक्षणिक उपक्रमाच्या संदर्भात काही काही शाळाना विद्यालयांना व महाविद्यालयांना भेट देत असतात. तेव्हा काही काही शाळा, विद्यालये, महाविद्यालये अशा लोकांना बिलकुल सहकार्य करीत नाही. शाळा, विद्यालय, महाविद्यालय कॉन्व्हेंट्स यांचे प्राचार्य किंवा टीचर या भेट देणाऱ्या व्यक्तींना सांगतात की, आमचे मॅनेजमेंटवाले बाहेरील स्पर्धांना व परीक्षांना आमच्या शाळेत, विद्यालयात, महाविद्यालयात किंवा कॉन्व्हेंटमध्ये घेत नाहीत. तसेच शाळा विद्यालय महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा इतर शिक्षक स्पष्ट या गोष्टीसाठी नकार देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हिताची, कल्याणाची एखादी स्पर्धा असेल किंवा एखादी परीक्षा असेल तर त्या स्पर्धेची किंवा परीक्षांची माहिती ही विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठं नुकसान होतं.

हे मॅनेजमेंट वाले व प्राचार्य विद्यार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्यात मोठा अडथळा बनतात. बाहेरून येणाऱ्या एनजीओच्या उपक्रमांना व लोकांना मॅनेजमेंटवाल्यांनी, शाळा, विद्यालय तसेच महाविद्यालयांच्या व कॉन्व्हेंटच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू द्यायला पाहिजे. कारण काही एनजीओ विद्यार्थ्यांच्या हितांच्या स्पर्धा किंवा परीक्षा घेत असतात. मग त्या स्पर्धेला बसायचे किंवा नाही हा अंतिमतः निर्णय विद्यार्थ्यांचा राहतो. जर विद्यार्थ्यांपर्यंत या उपक्रमांची, स्पर्धांची, परीक्षांची माहिती व्यवस्थित पोहोचली तर विद्यार्थ्यांचा यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. हे निश्चित. काही काही शाळा विद्यालय, महाविद्यालय कॉन्व्हेंट्स यांनी खूपदा अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत न पोहोचू देण्यातच एखादीकाशाही प्राप्त केलेली आहे. शाळा असो, विद्यालये असो, महाविद्यालय असो, कॉन्व्हेंट असो यांनी बाहेरील एनजीओच्या लोकांना विद्यार्थ्यांपर्यंत माहिती देण्यासाठी पोहचू द्यायला पाहिजे .जेणेकरून स्पर्धा व परीक्षांची माहिती विद्यार्थ्यांना मिळेल. आणि विद्यार्थ्यांना त्या परीक्षांना, त्या स्पर्धांना बसता येईल. आणि विद्यार्थ्यांची पर्सनॅलिटी डेव्हलप होईल . या दृष्टिकोनातून शाळा महाविद्यालय कॉन्व्हेन्स यांनी विचार करणे गरजेचे आहे.